म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३५९२

कुसुमाग्र

गंगाधर गाडगीळ

जी. ए. कुलकर्णी

इंद्रजीत भालेराव

प्रभाकर जठार

वासंती मुझुमदार

बाळ गाडगीळ

बा. भ. बोरकर

अरुणा ढेरे

शांता शेळके

# मराठी विश्व

## वेचक आणि वेधक

REFBK-0026833

सदाबहार साहित्यकृतींचा अमूल्य ठेवा

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

10 MAR 1993

( क्रु. मा. पहा )
१००००–११–८९

संदर्भ
निबंध
3492
26833
21983

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3492
26833
21983
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0026833

मराठी विश्व

वेचक आणि वेधक

© १९९२, मराठी विश्व - वेचक आणि वेधक

●●●

किंमत

भारतात रुपये ४५

परदेशात अमेरिकन डॉलर्स तीन

●●●

शामराव शंकरराव पाटील यांनी संपादन करून

त्यांनीच गणेश प्रिंटर्स, ६९२ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

या छापखान्यात छापून

१३२ नॅशनल सोसायटी, औंध, पुणे ४११ ००७.

येथे हे वार्षिक प्रसिद्ध केले.

●●●

जाहीरात व विक्रीसाठी संपर्क :

वर्ल्डवाइड इन्फर्मेशन सर्व्हिसेस एन्टरप्राइज

२(४) सकाळनगर, पुणे ४११ ००७.

●●●

कव्हर डिझाईन : विलास चक्के

विभाग 3412 28633 2/7/93

# हसत खेळत गाणं म्हणत यशस्वी जीवन जगायचंय

"सांगा कसं जगायचं?" मंगेश पाडगांवकरांच्या एका कवितेचे हे शीर्षक आहे. संपूर्ण धृपदस्वरूप कडवं असं आहे.

*"सांगा कसं जगायचं?*
*कण्हत कण्हत*
*की गाणं म्हणत?*
*तुम्हीच ठरवा!"*

आपलं सर्वांचं उत्तर एकच आहे. आम्हाला हसत खेळत गाणं म्हणत यशस्वी जीवन जगायचंय. आमची सर्व धडपड त्यासाठीच तर आहे.

आम्ही जर कधीकधी किंवा काही जण सदानूकदा कण्हत असतील तर शारीरिक, मानसिक वेदनांमुळे. दुसरं काय करणार?

वाट दिसत नाही, कोंडमारा होतोय, वैफल्याचा मूड बदलणारं जवळपास कोणी नाही म्हणून कण्हावं लागतं. आशा दाखवतील, धीर देतील, प्रश्नांची उकल करतील किंवा उत्तर देखील सांगतील असे आजी-आजोबा, काका-काकी, मामा-मावशी, आण्णा-आप्पा दूर आहेत, किंवा जवळ असून कित्येकदा असून नसल्यासारखेच भासतात. शिवाय हसायला लावतील, मूड बदलतील, मन उल्हसित करतील असे नातूपणतू, भाचे-भाच्या, सवंगडी, मित्र-मैत्रिणी बहुतेक वेळा त्यांच्या त्यांच्याच खऱ्या किंवा काल्पनिक संकटांनी व्यथित असतात. त्यांचे आमचे कण्हणे देखील बऱ्याचदा एका लयीतच चालते. हो, अगदी पाच वर्षांचे बाळगोपाळपण शाळा प्रवेशाच्या तणावामुळे चक्क आजारीसुद्धा पडतात!

अवतीभवती यशस्वी लोक बरेच दिसतात. पण तेही यशाच्या

व्यापाने किंवा तापाने सतत ताणाखाली असतात, निदान आम्हाला तरी तसे वाटतात. मग जिचं अनुकरण करावं किंवा जिच्याकडून हसत खेळत गाणं म्हणत यशस्वी जीवन जगण्याची स्फूर्ती घ्यावी अशा व्यक्तीचा सहवास कसा लाभणार?

तर मग काय करायचं. अर्थात् हसत खेळत गाणं म्हणत यशस्वी जीवन जगायचं, पण कसं, कोण उकल करील या रहस्याची, कोण दाखवील वाट?

अहो, रहस्य उघड आहे, मार्ग पण सोपा आहे. पुस्तकांशी मैत्री, साहित्यिकांशी हितगुज, कवीमनांशी एकरूपता, नाटक, संगीत मैफलींमध्ये दंग होणे, सहलीमध्ये सहभाग. पण एक पथ्य आहे बरं का. सर्व कांही मनापासून करायचं. केवळ वेळ घालविण्यासाठी वाचायचं सोडून सकस व प्रभावी साहित्य वाचायचं. मार्क ट्वेन म्हणतो. "निरक्षर व न वाचणारे साक्षर सारखेच." यात त्याला वेळ घालविण्यासाठी वाचणारे पण अभिप्रेत असावेत, कारण तेही वाचनाच्या खऱ्याखुऱ्या आनंदाला, जीवन उजळून टाकणाऱ्या अनुभवांना निरक्षरांप्रमाणेच मुकतात.

पण वाचायचं काय? सकस, प्रभावी साहित्याची व्याख्या काय? कसोट्या कोणत्या?

या प्रश्नांची उत्तरं अगदी सोपी आहेत. खुदकन् हसू आलं; मनाला चटका लागला; टचकन् डोळ्यात पाणी आलं; एकदम उसळून उठलो; आपोआप नतमस्तक झालो; डोक्यात लख्ख उजेड पडला व माझी चूक लक्षात आली; प्रसन्न वातावरणात सुखावलो; कधी पाहीन ते स्थळ, कधी भेटेन त्या व्यक्तीला अशी ओढ लागली; मन प्रसन्न झालं; एकदम मूड बदलला आणि शेवटी वाचनात इतका दंग झालो की वेळेचं भानच राहिलं नाही. अशा अनुभूती, अशी प्रत्यंतरं देणारं साहित्य नक्कीच वरील कसोट्यांना उतरेल. "मना करा रे प्रसन्न, मन सर्व सिद्धीचे कारण" असे समर्थ रामदास म्हणतात. पण बटण दाबून का मन प्रसन्न होतं? होय

होतं, पण ती बटणं व त्यांना कार्यान्वित करणारे प्रवाह साहित्यात आहेत, संगीतात आहेत, निसर्गात आहेत. प्रत्येकाला सहज उपलब्ध होतील, पण "दुबळी माझी झोळी" असं हताशपणे निष्क्रिय होऊन बसणाऱ्याला नव्हे.

आता हाच संग्रह व त्यातील पहिलाच लेख "स्थानबद्ध वुडहाऊस" घ्या. पु. ल. लिहितात, "वर्षानुवर्षे वुडहाऊस हा माझा प्रवासातील सोबती आहे." वुडहाऊसच कां? तर "वयाची नव्वदी ओलांडल्यानंतर लिहिलेल्या त्याच्या कादंबरीतही वाचकाला खळाळून हसवायचे तेच सामर्थ्य होते." वार्धक्याचे तर सोडाच पण "स्थानबद्धतेतील हाल आणि त्याहूनही त्याच्या लाडक्या इंग्लंडने त्याचा कोणताही अपराध नसतांना केलेले त्याचे हृदयशून्य चारित्र्यहनन त्या अंतर्मनातल्या हिरवळीचा हिरवेपणा आणि प्रकाश नष्ट करू शकले नव्हते."

अशा अतिगंभीर जीवघेण्या संकटकाळातही मनातला प्रकाश व हिरवळ टिकविणाऱ्या वुडहाऊसची ओळख पटल्यावर, बस चुकली, साहेब रागावला, प्रमोशन चुकलं, हव्या त्या कोर्सला प्रवेश मिळाला नाही, धंद्यात खोट आली या व अशा तुलनात्मक दृष्ट्या क्षुद्र घटनांनी आपण आपले हसू हरवून बसतो, मन करपू देतो. हा स्वतःवर अन्याय आहे अशी खात्री होईल. काय तो आपला वेडेपणा असं म्हणून स्वतःविषयीच हसू येईल.

इंदिरा संतांच्या कविता बघा. मोठ्या मुलाच्या वागण्यामुळे व जनरेशन गॅपमुळे वाटणाऱ्या मनोवेदना या त्याच्या जन्माच्या वेळच्या कळांप्रमाणे सहन करता येऊ शकतात. किंवा "बाळ चालला दिगंती । केळ तृप्तित मोडली । अशी भाग्यवंता आई । एका केळीत भेटली ।" असा समर्पक जीवनाविषयीचा दृष्टिकोनही दुःखं हलकी करू शकतो. अशा आशावादी दृष्टीकोनामुळे" आपल्या आईचं मन केवढं मोठं आहे." असं मुलाला वाटेल किंवा "किती क्षुद्र गोष्टीवरून आपण दुःखी कष्टी होतो" याचा आईला उमज पडेल. असा फरक प्रवचनांनी किंवा कुणाच्या

सल्ल्याने घडणे कठीण असते. कारण त्यामध्ये अस्मितेचा प्रश्न येतो. पण वाचनातून स्वतःला काही पटलं तर आपल्या सोयीप्रमाणे व काळवेळ बघून योग्य त्या संधीवर व्यक्ती वागण्यात, बोलण्यात बदल करू शकते.

ही झाली दोन उदाहरणं. पण या संग्रहातील इतर साहित्यही एकापेक्षा एक सरस, कसदार, समर्थ व प्रभावी आहे, अशी वाचकाला प्रचिती येईल, याची आम्हाला खात्री वाटते. कारण, आमच्या निवडीची एक अनमोल पोच श्रेष्ठ कवयित्री इंदिरा संत यांनीच दिली. त्यांच्या पत्रात त्यांनी कविता पुनर्मुद्रित करायला परवानगी तर दिलीच, त्याशिवाय त्याच पत्रात त्या लिहितात, "आपली निवड मला आवडली असे जे निवडमंडळ वा संपादकवर्ग असेल त्याला सांगा."

अशाच निष्ठेने व अभ्यासपूर्ण पद्धतीने आम्ही यापुढेही साहित्यसागरातून माणिकमोती वेचून, वेळोवेळी या माध्यमातून आपणापर्यंत पोहोचविण्याचा कसोशीने प्रयत्न करू. आमच्या प्रयत्नांना यश येईल अशी आम्हाला खात्री वाटते. कारण, आम्ही हे सर्व प्रथम आम्हाला हसत खेळत गाणं म्हणत यशस्वी जीवन जगता यावे, म्हणून करतो आहोत.

या प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्यांचे व आम्हाला वेळोवेळी मदत करून प्रोत्साहन देणाऱ्या सर्वांचेच मनःपूर्वक आभार.

**शाम पाटील**

प्रकाशक

| | | |
|---|---|---|
| स्थानबद्ध वुडहाऊस | १ | पु. ल. देशपांडे |
| ओझें, भाग्यवंता, निरोप व नाही माझ्या चुलीपाशी | ३० | इंदिरा संत |
| प्राध्यापिका : काही रोमांचकारी अनुभव | ३३ | गंगाधर गाडगीळ |
| शिवराया, अनावरण व ज्योतीराव | ५० | कुसुमाग्रज |
| तातू सामंत : एक पिशानवल्ली | ५६ | जी. ए. कुलकर्णी |
| मायबाई, मदनाचे वाटेकरी व सर्वांनाच | ७६ | इंद्रजित भालेराव |
| आकाशातील ग्रहांच्या गमतीजमती | ७९ | प्रभाकर जठार |
| महाराष्ट्र मागे का पडला? गाडगीळ सिद्धांत | १०२ | बाळ गाडगीळ |

| | | |
|---|---|---|
| या सुरांच्या मैफली, रांगोळी व सांगावा | ११५ | वासंती मुझुमदार |
| पांडुरंग, सांगता व ईशावास्योपनिषद | ११८ | बा. भ. बोरकर |
| बाग, केशराची खूण व अज्ञात | १२२ | अरुणा ढेरे |
| मैत्रिणी, शोध व बरसात | १२६ | शांता शेळके |
| ऋणनिर्देश | १२९ | |

निबंध

# स्थानबद्ध वुडहाऊस

**पु. ल. देशपांडे**

१६ फेब्रुवारी १९७५. सकाळच्या गाडीने पुण्याहून मुंबईला जायला निघालो होतो. वर्षानुवर्षे वुडहाऊस हा माझा प्रवासातला सोबती आहे. त्याची पुस्तके शिळी व्हायलाच तयार नाहीत. माझ्या प्रवासी बॅगेत इतर कोणतीही पुस्तके असली तरी वुडहाऊस हवाच. तसा घेतला. तेवढ्यात दाराच्या फटीतून 'सकाळ' सरकला. पहिल्या पानावर वुडहाऊसच्या निधनाची बातमी. एका हातात कधीही न मरणारा वुडहाऊस आणि दुसऱ्या हातात चौऱ्याण्णवाव्या वर्षी वुडहाऊस मरण पावल्याची बातमी सांगणारा 'सकाळ'. त्या क्षणी मला त्या वुडहाऊसच्याच एका उद्‌गाराची आठवण झाली. 'लेओनारा' ही त्याची अत्यंत लाडकी एकुलती एक मुलगी वारल्याची बातमी ऐकल्यावर त्रेसष्ट वर्षांचा वुडहाऊस उद्‌गारला होता, "आय थॉट शी वॉज् इम्मॉर्टल." आपली लाडकी लेओनारा आणि तिचा मृत्यू ह्या दोन घटना वुडहाऊसच्याा स्वप्नातही कधी एकत्र आल्या नव्हत्या. 'मला वाटलं होतं की ती अमर आहे' ह्या एवढ्या उद्‌गारात जगात अपत्यवियोगाच्या वेदना भोगाव्या लागलेल्या आईबापांच्या मनावर बसणाऱ्या पहिल्या निर्घृण घावाला एखाद्या शोक-सूत्रासारखी वाचा फुटली आहे. वुडहाऊसच्या निधनाची वार्ता ऐकल्यावर जगातल्या त्याच्या लक्षावधी वाचकांनीही हेच म्हटले असेल की, 'अरे, आम्हाला वाटलं होतं की तो अमर आहे!'

वयाची नव्वदी ओलांडल्यानंतर लिहिलेल्या त्याच्या कादंबरीतही वाचकाला खळाळून हसवायचे तेच सामर्थ्य होते. वुडहाऊसने लिहीत जायचे आणि वाचकांनी हसत हसत वाचायचे ही थोडीथोडकी नव्हे, सत्तरएक वर्षांची परंपरा होती. त्याच्या लिखाणात लेखकाच्या वाढत्या वयाचा जरासाही संशय यावा अशी ओळ नव्हती. कुठे थकवा नव्हता. सत्तरएक वर्षांपूर्वी मांडलेला दंगा चालू होता. वुडहाऊस नसलेल्या जगातही आपल्याला राहावे लागणार आहे हा विचारच कुणाला शिवत नव्हता.

पेल्हम ग्रेनव्हिल वुडहाऊस नावाचा १५ ऑक्टोबर १८८१ रोजी जन्माला आलेला हा इंग्रज आपल्या लिखाणाचा बाज यत्किंचितही न बदलता रोज आपल्या टेबलाशी बसून कथा-कादंबऱ्या लिहीत होता. पेल्हम ग्रेनव्हिल हे त्याचे नाव जरासे आडवळणीच होते. त्यामुळे त्याचे आडनावच अधिक लोकप्रिय झाले. 'बारशाच्या वेळी बाप्तिस्मा देणाऱ्या पाद्र्याचा हे असले नाव ठेवण्याबद्दल मी रडून-ओरडून निषेध करतोय हे कोणाच्याच लक्षात आले नाही,' ही त्या नावावर स्वतः वुडहाऊसचीच तक्रार आहे. जवळची माणसे त्याला 'प्लम' म्हणत.

प्लमच्या कथा-कादंबऱ्यांतील वातावरणाचा बदलत्या समाज-परिस्थितीशी सुतराम संबंध नव्हता. त्याची त्याने दखलही घेतली नाही. आणि नवल असे, की त्याच्या वयाच्या नव्वद-ब्याण्णवाव्या वर्षी लिहिलेल्या पुस्तकाचा खपही दशलक्षांच्या हिशेबात होत होता. त्याच्या लिखाणात आधुनिक पाश्चात्त्य लोकप्रिय कादंबऱ्यांतून आढळणारी कामक्रीडांची वर्णने नव्हती, खून-दरोडे नव्हते, रक्त फुटेस्तोवरच्या मारामाऱ्या नव्हत्या, शिवीगाळ नव्हती, वैताग नव्हता, कसला सामाजिक प्रश्न नव्हता, राजकीय रहस्यांचा स्फोट नव्हता. होते ते जुने इंग्लंड आणि काळाच्या ओघाबरोबर वाहून गेलेला त्या समाजातला एक स्तर. ते इंग्लंडही प्लमने अनेक वर्षांपूर्वी सोडले होते. अमेरिकेत न्यूयॉर्कजवळ

येऊन तो स्थायिक झाला होता. कुटुंबात तो आणि त्याच्याहून चार वर्षांनी लहान असलेली त्याची प्रेमळ, सुदक्ष सहचारिणी एथेल, काही कुत्री आणि मांजरे. लेखनावर लक्षावधी डॉलर्स मिळत गेल्यामुळे लाँग आयलंडवरच्या रेमसेनबर्ग नावाच्या टुमदार उपनगरात राहायला एक सुंदर बंगली. भोवताली काही एकर बाग. त्यात गर्द वनराई. वनराईतून पळणाऱ्या पायवाटा.

प्लमचे आयुष्य विलक्षण नियमित. सकाळी लवकर उठून बंगल्याच्या पोर्चमध्ये यायचा. बारा नमस्कारांसारखा हातपाय ताणण्याचा एक व्यायाम बारा वेळा करायचा. वयाची नव्वद वर्षे उलटली तरी प्लमची ही व्यायामद्वादशी चुकली नाही. घरात जाग आलेली नसायची. मग स्वतःच आपला टोस्ट भाजून घ्यायचा. चहा तयार करायचा. ही न्याहारी शांतपणाने चालायची. एखादी रहस्यकथा (बहुधा आगाथा ख्रिस्ताची) किंवा आवडत्या लेखकाचे पुस्तक वाचत वाचत न्याहारी संपली, इतर आन्हिके उरकली की स्वारी प्रभातफेरीला निघे. सोबत घरातली कुत्री हवीतच. कुत्री आणि मांजरे ही प्लमची परम स्नेहातली मंडळी. एकदा हा सकाळचा फेरफटका झाला की, नवाच्या सुमाराला अभ्यासिकेत शिरायचा. कथा-कादंबऱ्यांचे धागे जुळवायला सुरुवात. त्या निर्मितीतून असंख्य वाचकांना ह्या माणसाने खुदूखुदू ते खोःखोःपर्यंत सर्व प्रकारांनी हसवले. नुसते हसवलेच नाही, तर 'पी. जी. वुडहाऊस' हे व्यसन जडवले. कुणीतरी इंग्रजीतून पुस्तके वाचणाऱ्यांची 'वुडहाऊस वाचणारे' आणि 'वुडहाऊस न वाचणारे' अशी विभागणी केली होती. जेम्स ॲगेट ह्या प्रसिद्ध पण स्तुतीच्या बाबतीत महाकंजूष आणि प्रतिकूल टीकेच्या बाबतीत केवळ आसुरी असणाऱ्या टीकाकाराने 'थोडाफार वुडहाऊस आवडणारे असे त्याचे वाचक ह्या जगात संभवतच नाहीत' असे म्हटले आहे. वुडहाऊस आवडतो याचा अर्थ तो अथपासून इतिपर्यंत आवडतो. हे आपल्या बालगंधर्वांच्या गाण्यासारखे आहे. ते संपूर्णच आवडायचे

असते. (सिद्धेश्वरशास्त्री चित्रावांना वुडहाऊस आवडतो आणि त्याची सगळी पुस्तके त्यांच्या फळीवर आहेत हे मी जेव्हा वाचले त्या वेळी त्यांच्याविषयी मला वाटणारा कोशगत आदर उफाळून आला होता.) 'व्यसन' ह्यापलीकडे वुडहाऊसच्या बाबतीत दुसरा शब्द नाही. असल्या व्यसनांनी ज्यांना न बिघडता राहायचे असेल त्यांनी अवश्य तसे राहावे. अमुकच एका तत्त्वज्ञानात किंवा धर्मात मानवतेचे कल्याण आहे असा आग्रह धरणाऱ्यांनीही ह्या भानगडीत पडू नये. (ते पडत नसतातच!) त्यांच्या हसण्याच्या इंद्रियावर निसर्गानेच एक न उघडणारे झापड बसवलेले असते. अहंकाराची दुर्गंधी आणि अकारण वैताग घेऊन ही माणसे जगत असतात. त्यांना सतत कोणीतरी खराखोटा 'शत्रू' हवा असतो. अशा 'शत्रू'चा सार्वजनिक बागुलबुवा उभा करण्यात जे यशस्वी होतात तेच 'हुकूमशहा' होत असतात. आणि 'विनोद' तर मित्र जोडत असतो. म्हणूनच एकछत्री राजवटीत पहिली हत्या होते ती विनोदाची.

वुडहाऊससारख्या माणसाला, नव्हे देवमाणसाला, सत्ताधीशांच्या ह्या वृत्तीचा फार मोठा ताप सोसावा लागला. त्याची अश्राप वृत्ती आणि निर्मळ विनोदबुद्धी हा त्याच्या आयुष्यात शाप ठरावा अशी परिस्थिती होऊन गेली. सुसंस्कृत जगाने लाजेने मान खाली घालावी अशीच ही घटना आहे. एक संपूर्ण असत्य, माणसाला तापवलेल्या सळीने दिलेल्या डागासारखे कसे चिकटून राहते आणि राजकीय प्रचार ह्या नावाखाली चालणाऱ्या बौद्धिक व्यभिचाराचे अकारण बळी होऊन कसे जगावे लागते ह्याचे हे एक हृदयभेदक उदाहरण आहे. पण त्याबरोबर ह्या साऱ्या मानसिक छळातून, वरवर गमत्या वाटणारा वुडहाऊस आपल्या विनोदी लेखनाशी इमान ठेवून कसा राहिला त्याची हकीकत ह्या माणसापुढे आदराने नतमस्तक व्हायला लावणारी आहे. पण हसवणाऱ्या माणसाला कोणी आदरणीय वगैरे मानत नसते.

कुठल्याही तत्त्वज्ञानाचा प्रसार किंवा धिक्कार करण्यासाठी

वुडहाऊसने लिहिले नाही. जीवनाच्या सखोल तत्त्वज्ञानाची चिंता केली नाही. त्यानेच म्हटले आहे, "माझ्यापुढे कुठलेही मार्गदर्शन करणारे नियम नाहीत. मी आपला जगत जातो. लिहीत असलो म्हणजे उगीचच इकडेतिकडे पाहत बसायला आपल्याला सवड नसते. एकामागून एक पुस्तक लिहिणे हेच माझे जीवन आहे." किती सहजतेने वुडहाऊस हे म्हणून गेला आहे.

१९०२ साली वुडहाऊसने व्यावसायिक लेखनाच्या क्षेत्रात पहिली एंट्री घेतली, आणि १९४० साल उजाडायच्या आधी बारा नाटके, तीस विनोदी एकांकिका, शेकडो भावगीते, दोनशे सत्तावन्न कथा आणि बेचाळीस कादंबऱ्या लिहिल्या. ही काही नुसतीच लेखनकामाठी नव्हती. त्यांतली जवळजवळ प्रत्येक कृती यशाची नवी पायरी गाठत गेली होती. कडेखांद्यांवरच्या बच्च्याला खेळवावं तसे इंग्रजी भाषेला खेळवणाऱ्या वुडहाऊसने स्वतःचे एक विश्व निर्माण केले होते. त्याची भाषा आणि त्याची ती सृष्टी, इतकी त्याची स्वतःची आहे की त्याच्या साहित्याचे भाषांतर एखाद्या उत्तम कवितेच्या भाषांतरासारखे अशक्यच आहे. त्याची पात्रे एका विशिष्ट इंग्रजी कालखंडातील आहेत आणि त्या संस्कृतीत इतकी रुजलेली आणि वाढलेली आहेत की त्या जमिनीतून त्यांना अलग करणे चुकीचेच ठरावे. तरीही वुडहाऊसच्या विनोदात विश्वात्मकता आहे. पृथ्वीच्या पाठीवरल्या इंग्रजी भाषा समजणाऱ्या संपूर्णपणे निराळ्या संस्कृतीत जगणाऱ्या लोकांना त्याच्या विनोदाने, अफलातून विनोदी उपमांनी, विनोदी प्रसंगांनी डोळ्यांतून पाणी येईपर्यंत हसवले.

त्याची बर्टी वूस्टर आणि जीव्हज्, आपल्या 'स्मिथ' या नावाचे स्पेलिंग कारण नसताना 'पी'पासून सुरू करून पहिली 'पी' अनुच्चारित आहे हे बजावणारा आणि सदैव उसने पैसे देणाऱ्यांच्या शोधात असणारा तो स्मिथ, लॉर्ड एम्सवर्थ आणि त्याचा तो ब्लैण्डिग्ज, कॅसल, युकरिज, मुलिनर, अंकल फ्रेड्, गोल्फ कथांतला तो गोल्फमहर्षी 'वृद्ध सदस्य', ऑण्ट

आगाथासारख्या अनेक आत्या-मावश्या...ही सारी मंडळी आणि त्यांचा हा निर्माता यांनी इंग्रजी साहित्यात हा गोंधळ मांडिला होता. गोंधळाला अंत नव्हता आणि मृत्यूनेच मालवीपर्यंत ह्या गोंधळ्याच्या हातची मशाल विझली नव्हती. एका समीक्षकाने त्याच्या ह्या निर्मितीपुढे हात टेकताना म्हटले आहे : "वुडहाऊसची प्रतिभा थकायला तयार नाही; पण समीक्षक मात्र नवीन स्तुतिपर विशेषणे शोधून काढता काढता थकायला लागले आहेत."

लेखन हा त्याच्या प्रेमाचा विषय होता. लेखन म्हणजे साक्षात टेबलाशी बसून हाताने केलेले लेखन. मजकूर सांगून लेखनिकाकडून लिहून घेणे त्याला जमले नाही. एकदा एथेलने त्याला टेपरेकॉर्डरसारखे यंत्रही आणून देऊन भार हलका करण्याचा प्रयत्न केला होता. वुडहाऊस म्हणतो: "मी 'थँक्यू जीव्हज्' ह्या कादंबरीचा त्या यंत्रावर मजकूर सांगायला लागलो आणि काही वेळाने तो मजकूर ऐकायला लागल्यावर तो माझा मलाच ऐकवेना. भलताच रटाळ वाटायला लागला होता. आणि माझा आवाजदेखील एखाद्या पाद्रीबाबासारखा आहे याची मला तोपर्यंत कल्पनाही नव्हती. तो तसला आवाज किंवा ते यंत्र यांपैकी एक कोणीतरी माझी तंगडी खेचत होते. असो. दुसऱ्या दिवशी मी ते भिकार यंत्र विकून टाकले."

समोर बुद्धिबळाचा पट मांडून आपण आपल्याशीच खेळत बसावे तसा त्याचा हा लेखनाचा कार्यक्रम असे. स्वतःच बिकट चाल करायची आणि त्यातून स्वतःच गमतीदार सोडवणूक करायची. ह्या लेखनाच्या छंदाबद्दल त्यानेच म्हटले आहे : "लेखनाची एक मजाच आहे. तुम्ही स्वभावतःच लेखक असलात तर तुम्ही पैशासाठी, कीर्तीसाठी किंवा फार कशाला, छापून प्रसिद्ध व्हावे म्हणूनसुद्धा लिहायला बसता, असे मला वाटत नाही. मला तर पुन्हा पुन्हा लिहिण्याची आणि ते लेखन घासूनपुसून लख्ख करायची फार हौस आहे. एकदा कागदावर उतरून काढले, मग ते कितीही

ओबडधोबड का असेना, काहीतरी आपल्या पोतडीत जमा झाले, असे मला वाटते. ए. ए. मिल्न तर म्हणतो, की पुस्तके प्रकाशितदेखील करू नयेत. ती लिहावीत. त्याची सुंदर अशी एक प्रत छापावी ...... लेखकाला वाचण्यासाठी.''

'स्वान्तःसुखाय' म्हणजे तरी दुसरे काय आहे? साहित्यनिर्मिती ही खरोखरीच क्रीडा असावी. त्या खेळाची मजा वाटायला हवी. वुडहाऊस हा साहित्यातला 'खेळाडू' होता. त्याचे स्वतःचे मैदान होते, त्याची स्वतःची टीम होती. त्याच्या कथा-कादंबऱ्या म्हणजे ह्या साऱ्या भिडूंच्या जीवनातला खो-खो, आट्यापाट्या, लंगडी, धावाधावी, लपंडाव – नाना तऱ्हा! आणि वुडहाऊस हा त्या खेळाची हकीगत सांगणारा विनोदी कॉमेंटेटर. ही त्याची दोस्त मंडळी होती. इथे कोणी खलनायक नाहीत. कुणाच्या मनात पाप नाही. इथली हारजीत खेळातल्यासारखी. इथली फसवाफसवी पत्त्याच्या डावातल्या फसवाफसवीसारखी. इथले प्रेम, त्या प्रेमाच्या आड येणारी माणसे, त्यातून सूर मारून भोज्या गाठणारे नायक, त्यांना 'जेली'सारखे थरथरायला लावणाऱ्या त्या आत्याबाई, संकटमुक्तीसाठी साक्षात विष्णूसारखा उभा असलेला तो जीव्हज्... हे एक विलक्षण मजेचे नाटक.

नाटकच म्हणायला हवे. कारण त्याच्या पात्रांची घालमेल आणि धावपळ ही एखाद्या रंगमंचावर चालल्यासारखीच असते. कादंबरीतील पात्रेदेखील नाटकातल्या पात्रांसारखी सदैव हालती ठेवली पाहिजेत असे वुडहाऊसचेच मत होते. त्याने त्या पात्रांना सुस्त होऊ दिले नाही. एक एक प्रसंग म्हणजे एका घसरगुंडीवरून दुसऱ्या घसरगुंडीवर नेण्याचा कार्यक्रम. वुडहाऊस ह्या नाटकाचा निर्माता, सूत्रधार आणि प्रेक्षकही. आपला नायक नव्या घोटाळ्यात सापडला की सर्वांत त्यालाच आधी आनंद व्हायचा. मग त्याच्यातला सूत्रधार खुषीत येऊन त्या नायकाच्या फजितीचे गंमतीदार शब्दांत वर्णन करायला टपलेला असायचा. अशी एखादी नेमकी उपमा निघायची, की ती सुचल्यावर मला वाटते, वुडहाऊस

स्वतःच गुदगुल्या झाल्यासारखा हसत असेल. पानापानातून अशा कितीतरी विनोदी उपमा. उत्तम कवितेप्रमाणे अजिबात बदलता येणार नाही अशी अचूक शब्दयोजना. एक मात्र निश्चित की वुडहाऊस हा त्याच्या त्या इंग्रजीतूनच अनुभवायला हवा. भाषांतरात त्याच्या शैलीतली लय पकडता येत नाही. तबल्याच्या तुकड्यात 'धा' म्हणजे 'धा'च हवा, 'धिन्' चालणार नाही. तसेच वुडहाऊसच्या विनोदाचे आहे. त्याचा तो जीव्हज् हा 'बटलर' आहे. आता 'बटलर' ह्या शब्दाचा अर्थ जपानी 'गेशा' किंवा फार कशाला, 'भटजीबुवा' किंवा 'पिठले' ह्या शब्दांइतकाच अ-भाषांतरीय!

इंग्रजी भाषेला हवे तसे खेळायला लावणाऱ्या वुडहाऊसचे कौतुक पंडित-अपंडित सगळ्यांनाच होते. १९३९ साली ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने वुडहाऊसला इंग्रजी साहित्याच्या सेवेबद्दल डी. लिट. ची सन्माननीय पदवी दिली. त्यापूर्वी मार्क ट्वेन ह्या विनोदी लेखकालाच काय ती सन्माननीय डॉक्टरेट देण्यात आली होती. आपल्याकडल्या विद्यापीठाने मात्र विनोदी लेखकाला अशी गौरवपर डॉक्टरेट देणे ही सामान्यतः एखाद्या याज्ञवल्क्याश्रमाने कुणाला तरी उत्तम तंदुरी चिकन करतो म्हणून 'शाल आणि श्रीफळ' देण्याइतकीच अशक्य कोटीतली गोष्ट आहे.

१९३९ साली इंग्लंडमध्ये वुडहाऊसच्या विनोदाचा एवढा मोठा गौरव झाला आणि वर्ष दोन वर्षे लोटली नाहीत तोच युद्धकाळातला राष्ट्रद्रोही म्हणून त्याचा निषेध सुरू झाला. ज्याच्या वाचकांत रुडयार्ड किपलिंग, आगाथा ख्रिस्ती, जॉर्ज ऑरवेल, माल्कम मगरिज यांच्यासारखे इंग्रजी साहित्यातले श्रेष्ठ लेखक होते, हिलेर बेलॉकसारख्या इंग्रजी लेखकाने ज्याचा 'सध्या हयात असलेल्या इंग्रजी लेखकांतला निःसंशय सर्वोत्कृष्ट लेखक' असा बी. बी. सी. वरून गौरव केला होता, त्याच वुडहाऊसची त्याच बी. बी. सी. वरून पंचमस्तंभी, देशद्रोही, लॉर्ड हॉहॉ

अशी बदनामी सुरू झाली. विशेषतः त्या वेळचे ब्रिटिश प्रचारमंत्री डफ कूपर यांनी तर खासगी वैर असल्यासारखा वुडहाऊसच्या चारित्र्य-हननाचा प्रचार जारी ठेवला. पण बर्लिन रेडिओवरून ध्वनिक्षेपित झालेल्या ज्या भाषणांबद्दल त्याला राष्ट्रद्रोही ठरवण्यात आले होते ती भाषणे काय होती याची चौकशी करायची कुणालाच गरज पडली नव्हती. म्हणजे एकीकडून वुडहाऊस नाझी जर्मनांच्या बंदीखान्यात हाल भोगत होता आणि त्याच्या मायदेशात त्याच्याविरुद्ध त्याच्या जर्मनधार्जिणेपणाबद्दल गरळ ओकले जात होते. हा अश्राप माणूस राष्ट्रद्रोह करीलच कसा? हा विचारदेखील त्याला दोषी ठरवणाऱ्यांच्या क्षणभरही मनात येऊ नये हे चारित्र्यहननाच्या निरर्गल प्रचाराचे यश म्हणायला हवे.

पण अशा ह्या भयानक अवस्थेत वुडहाऊसने मात्र मनोधैर्याचा कुठलाही आव न आणता जे लोकविलक्षण मनोधैर्य प्रत्यक्षात आचरून दाखवले ते पाहिल्यावर हा वरपांगी गमत्या वाटणारा माणूस किती उंच आणि किती खोल होता याची साक्ष पटते. निरनिराळ्या तुरुंगांत आणि 'स्थानबद्धांच्या कॅम्पस'मध्ये नेऊन कोंडलेल्या वुडहाऊसची विनोदबुद्धी त्याला क्षणभरही सोडून गेली नाही. तो आपल्या स्थानबद्धतेतल्या अनुभवांची विनोदी डायरी लिहीत होता. विनोदी कादंबरीची गुंतागुंत रचीत होता. ती सोडवीत होता. उपासमार चालू होती. साठीच्या घरात आलेल्या वुडहाऊसला भयानक थंडीत फरशीवर झोपावे लागत होते. संडास साफ करायला भाग पाडले जात होते, आणि 'विनोदी लेखन' ही एवढीच आपल्याला जमणारी गोष्ट आहे असे मानणारा प्लम वाचकांना हसवणारी पानांमागून पाने लिहून काढीत होता. आम्ही 'स्वधर्मा'च्या लफ्फेबाज गोष्टी करतो; वुडहाऊस तो पाळत होता. विनोदी लेखन हा त्याचा स्वभावधर्म होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी वुडहाऊस फ्रान्समधल्या पारी प्लाजनजीक समुद्रतीरावरच्या ल तुके नावाच्या छोट्याशा गावात राहत

होता. १९४० च्या मे महिन्यात नाझी जर्मनांनी ल तुकेचा ताबा घेतला. त्या गावात जितके इंग्रज होते त्यांना स्वतःच्याच घरात स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. आठवड्यातून एकदा जर्मन कमांडंटच्या ठाण्यावर जाऊन हजेरी द्यावी लागत असे. अशी परिस्थिती असूनही त्याच्याविरुद्ध अपप्रचार करणाऱ्यांनी, वुडहाऊसला पकडून न्यायला नाझी सैनिक आले असताना त्याच्या घरी पार्टी चालली होती वगैरे मजकूर ठोकून दिला होता. नाझी सैनिक बळजबरीने लोकांच्या घरात शिरून त्यांच्या बाथरूममध्ये आंघोळी करीत, अन्न फस्त करीत, ह्या गोष्टींचा विपर्यास, नाझी सैनिकांना आपल्या बाथरूममध्ये स्नानाची सोय करून देऊन वुडहाऊस त्यांना पार्टीलाही बोलवीत असे, असाही केला जात होता. वुडहाऊस म्हणतो, "ह्या हरामखोरांना मी, आपली गलिच्छ शरीरे धुवायला माझ्या बाथरूममध्ये या असे आमंत्रण देईन काय? मी, त्यांना दम देऊनदेखील पाहिले. कसला दम आणि कसले काय! पुन्हा आले ते आणखी सैनिक जमवून घेऊन घुसले." फ्रेंचांनी शरणागती लिहून दिली होती. बाहेरच्या जगातल्या बातम्या ऐकण्यावर बंदी. इंग्रजी वर्तमानपत्रे येऊ देत नसत. फॅसिस्ट राजवटीत बातम्यांचा ब्लॅकआऊट हे एक प्रभावी तंत्र असते. आणि गोबेल्ससारखा अपप्रचारांच्या उस्तादांचा उस्ताद असल्यावर त्याच्या प्रचारात काय सांगितले जात होते आणि काय लपवले जात होते, याची कल्पनाही करणे अशक्य.

वुडहाऊस नित्याप्रमाणे त्या जर्मन कमांडरच्या कचेरीत वीस जुलैला हजेरी लावायला गेला. पण वातावरण निराळे वाटले. ल तुकेमधल्या परकीय रहिवाशांपैकी साऱ्या पुरुषमंडळींना स्थानबद्ध करण्याचा हुकूम आला होता. 'गरजेपुरत्या ज्या वस्तू असतील त्या बॅगेत भरा आणि ताबडतोब ठाण्यावर हजर व्हा,' असा हुकूम होता. तिथून त्यांना जर्मनांच्या कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पात नेण्यात येणार होते. वुडहाऊसच्याच शब्दात सांगायचे म्हणजे, "स्थानबद्धतेचा पूर्वानुभव नसल्यामुळे बॅगेत

काय काय भरता येते याची कल्पना नव्हती. त्यामुळे पाईप, तंबाखू, पेन्सिली, वह्या, बूट, दाढीचे सामान, थंडीसाठी म्हणून स्वेटर्स, टेनिसनच्या कवितांचा संग्रह, समग्र शेक्सपिअरचा खंड आणि अर्धा पौंड चहाची पत्ती-एवढे सामान भरले. तेवढ्यात एथेलने त्या बॅगेत एक कोल्ड मटनचॉप आणि चॉकलेटचा एक लहानसा स्लॅब कोंबला. रत्तलभर लोणी घ्या म्हणत होती. पण उन्हात लोणी वितळायला लागायची लहानशी भीती होती. तेव्हा तो बेत रद्द केला.'' एथेलचा निरोप घेऊन वुडहाऊसने घर सोडले. इथून त्याची वर्षभर चांगली परवड झाली. साठ वर्षांपुढल्या युद्धबंद्यांना कैदेत ठेवायचे नाही ह्या नियमाप्रमाणे तो सुटला. ह्या स्थानबद्धतेतल्या अनुभवावर एका अमेरिकन ब्रॉडकास्टिंग कंपनीने त्याला भाषणे द्यायला लावली. ते हे 'बर्लिन ब्रॉडकास्टस्'. जर्मनांनी लुच्चेगिरीने त्याचा दुरुपयोग केला. आणि इंग्रज आपली सारी विनोदबुद्धी गहाण टाकून भडकले. वास्तविक भडकायला हवे होते जर्मनांनी. पण युद्धकाळात बर्लिन रेडिओवरून वुडहाऊस बोललाच कसा? बस! हे एक कारण घेऊन तो काय बोलला हे ध्यानात न घेता त्याच्यावर चिखलफेकीचा सरकारी प्रचार सुरू झाला. त्याला फॅसिस्टांचा बगलबच्चा ठरवण्यात आले.

युद्ध संपले. जर्मन हरले. सगळ्यांची डोकी जरा थंड झाली. आणि एकोणीसशे चौपन साली वुडहाऊसने ती भाषणे प्रसिद्ध करायला आपला मित्र टाऊनएंड ह्याला परवानगी दिली. ह्या मित्राला वुडहाऊसने आयुष्यभर अतिशय मजेदार पत्रे लिहिली आहेत. टाऊनएंड हा स्वतः चांगला लेखक. त्याने ती सारी पत्रे जपून ठेवून प्रसिद्ध केली. सीअन ओकेसी नावाच्या लेखकाने वुडहाऊसला इंग्रजी साहित्यातील 'परफॉर्मिंग फ्ली' – म्हणजे 'खेळ करून दाखवणारी माशी' – थोडक्यात म्हणजे 'तमासगीर' म्हटले होते. ह्या पत्रसंग्रहाचे नाव तेच ठेवले आहे. आपण 'तमासगीर' आहोत हे वुडहाऊसने स्वतःच मान्य केले आणि न जाणो जे दूषण म्हणून दिले असेल ते भूषण म्हणून वापरले. ह्या हसवणाऱ्या

माणसाला दुसऱ्या कुठल्याही सन्मानाची अपेक्षा नव्हती. यथेच्छ चिखलफेक झाली होती; पण प्लमच्या कादंबऱ्या प्रसिद्ध होतच होत्या. बर्टी वूस्टर घोळ करीत होता. त्याचा तो प्रज्ञामूर्ती (आणि स्थितप्रज्ञही) जीव्हज् शांतपणे मालकांना त्यातून सोडवून तितक्याच शांतपणे नामानिराळा राहत होता. लोक वाचत होते. हसत होते.

युद्ध संपून पाच-सात वर्षे झाल्यानंतरही त्याच्या पुस्तकांवर तोंडभर तारीफ असलेल्या समीक्षेत वुडहाऊसच्या विनोदाला तोड नाही अशी शिफारस होत होती. पण लगेच 'दुसऱ्या महायुद्धात नाझींनी त्याला पकडून अपर सायलेशियन तुरुंगातून ब्रिटिशांनी जर्मनांना शरण जावे म्हणून केलेल्या प्रचाराचे दुःस्वप्नासारखे दिवस आणि त्या दुःस्वप्नांसारख्याच आठवणी आता संपल्या आहेत' हे शेपूट होतेच.

'असत्यमेव जयते'चे हे फार नमुनेदार उदाहरण आहे. प्लमने ही समीक्षा वाचली. त्यावरची त्याची प्रतिक्रिया त्याच्या विनोदी वृत्तीला साजेशीच आहे. ''बारा वर्षांपूर्वी मी जेव्हा साठ वर्षांचा चिमखडा होतो त्या वेळी ह्या उल्लेखाने जखम झाली असती. आता सत्तरी ओलांडल्यावर असल्या घावाच्या जखमा होत नाहीत. आता ह्या घड्याळाची टिकटिक केव्हा बंद पडेल ते सांगता येत नाही. अशा वेळी कशाचीही खंत बाळगणे येडपटपणाचे वाटते. 'माझ्याविषयी लोक वर्तमानपत्रातून काही का लिहीनात – जोपर्यंत माझ्या नावाच्या स्पेलिंगमध्ये चूक करीत नाहीत तोपर्यंत मला त्याचे काही वाटत नाही,' असे कोणीतरी म्हणाला होता. माझी अवस्था त्या माणसासारखी आहे. तात्पर्य, माझ्याविषयीचा हा गैरसमज लोकांच्या गप्पांच्या अड्ड्यांअड्ड्यांतून चालणार असेल तर 'बर्लिन ब्रॉडकास्ट्स' प्रसिद्ध झाले म्हणूनही काही बिघडणार नाही.''

आणि गमतीची गोष्ट अशी, हे बर्लिन - ब्रॉडकास्ट म्हणजे ज्या जर्मनांनी प्लमला स्थानबद्धतेत टाकले होते त्यांची यथास्थित टिंगल आहे. उपहास आणि उपरोधाचा ती भाषणे म्हणजे एक आदर्श आहे. जर्मनांना

त्यातली खोच कळण्याइतकी विनोदबुद्धी नव्हती हे वुडहाऊसचे भाग्य. नाहीतर त्यांनी त्याला केव्हाच फासावर लटकावला असता. पण आश्चर्य वाटते ते इंग्रजांची विनोदबुद्धी नष्ट झाल्याचे. हिटलरने तेवढ्यापुरता तरी इंग्रजांवर विजय मिळवला होता, म्हणायला हवे. त्यांचा एक विनोदी लेखक शत्रूच्या मुलखात राहून शत्रूची यथेच्छ चेष्टा करीत होता आणि केवळ शत्रूच्या रेडिओवरून ती भाषणे झाली ह्यावरून तो शत्रुपक्षाचा प्रचार ठरवण्यात आला होता. वुडहाऊसच्या ह्या इंग्रजी भाषणांचे भाषांतर करणे खरे म्हणजे अशक्य आहे. पण त्यातूनही, ह्या असल्या अवस्थेत त्याने टिकवून धरलेल्या विनोदबुद्धीचे दर्शन घडते ते अपूर्व आहे. त्या भाषणांची सुरुवातच किती मजेदार आहे.....

> "माझ्या ह्या छोटेखानी भाषणात श्रोत्यांना थोडाफार भोटमपणा दिसेल. काहीसे पाल्हाळही लावल्यासारखे वाटेल - पण ती बाब बर्टी वूस्टरच्या भाषेत सांगायची म्हणजे 'ताबडतोब स्पष्टीकरण देता येण्यासारखी' आहे. मी नुकताच जर्मनांच्या मुलकी तुरुंगातल्या बंदिस्त कोठड्यांतला एकूणपन्नास आठवड्यांचा मुक्काम आटपून बाहेरच्या मोकळ्या जगात आलो आहे. त्यामुळे अजूनही डोक्याचा तोल पूर्णपणाने सावरलेला नाही. ह्याच माझ्या डोक्याची कधीही तोल न जाऊ देण्याच्या गुणाबद्दल सगळीकडे एकमुखाने तारीफ व्हायची."

इथून पुढच्या पाच भाषणांत प्लमने तुरुंगवासातल्या हालअपेष्टांना विनोदाच्या रंगांतून रंगवून काढले आहे. जर्मन कमांडंटच्या ठाण्यापासून त्याचे घर तीन किलोमीटर दूर होते. बॅग गोळा करायला जर्मन अधिकाऱ्यांनी त्याला पाच मिनिटांचा अवधी देऊन लष्करी मोटारीतून घरापर्यंत नेले. वुडहाऊस म्हणतो,

> "मोटारीतून नेल्यामुळे मला वाटले जर्मन मंडळी तशी आपल्यावर खूष असतील. घरी पोचल्यावर थंड पाण्यानं झक्क

शॉवरबाथ घ्यावा, पाईप पेटवून बॅगेत भरायच्या वस्तूंचं चिंतन वगैरे करावं असा विचार होता. पण माझ्याबरोबर आलेल्या जर्मन सैनिकाने 'लवकर आटपा' असं गुरकावल्याबरोबर माझ्या उत्साहावर एकदम पाणी पडलं. त्याच्या मते पाच मिनिटं खूप झाली असं होतं. शेवटी मिनिटांवर तह झाला... माझ्या भावी चरित्रकारांनी हे नमूद करावं. यापुढील काही दिवस स्थानबद्धतेत काढावे लागणार म्हटल्याक्षणी माझ्या मनात पहिला विचार आला तो आता कंबर कसून एकदा समग्र शेक्सपिअर वाचून काढावा हा! गेली चाळीस वर्षं मी समग्र शेक्सपिअर वाचायचा संकल्प सोडतो आहे. तीन वर्षांपूर्वी मी त्या उद्देशाने ऑक्सफोर्ड आवृत्तीदेखील विकत घेतली होती. पण हॅम्लेट आणि मॅक्बेथ पचवून हेन्री द एट्थ भाग एक, दोन व तीनमधलं पुरण पोटात भरणार, इतक्यात आगाथा ख्रिस्तीच्या रहस्यकथेतल्या कशाकडे तरी लक्ष जायचं आणि ढेपाळायला व्हायचं. ही स्थानबद्धता काही वर्षांसाठी होती की आठवड्यांसाठी, याचा काहीच पत्ता नव्हता. पण एकूण परिस्थिती मात्र 'समग्र शेक्सपिअर'कडेच बोट दाखवत होती. म्हणून तो बॅगेत घुसला." ह्या गडबडीत वुडहाऊस एकच गोष्ट बॅगेत भरायला विसरला होता.... त्याचा पासपोर्ट.

बॅग भरून झाल्यावर प्लमला पुन्हा एकदा त्यां जर्मन कमांडरपुढे उभे केले. (ह्या कमांडरचा एक डोळा काच बसविलेला होता. त्या डोळ्याची वुडहाऊसला भारी भीती वाटायची, असे त्याने आपल्या डायरीत लिहिले आहे.) तिथे भरपूर वेळ ताटकळल्यावर वुडहाऊसची यात्रा सुरू झाली.

"ह्या स्थानबद्धतेतल्या प्रवासात एक मोठी उणीव असते. आपल्याला कुठे नेण्यात येत आहे, हे काहीच कळत नाही. म्हणजे आपण शेजारच्या गावात आलो की अर्धा युरोप पालथा घातला याचा थांगपत्ता लागत नाही. आम्हाला लील नावाच्या शहरातल्या

लूस नावाच्या उपनगराकडं नेलं होतं. सत्तर मैलांचे अंतर. पण वाटेत स्थानबद्धांतले इतर 'संस्थापक सदस्य' उचलायचे असल्यामुळं एवढं अंतर काटायला सात तास लागले.''

त्या बसमध्ये ल तुके गावातील जे इतर इंग्रज पकडून कोंबले होते ते सारे त्याच्या परिचयाचे होते.

''पुढं काय वाढून ठेवलं आहे हे कोणालाच ठाऊक नव्हतं. स्थानबद्धतेचा आमचा सगळ्यांचा हा अनुभव. पण प्रत्येक जण आपापले डोके चालवून अंदाज लढवीत होता. आमचा आल्जी म्हणजे मनुष्यरूपी सूर्यकिरणच! निराशेचा अंधकार वगैरे त्याला नामंजूर. आम्हा सगळ्यांची सोय उन्हाळ्याच्या सुटीत राहण्यासाठी बडे लोक एखाद्या उपवनात प्रासादतुल्य बंगले बांधतात, तसल्या बंगल्या-प्रासादात होणार, असा त्याचा होरा होता.

"बंगला?" मी.

"बरोबर, बंगला". आल्जी.

"म्हणजे पुढल्या पोर्चमध्ये पिवळ्या फुलांच्या वेलीबिली चढवलेल्या असतात तसल्या..."

"वेलींचं नक्की नाही. असतीलही किंवा नसतीलही. पण प्रासादतुल्य बंगल्यात होणार हे नक्की. मग आपल्याला पॅरोलवर सोडतील. दिवसभर रानावनातून भटकून यायची परवानगी मिळेल. मला वाटतं, गळ टाकून मासे धरायलाही देतील."

घटकाभर बसमधलं वातावरण प्रफुल्लित झालं. मासेमारीची फारशी हौस नसणारे म्हणाले, "आम्ही आपले उन्हातून हिंडून येत जाऊ."

काही वेळाने लक्षात आले की आल्जीला स्थानबद्धतेतील ओ की ठो ठाऊक नव्हते. बंगल्यातच ठेवायचं तर आमचे बंगले काय वाईट होते? उगीच आमच्या स्वतःच्या बंगल्यातून लोकांच्या बंगल्यात एकदम जथाबंद उचलून नेऊन मुक्कामाला ठेवायची काय

गरज होती? त्यानंतर मात्र आम्ही नक्कीच गारठत चाललो. आशावादाची जागा अस्वस्थतेनं घेतली आणि लील गावाला वळण घेऊन बस उभी राहिली तेव्हा आमच्या उत्साहाच्या पाऱ्यानं शून्याखालचा नवा नीचांक गाठला होता. ती इमारत म्हणजे स्थानिक तुरुंग किंवा विभागीय कारागृह अशाखेरीज इतर कसलीही असणार नाही हे उघड होतं. एका फ्रेंच स्थानिक शिपायाने दरवाजे उघडले आणि आम्ही आत घरंगळलो.''

आता ह्या भाषणात कसला देशद्रोह आला? पण ब्रिटिश प्रचारमंत्र्यांना तो दिसला. बर्लिन रेडिओवरले दहा-दहा मिनिटांचे असे हे पाच टॉक्स. म्हणजे एकूण पन्नास मिनिटे. माणसाला स्थानबद्ध करून त्याचे स्वातंत्र्य हिरावून घ्याल; पण त्या हालांचीही थट्टा करण्याची त्याची ताकद कशी हिरावून घेणार? वुडहाऊसने तुरुंगवासाचे जे वर्णन केले आहे त्यातला उपरोध तर विलक्षण आहे. वुडहाऊस म्हणतो :

''ज्यांनी अजूनही तुरुंगवासाची पहिली शिक्षा भोगली नाही, त्यांना हितासाठी एक गोष्ट सांगायला हवी. मुख्य म्हणजे, असल्या संस्थेत प्रवेश मिळविणं अवघड नाही. एखाद्या मोठ्या हॉटेलात खोली राखून ठेवण्यासारखंच असतं. फरक एवढाच, की दारातल्या स्वागतकक्षात फुलझाडं वगैरे नसतात. स्वतःची बॅग स्वतःलाच उचलावी लागते – आणि नोकराला टिप देण्याची भानगड नाही.

लहानपणापासून निष्पाप आयुष्य काढल्यामुळे, तुरुंगाची आतली बाजू फक्त सिनेमातच काय ती पाहिलेली. तेवढ्यात माझी नजर स्वागतकक्षात बसलेल्या एका अधिकाऱ्याच्या नजरेला भिडली आणि मला पश्चात्ताप झाला. आयुष्यात कधीतरी असा एखादा क्षण येतो, की ज्या वेळी एखाद्या अनोळखी माणसाच्या चेहऱ्याकडे आपली नजर वळते आणि आपल्याला वाटतं, 'वा! दोस्त भेटला.' हा क्षण त्यातला नव्हता. 'सैतानाचे बेट'सारख्या सिनेमातला

वाटावा असा तो इसम माझ्याकडे पाहून मिशीला पीळ भरत होता.

पण लेखकाची जात इतक्या झटक्यात आशा सोडत नसते. मनात उगीचच एक पुसट असा विचार डोकावत होता. आम्हाला पाहुणचारासाठी बोलावणारा आमचा हा यजमान माझं नाव ऐकल्याबरोबर एकदम 'उई उई मॉसिये वोदहाऊस! ....एंब्रेसाजे-मॉय- मेर्त्र'- असं काहीतरी ओरडत उठून उभा राहील. रात्री झोपायला हवा तर माझा पलंग घ्या म्हणेल. वर 'काय सांगू साहेब, तुमचा मी भयंकर चाहता आहे... आमच्या पोरीसाठी स्वाक्षरी देता का?'...असं काहीतरी म्हणेल.

पण तसलं काही झालं नाही. त्यानं पुन्हा एकदा मिशी पिळली. एका भक्कम खतावणीत माझं नाव लिहिलं. 'विडहॉर्स'. आणि 'गुन्हा' ह्या सदरात 'इंग्लिश' असं नोंदवलं. बाजूला हाजिर असलेल्या शिपुड्यांना 'ह्याला कोठडीत नेऊन टाका' असा हुकूम दिला. ती कोठडी मी, आल्जीज बारचा आल्जी (बंगल्यात ठेवतील म्हणणारा.) आणि आमच्या गावातला सालस आणि लोकप्रिय पियानो ट्यूनर विल्यम कार्मेल ह्या तिघांना मिळून देण्यात आली होती. इतर वेळी काय असेल देव जाणे, पण युद्धकाळात दर कोठडीत तिघांना कोंबायचे.

कोठडीचे क्षेत्रफळ बारा गुणिले आठ फूट. सिनेमातल्या कोठड्यांना असतात तसले गजबीज नव्हते. एकच भक्कम लोखंडी दरवाजा. त्यात एक जेवणाची थाळी सरकवायला झडप आणि बाहेरच्या पहारेकऱ्याला आतले रहिवाशी शाबूत आहेत की नाहीत ते पाहण्यासाठी त्या दाराला बाहेरून झाकण लावलेलं भोक. त्या कोठडीत फक्त एक खाट आणि तिच्यावर अंथरूण होतं. त्या भिंतीच्या वरच्या अंगाला एक खिडकी होती. दुसऱ्या भिंतीशी एक लहानसं टेबल. त्यालाच साखळीनं बांधलेली तीन-साडेतीन वीत

उंचीची खुर्ची. कोपऱ्यात नळ होता. त्याच्याखाली बशीएवढे वॉश बेसिन. एक लाकडी शेल्फ आणि भिंतीत एक लाकडी खुंटी.

एकूण सजावट कडकडीत मॉडर्न स्टाइलची. चुना फासलेल्या भिंतीवरची जी काही चित्रं होती ती वेळोवेळी त्या कोठडीत नांदलेल्या फ्रेंच कैद्यांनी काढली होती हे लक्षात यायचं. त्यांनी पेन्सिलीने ठसठशीतपणानं काढलेल्या चित्रांवरून त्या फ्रेंच कैद्यांच्या चित्रकलेच्या बाबतीतल्या विचारधारेत कुठं उच्चभ्रूपणा वगैरे नव्हता. चारी बाजूला ती 'तसली' चित्रं असल्यामुळं 'पॅरिसमधील रंगीला रसूल'सारख्या ग्रंथाच्या पानात आपण सापडलो आहो, असा परिणाम व्हायचा.

आम्हा तिघांत कार्मेल वयाने वडील. त्याला आम्ही खाट दिली आणि आम्ही जमिनीवर पसरलो. दगडी फरशीवर शयन करायचा माझा पहिलाच प्रसंग. पण दिवसभराच्या मर्दुमकीनं थकून गेल्यामुळं पापण्या मिटायला फार वेळ नाही लागला. झोप लागण्यापूर्वीचा माझा एकच विचार मला आठवतो : उतारवयात सभ्य माणसावर हा प्रसंग गुदरणं हे भयंकर आहे खरं. पण त्यातही लेकाची गंमत होती, आणि आपल्या वाट्याला उद्या काय येणार याची मी उत्सुकतेने वाट पाहत होतो.''

ह्या बंदिवासातल्या जेवणाखाण्याच्या हालाचे वर्णनही वुडहाऊस मजेत करतो आणि असे ते मजेत केल्यामुळेच वुडहाऊस त्या स्थानबद्धतेत फार मजेत राहत होता, असा अपप्रचार करायची संधी त्याच्या विरोधकांना लाभली होती. हे म्हणजे उपास घडलेल्या एखाद्याने 'तुरुंगात आम्ही थंडा फराळ केला' म्हणावे आणि विरोधकांनी त्यांना तुरुंगात कुल्फीमलई फ्रीजमधले दहीवडे वगैरे देतात असा प्रचार करावा यासारखे झाले. बंदिवासात न्याहारी म्हणून तिघांना तीन पेले सूप आणि तीन लहान पाव मिळायचे. वुडहाऊस म्हणतो :

"सूप ठीक होतं. त्याच्याशी कसंतरी जमवता येत होतं. पहिला घुटका घेतल्यावर जी चव लागली ती खरोखरीच तशी होती की काय याचा अंदाज घ्यायला दुसरा घुटका घेईपर्यंत ते संपलं. पण सुरीशिवाय पाव कसा कापायचा? तुकड्यातुकड्यांनी कुरतडावा म्हटले तर माझ्या कोठडी-बंधूंचे दात त्यांच्या पोरवयातच निकामी झालेले. बरं, त्या टेबलावर पाव आदळावा म्हटले तर तेही शक्य नव्हतं. टेबलाच्या लाकडाच्या कपच्या उडायच्या. पण संकटातून वाट निघाल्याशिवाय राहत नाही. माझ्याकडे 'पाव-तोड्याची' (लाकूडतोड्यासारखी) सार्वजनिक जबाबदारी आली आणि मला वाटतं, मी ते कार्य समाधानकारक रीतीनं पार पाडलं. कसं का असेना, मी तो पदार्थ विभागू शकलो. त्याची ट्रिक अशी आहे : मानेचा काटकोन करायचा आणि वरच्या दंतपंक्तीवर हे टणक कार्य सोपवून द्यायचं."

एकदा ते तसले अमृततुल्य सूप उकळणाऱ्या स्वैपाकीबुवांची आणि वुडहाऊसची त्या बंदिवासात गाठ पडली. वुडहाऊसने डायरीत लिहिलं आहे :

"आज स्वैपाकीबुवांची गाठ पडली. सूपबद्दल मी त्यांचं अभिनंदन केलं. स्थानबद्धांनी 'सूप कमी पडतं' अशा तक्रारी केल्यामुळं त्यांचा व्यावसायिक अहंकार दुखावला होता. 'मला काय पाणी घालून सूप वाढवता आलं नसतं? - पण ते माझ्या कलेशी व्यभिचार केल्यासारखं झालं असतं.' स्वैपाकीबुवा.

मी म्हटलं, "बरोबर आहे. आमच्या व्यवसायातही तेच आहे. कथा म्हणजे कथा. तिला फुगवून कादंबरी करा-स्वादच जाईल."

ह्या कोठडीतून स्थानबद्धांना 'मोकळी हवा, करमणूक आणि व्यायाम' याच्यासाठी सकाळी साठेआठ वाजता बाहेर काढीत आणि चारी बाजूंना उंच भिंती आणि आकाशाच्या दिशेला थोडेफार उघडे असणाऱ्या

एका कोंडवाड्यात नेऊन अर्धा तास उभे करीत. "तो कोंडवाडा कलकत्त्याचं ब्लॅक होल पाहिलेल्या आणि त्याचं अमाप कौतुक वाटणाऱ्या आर्किटेक्टने रचलेला असावा-" इति वुडहाऊस. कोठडीत भोगाव्या लागणाऱ्या प्रत्येक हालाची त्याने अशी खिल्ली उडवली आहे. जर्मनांच्या ताब्यातल्या त्या फ्रेंच तुरुंगातल्या कोठडीतल्या घाणीचे वर्णन करताना वुडहाऊस म्हणतो,

"आमच्या ४४ नंबरच्या कोठडीतल्या घाण कशी तगड्या, रुंद खांद्यांच्या होतकरू जवानासारखी होती. आम्हाला त्या घाणीचा ळळा लागला-अभिमान वाटायला लागला. इतर घाणीच्या तुलनेने तिची ताकद आणि दर्जा ह्या गुणांच्या श्रेष्ठतेविषयी इतर कैद्यांबरोबर आम्ही पैजा घ्यायला लागलो आणि पहिला जर्मन ऑफिसर जेव्हा आमच्या गाभाऱ्यात शिरला आणि त्या घाणीमुळे दाणकन मागे सरकला त्या वेळी तर आम्हांला आमचा वैयक्तिक सन्मान झाल्यासारखं वाटलं."

त्या कोंडवाड्यातील ती अर्ध्या तासाची मोकळी हवा वगैरे सोडली तर त्या कोठडीत ह्या तिघांना दिवसाचे उरलेले साडेतेवीस तास घालवावे लागत. त्याही अनुभवाची वुडहाऊस विनोदानेच वासलात लावतो :

"समग्र शेक्सपिअरमुळं माझं एक ठीक होतं. पण बार चालवणाऱ्या आल्जीच्या हाताशी कॉकटेल्स करायला दारू नव्हती आणि कार्मेलजवळ ट्यूनिंग करायला पियानो नव्हते. बाकी जवळपास पियानो नसणाऱ्या ट्यूनरची अवस्था वैद्यकीय सल्ल्यावरून शाकाहारावर ठेवलेल्या वाघासारखीच म्हणायला हवी. काही दिवस त्या स्थानबद्धतेत काढल्यानंतर एके दिवशी कमांडर आला आणि म्हणाला की, "तुमचे कागदपत्र तपासून झाल्यावर तुम्हाला इथून हलवलं जाणार आहे. तेव्हा तयार राहा."

जे साठीच्या पुढले असतील त्यांची सुटका करून त्यांना घरी

पाठवण्यात येणार होतं. बिल कार्मेल आणि त्यांच्या वयाच्या इतरांनी एका बाजूला रांग धरली. माझ्या वयाला पावणे एकुणसाठ वर्षं झाल्याच्या जोरावर मीही तिकडे सरकलो. पण मला 'पीछे हटो' केलं. पावणेएकुणसाठ वगैरे चांगलं आहे, पण जितकं चांगलं असायला हवं तितकं नाही, अशी मला समज देण्यात आली.''

दुसऱ्या दिवशी ११ वाजता सूप पाजून सगळ्या स्थानबद्धांना एका व्हॅनमध्ये कोंबले आणि एका रेल्वेस्टेशनात आणले. वुडहाऊस म्हणतो :

''एकूण तिथली धांदल आणि गडबड पाहिल्यावर गाडी साडेअकराला सुटणार असाच एखाद्याने अंदाज केला असता. पण तसं काही नव्हतं. आमचा हा कमांडर गडी भलताच सावध दिसला. मला वाटतं, कधीतरी त्याची गाडी चुकली असावी आणि त्या घटनेचा त्याच्या मनावर खोल परिणाम होऊन त्याच्यात गंड निर्माण झाला असावा. सकाळी ११-४० ला त्याने आम्हाला स्टेशनात पोचवलं आणि गाडी रात्री आठ वाजता हलली. आम्हाला पोचवणारा सार्जंट परतल्यावर त्याचा आणि त्या कमांडरसाहेबाचा जो काही संवाद झाला असेल त्याची कल्पना करता येईल.

"काय? गाडी नीट पकडता आली ना?" कमांडर.

"होय साहेब. आठ तास वीस मिनिटांनी." सार्जंट.

"बाप रे! थोडक्यात मिळाली. यापुढे इतक्या कटोकटी जाऊन चालणार नाही".

सकाळी नुसते पेलाभर सूप पाजून स्टेशनात त्या स्थानबद्धांना आठ-आठ तास रखडत ठेवणाऱ्या दुष्ट कमांडरची वुडहाऊस ह्या थाटात चेष्टा करतो. लूस तुरुंगातून पुन्हा या मंडळींची उचलबांगडी झाली. वुडहाऊस म्हणतो :

''त्या तुरुंगाचा निरोप घेताना माझ्या डोळ्यांत अश्रूबिश्रू काही आले नाहीत, पण वॉर्डरने आमच्या व्हॅनचा दरवाजा बंद

करून 'फिर मिलेंगे' म्हटलं, ते मात्र मला आगाऊपणाचं वाटलं."

"हौ टु' ने सुरू होणारी अमेरिकेत बरीच लोकप्रिय पुस्तके आहेत. "हौ टु विन फ्रेंड्स', 'हौ टु बी ए मिलिओनर' - अशी झटपट रंगारी बनवणारी ही पुस्तके. वुडहाऊसने आपल्या भाषणांना 'पूर्वशिक्षण नसूनही फावल्या वेळात स्थानबद्ध कसे व्हावे?' असे नाव दिले आहे. लूस तुरुंगानंतरचा ह्या चव्वेचाळीस स्थानबद्धांचा आगगाडीचा प्रवास चक्क गुरे न्यायच्या डब्यातून झाला. त्या चेंगराचेंगरीचे वर्णन करताना वुडहाऊस म्हणतो :

> "लहान वयात विड्या वगैरे ओढायची सवय लागल्यामुळे वाढ खुंटलेल्या घोड्यांच्या शिंगरांतली जेमतेम आठ शिंगरे त्या डब्यात मावतील एवढ्या जागेत चाळीस माणसं कोंबली तर ती अवघडणारच. आम्ही पन्नास होतो. रात्री जरा पाय ताणावा म्हटलं तर दुसऱ्या उतारूला लाथ बसायची. त्यालाही असंच काही वाटलं तर आपल्याला. डब्याच्या खालच्या फळ्यांना भोकं होती. त्यांतून बर्फासारखा गार वारा आमच्या तंगड्यांशी रुंजी घालायचा. वरच्या छतावरून येणारा तसलाच वारा आमच्या डोक्याशी खेळायचा. आम्ही सर्व जण चाळिशी-पन्नाशीपलीकडले होतो, पण कुणालाही न्युमोनिया झाला नाही. गुडघे धरणं नाही, पाठ धरणं नाही, काही नाही. मला वाटतं, स्थानबद्धांची काळजी घेणारा एक स्पेशल परमेश्वर असावा."

शेवटी ही दिंडी बेल्जममधल्या लीज गावी आली आणि नाझी सैनिकांनी ह्या लोकांना एका डोंगरी गडावर पिदवत नेले आणि तिथल्या बराकीत बंद केले.

> "...तिथलं वातावरण उत्सवाची तयारी होण्यापूर्वी असतं तसं होतं. पार्टीत पाहुणेमंडळी वेळेच्या आधीच पोहोचल्यावर होईल त्या थाटाचं. सगळा गोंधळ. मुख्यतः जेवणाचा. एखाद्या

विसरभोळ्या कवीवर ही व्यवस्था सोपवली असावी आणि स्थानबद्धांना जेवण लागतं ही गोष्ट तो विसरला असावा.

'खरंच! ताटवाट्या वगैरे लागतात, नाही का? का हो? थेट उकळत्या हंड्यात तोंड घालून सूप मटकावता येणं त्यांना जमण्यासारखं नसेल - नाही का?' असंही तो म्हणाला असेल. शेवटी आम्ही डोकी लढवून तो प्रश्न सोडवला."

डोकी लढवून प्रश्न सोडवला म्हणजे काय केले? त्या बराकीच्या मागल्या बाजूला जुन्या डब्यांचा, बाटल्यांचा, किटल्यांचा आणि मोटारीच्या तेलाच्या डबड्यांचा बेल्जियम सोल्जरांनी टाकून दिलेला ढिगारा साठला होता, तो उपसून ह्या स्थानबद्धांनी आपल्या पेल्यांची सोय केली. वुडहाऊसच्या वाट्याला 'मोटारीच्या तेलाचं रिकामं डबडं' आलं होतं. तो म्हणतो, "त्यामुळे माझ्या सूपला इतरांना न लाभलेली एक चव आली होती."

त्या बराकीत प्रचंड घाण होती. स्थानबद्धांनाच ती साफ करावी लागली. तिथले संडास ही तर खास गोष्ट होती. शिवाय, रोज तीन-तीन वेळा यार्डात आठशे स्थानबद्धांची 'गिनती' करायला तास तास त्यांना उभे करायचे. पाचा-पाचांच्या रांगा धरायला लावायचे. त्या धड कधी लागायच्या नाहीत. दर वेळी बेरीज व्हायची. कॉर्पोरेलसाहेब पुन्हा मोजायला लागायचे.

"एकूण आम्हाला पाच वेळा मोजून काढावं लागे. स्थानबद्ध सॅण्डी यूल, ह्या मोजणी-परेडच्या वेळी आम्ही पाचांच्या रांगेत सातव्या आणि आठव्या नंबराला उभे होतो तेव्हा म्हणाला, 'युद्ध संपल्यावर, माझ्यापाशी जर भरपूर पैसे साठले तर मी एक जर्मन सोल्जर विकत घेऊन बागेत उभा करणार आहे आणि दिवसातून सहा वेळा त्याला मोजून काढणार आहे.'

थोडक्यात म्हणजे, तास न् तास ही आठशेएक स्थानबद्ध

मंडळी उभी आणि कॉर्पोरेल, वॉर्डर, सार्जंट आपले मोजताहेत. एकदा तर चक्क आठ लोक कमी भरले. मग धावाधाव! (जर्मन सार्जंटने तेवढ्यात कुणीतरी रांग सोडली म्हणून जर्मन भाषेतून शिव्या दिल्या. फ्रेंच दुभाष्याने त्या शिव्यांचे फ्रेंचमधून भाषांतर केले.) शेवटी सगळ्यांना पुन्हा बराकीत कोंबून कोठडी बाय कोठडी मोजले, तरीही आठ कमी. सगळे लष्करी अधिकारी चिंतेत. शेवटी फ्रेंच दुभाष्याला आठवले. तो म्हणाला, 'साहेब, हॉस्पिटलमधल्या स्थानबद्धांचं काय?'

अधिकारीगण हॉस्पिटलात धावला. तिथल्या आडव्या झालेल्या स्थानबद्धांची संख्या आठ भरली. ताळेबंद जमला."

एकदा स्थानबद्ध म्हटला की माणसाचा फक्त 'क्रमांक' होतो. वुडहाऊस हा एक असामान्य साहित्यिक होता. कुणाविषयी आकस न ठेवता, कुणालाही माणसांतून उठवण्याचा प्रयत्न न करता आपल्या निर्मळ विनोदाने त्याने लक्षावधी लोकांना आनंद दिला होता. पण स्थानबद्ध झाल्यावर त्याचाही नुसता कैदी नंबर सातशे शहाण्णव झाला.

जर्मन आधिकाऱ्याने त्याला लीजच्या बराकीत संडास साफ करण्याचे काम दिले. रेडिओवरच्या भाषणात त्याने हा अनुभव सांगतानादेखील कुणाची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला नाही. तीच विनोदी धाटणी :

"लीजच्या बराकी साफ करायला आम्हाला फार दिवस लागले. मला कुणाचा अपमान करायचा नाही; पण एक सांगतो, तुम्ही जोपर्यंत बेल्जियम सैनिकांनी वापरलेला संडास साफ करण्यास हातभार लावला नाही, तोपर्यंत मी म्हणेन, की तुम्ही काहीच पाहिलेलं नाही. काही वर्षांनंतर मला जर कुणी येऊन विचारलं की, 'का हो? ह्या महायुद्धात तुम्ही काय केलंत?' तर मी सांगेन, 'लीजच्या बराकीतले संडास साफ केले.' आणि मला प्रश्न

विचारणारा माणूस चटकन 'वाटलंच मला!' असं म्हणणं अशक्य नाही. कारण वारा अनुकूल असला तर अजूनही माझ्या दिशेनं परिमळ दरवळतो. कुणीसं म्हटलंय ना, तुम्ही काचेची फुलदाणी कितीही फोडलीत तरी तिला चिकटलेला गुलाबाचा वास कसा जाणार?''

मला राहून राहून नवल वाटते, की वुडहाऊस त्या बर्लिन ब्रॉडकास्टमध्ये जर्मनांची सतत टोपी उडवतोय हे कोणाच्याच लक्षात कसे आले नाही? आपल्या आवडत्या लेखकाला शत्रूने असे सक्तीने संडास साफ करायला लावले हे ऐकून चीड यायला हवी होती; पण झाले भलतेच. बी. बी. सी. वरून विल्यम कॉनर नावाच्या लेखकाने तर 'हिटलरची स्तुती करण्याच्या कबुलीवर वुडहाऊसने स्वतःची मुक्तता मिळवली' इथपर्यंत गरळ ओकले. त्याच्या त्या टीकेत वुडहाऊस काय बोलला याविषयी अक्षरही नव्हते. त्यामुळे लोकांची समजूत, वुडहाऊस 'नाझी प्रचाराची भाषणं करतो आहे' हीच झाली. बी. बी. सी. च्या गव्हर्निंग बॉडीनेदेखील हे असत्य आहे म्हणून असल्या खोटेपणाला स्थान द्यायचे नाही असे ठरवले; पण प्रचार खात्याच्या मंत्र्यांनी त्यांच्यावर सक्ती करून कॉनरचा वुडहाऊसविरोधी अपप्रचार चालू ठेवला.

लीजहून वुडहाऊस आणि इतर नेहमीचे यशस्वी सातशे नव्याण्णव स्थानबद्ध ह्यांची उचलबांगडी ह्यू नावाच्या एका गडावर असलेल्या कॉन्सेंट्रेशन कँपमध्ये झाली. जीवघेणी थंडी. अंथरूण-पांघरूण नाही. वुडहाऊस म्हणतो : ''प्रवेशद्वारातून शिरल्यावर उजव्या बाजूला एक देखणा संडास होता.'' ह्या स्थानबद्ध शिबिराच्या प्रमुख संचालकांना एकच माहिती होते : ''कुठलाही स्थानबद्ध काहीही करीत असला की त्याला ते करायची मनाई करायची.'' पावाचा तुकडा, कॉफी असावी असा संशय उत्पन्न करणारे एक पेय आणि सुकवलेल्या भाज्या उकळून केलेले सूप. ह्या उपासमारीचे वर्णनही वुडहाऊस गमतीतच करतो :

"...ह्या अपुऱ्या आहाराला पूरक अन्न म्हणून आम्ही निरनिराळे प्रयोग सुरू केले. माझी आगपेटीतल्या काड्या चघळण्यावर श्रद्धा जडली. पुढल्या दातांनी चावून चावून त्याचा लगदा झाला की त्या गिळायच्या. पोट भरत नव्हतं, पण भुकेला आधार म्हणून वाईट नव्हतं. कधीमधी कँटीन उघडलं तर आम्हाला अर्धा इंच रुंद, अर्धा इंच लांब आणि पाव इंच जाड चीज मिळायचं. ते खाण्याची कृती अशी : शेक्सपिअरचे सुनीत छापलेले किंवा टेनिसनच्या एखाद्या बऱ्यापैकी कवितेचं पान घ्यावं, त्यात ते गुंडाळावं...चवीला आगपेटीतल्या चार काड्या टाकाव्या... पदार्थ चांगला लागतो."

ह्यूच्या किल्ल्यातल्या मुक्कामात भोगाव्या लागणाऱ्या ह्या हालांबद्दल वुडहाऊस असा थट्टेने बोलत होता. तिथून मग उत्तर सायलेशियातल्या टोस्ट नावाच्या गावी नेऊन त्यांना एका इमारतीत डांबले. तिथे पूर्वी वेड्यांचे इस्पितळ होते. तीन दिवस आणि तीन रात्री एका जागी बसून आगगाडीचा प्रवास. त्या अवधीत अर्धे सॉसेज, अर्धा पाव आणि थोडे सूप ही मेजवानी. ह्या स्थानबद्धतेत वुडहाऊसचे वजन चाळीस पौंडांनी घटले. भोवताली तर भलता कडक पहारा. मागे, पुढे संगिनी घेतलेले नाझी सोल्जर्स उभे. अशा अवस्थेत ह्या पठ्ठ्याने चक्क विनोदी कादंबरी लिहिली. इथे वुडहाऊसचा मुक्काम बेचाळीस आठवडे होता. स्थानबद्ध मंडळीत रोज एखादी आशादायक अफवा उठायची. ती कधीही खरी ठरत नसे. पण वुडहाऊस मात्र 'ॲन ॲपल ए डे कीप्स द डॉक्टर अवे' ह्या चालीवर म्हणातो : "ए रूमर ए डे कीप्स द डिप्रेशन अवे."

रोजची नवी अफवा मनाचा थकवा दूर सारायची. स्थानबद्धांत प्रोफेसर होते, गायकवादक होते, भाषापंडित होते, व्याख्याते होते. कधीकधी एकमेकांत मिसळायचे क्षण मिळायचे. आलिया भोगासी म्हणत सारे जगत होते. त्यांचे मनोधैर्य विलक्षण होते. वुडहाऊस म्हणतो :

"इतका आनंदी जमाव यापूर्वी मला कधी भेटला नव्हता. त्यांच्यावर माझं भावासारखं प्रेम जडलं होतं." स्थानबद्धतेत अनुभवलेल्या सगळ्या हालांचे वर्णन विनोदात गुंडाळून लोकांपर्यंत पोचवणाऱ्या वुडहाऊसच्या ह्या भाषणांचा शेवट मात्र हृद्य आहे. शेवटपर्यंत त्याची कल्पना अशी, की भाषणे अमेरिकन कंपनीने अमेरिकेतल्या श्रोत्यांसाठी ध्वनिमुद्रित केली आहेत. त्याची इंग्लंडमध्ये अशी विपरीत प्रतिक्रिया होत आहे हे त्याच्या स्वप्नातही नव्हते. बंदिवासात रेडिओ कुठून ऐकणार? ह्या भाषणांमुळे अमेरिकेतल्या आपल्या शेकडो वाचकांना आपण जिवंत आहोत आणि स्थानबद्धतेतल्या हालांना पुरून उरलो आहोत हे कळावे ही इच्छा. म्हणून इंग्रज नागरी स्थानबद्ध क्रमांक ७९६ ह्या भूमिकेतून तो शेवटी म्हणतो :

> "मी स्थानबद्धतेत असताना अमेरिकेतल्या ज्या दयाळू लोकांनी मला पत्रं पाठवली त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. अशा पत्रांचं, विशेषतः मला ज्या प्रकारची पत्रं आली तशा पत्रांचं स्थानबद्धाला वाटणारे मोल ज्याला कधी तुरुंगवास घडला नाही त्याला कळणार नाही."

महायुद्ध संपले. वुडहाऊसवर झालेल्या अन्यायाबद्दल ब्रिटिश पार्लमेंटमध्ये वादविवाद झाला. संपूर्ण चौकशी झाली. वुडहाऊस निर्दोषी होता हे ठरले. मरणापूर्वी वर्ष-दीड वर्ष आधी ब्रिटिश राणीने त्याला 'सर पेल्हॅम' केले. पण बूंद से गयी वह हौद से नहीं आती. त्याला एकच समाधान होते : ज्या पिढीने आयुष्यात कधी हाडामांसाचा बटलर किंवा लॉर्ड पाहिला नाही, विसाव्या शतकाच्या आरंभकाळातले इंग्लंड पाहिले नाही, ती नवी पिढीसुद्धा सत्तर वर्षांपूर्वीच्या त्याच्या वाचकांसारखी लक्षावधींच्या संख्येने त्याची पुस्तके वाचून मनमुराद हसत होती.

त्र्याण्णव वर्षांचा वुडहाऊस. त्याची एकोणनव्वद वर्षांची बायको एथेल. तिच्याविषयी विल्यम टाऊनएडला लिहिलेल्या पत्रात वुडहाऊस

म्हणतो :

> "बायका काय वंडरफुल असतात, नाही? एथेलनं हे सारं कसलीही तक्रार न करता सहन केलं. किती विलक्षण, सुरेख होतं तिचं वागणं! गेली तीस वर्षं आपल्या प्रेमातून आणि कौतुकातून ती मला स्फूर्ती देत आली. त्याचा त्या काळात तिनं नवा उच्चांक गाठला."

संध्याकाळची वेळ. बंगलीच्या ओसरीवर हे वृद्ध जोडपे शेरी पीत बसले होते. 'न्यूयॉर्कर'चा लेखक हर्बर्ट वॉरन विंड पाहुणा म्हणून आला होता. वृद्ध एथेल आपला नवरा टी. व्ही.वर त्याला अजिबात न कळणारा अमेरिकन फूटबॉलचा खेळ पाहत बसतो म्हणून थट्टा करीत होती. आयुष्यभर अमेरिकेत राहिलेला प्लम हा मनाने इंग्रजच राहिला. क्रिकेट हाच त्याला कळणारा खेळ, आणि गोल्फ. त्यातला तर तो उस्ताद होता. पण अमेरिकन फूटबॉल? खेळता खेळता खेळाडू एकत्र येऊन गोल कोंडाळे काय करतात, रेटा देऊन बॉल काय पळवतात.... त्यात वुडहाऊसला काही कळत नसे. मग वुडहाऊस सांगायला लागला, "अगं, मला अमेरिकन फूटबॉल कळतो असं नाही. पण मजा काय ती ठाऊक आहे तुला? ते भिडू धावपळ सुरू करतात आणि मध्येच एकत्र जमून कोंडाळं करून क्रीडाविषयक चर्चा करतात."

थोडा वेळ स्तब्धता होते. बंगलीपुढच्या हिरवळीकडे आणि काठावरच्या उंच वृक्षांच्या रांगेकडे दोघेही शांतपणाने पाहतात. मग वुडहाऊस म्हणतो, "किती छान दिसतात नाही हिरवळीवर उतरलेली ही संध्याकाळची उन्हं!....."

जीवनाच्या संध्याकाळीही त्याच्या मनात तशीच हिरवळ होती. तशीच उन्हे होती. स्थानबद्धतेतही हाल आणि त्याहूनही त्याच्या लाडक्या इंग्लंडने त्याचा कोणताही अपराध नसताना केलेले त्याचे हृदयशून्य चारित्र्यहनन त्या अंतर्मनातल्या हिरवळीचा हिरवेपणा आणि प्रकाश नष्ट

करू शकले नव्हते. जर्मनीने इतके हाल करूनही "प्लम, तुला जर्मन लोकांचा तिटकारा येत नाही का?" ह्या प्रश्नाला उत्तर देताना प्लम म्हणाला होता, "गड्यांनो, मी असा घाऊक तिटकारा कधी करीत नाही."

त्या दिवशी आगगाडीत मी वुडहाऊसचे पुस्तक उघडले. पहिल्या परिच्छेदातच हसू फुटले, पण हसता हसता डोळ्यांत पाणी आले ते केवळ हसण्यामुळे आले असे नाही वाटले!

●●●

# ओझें, भाग्यवंता, निरोप व नाही माझ्या चुलीपाशी

इंदिरा संत

## ओझें

*किती उन्हे वर आली, उठवले तर उठत नाही*
*घरातला हा मोठा मुलगा, घरासारखे रहात नाही*
*मला हाका मारू नका, माझा चहा झाकून ठेवा*
*माझी वाट पाहू नका, माझे ताट वाढून ठेवा*
*मनापासून वागत नाही*
*वडीलधाऱ्यांत मिसळत नाही भावंडांत रमत नाही*
*बारीकसारीक घरची कामे, याचा काहीच संबंध नाही*
*काही विचारले, बोलत नसतो*
*काही सांगितले, उठून जातो*
*दारांत स्कूटर फरफटते*
*आला....... गेला......... एवढेच कळते*
*ह्याच्या वेळी, दिवस राहिले...... दिवस भरता अवघडून गेले*
*अवघडणेंही असह्य झाले......... कधी सुटेन*
*हिशेबाचे क्षण क्षण मोजत राहिले*
*तशीच आज मनोमनी*
*ओझ्याने या अवघडून गेले*

कधी सुटेन....... हिशेबाचे गणित मात्र
हरवून बसले.

## भाग्यवंता

भरात उभी केळ
गर्भरेशमी हिरवीगार
गर्द पोपटी पानांआड
बाळ गोजिरे कडेवर
घड चालला पोसत
मन आटत चालले
घड पिवळा तेजाळे
केळ त्यायिली वल्कले
बाळ चालला दिगंती
केळ तृप्तीत मोडली
अशी भाग्यवंता आई
एका केळीत भेटली

## निरोप

हे लहानसेच घर
आंब्याफणसांच्या सावलीचे. समोर
झुलणाऱ्या बांबूंचे. आल्या-गेल्याचे. पाहुण्यांचे.
मुलाबाळांचे. लाडक्या मुक्या प्राण्यांचे
आमचे दोघांचे.
कित्येक सुखाच्या लहरी याच्या भिंतींनी
ध्वनिमुद्रित करून ठेवल्या असतील
कित्येक दुडदुडणारी पावले याच्या जमिनीने

वत्सलांच्छनासारखी जपून ठेवली असतील
कित्येक कोसळणाऱ्या क्षणांना याच्या
कौलाराने आधार दिला असेल
भाजून काढणाऱ्या उन्हाच्या झळांतून
याने मला दिलासा दिला आहे.
घोंघावत येणाऱ्या वादळांतून यानेच मला सावरले आहे.
खिडक्यांच्या गजांनी माझे अश्रू पुसले आहेत.
याला सोडून निघताना माझे काळीज
वितळेल. आणि हे -
खिडक्या दारे मिटून भरल्या मनाने आशीर्वाद देत
मागेच उभे राहील.... आईसारखे.

## नाही माझ्या चुलीपाशीं

नाही माझ्या चुलीपाशी, ताका मेढीचे अप्रूप
कशी ठेवीन बांधून, त्याचे अवखळ रूप?
नाही माझ्या अंगणात, जोडी अर्जुनवृक्षाची
कशी आडवीन त्याची, रीत खट्याळपणाची?
लहानशा झोपडीला, नाही कवाड-कडीही
कशी ठेवीन कोंडून, त्याची अनघड धिटाई?
मी न राधा, ना यशोदा, नाही गोकुळीची कोण
मथुरेची ही मी कुब्जा, नित्य घाशिते चंदन
चंदनाचे वेढे घेता, फक्त गोळी सहाणेशी
गंध जातो, कुठे जातो, ज्याच्यासाठी त्याच्यापाशी
कुणी कुणाला बांधणे, कुणी कुणाला कोंडणे
माझे चंदनाचे बन, त्याचे वारियाचे येणे

●●●

# प्राध्यापिका :
# काही रोमांचकारी अनुभव

गंगाधर गाडगीळ

मी कॉलेजचा प्रिन्सिपॉल झालो आणि माझा भाव भलताच वधारला. स्टाफरूम नामक गोठ्यात इतके दिवस बसणारा मी स्वतःच्या प्रशस्त ऑफिसात बसायला लागलो. डोक्यावर पंखा, बसायला झुलती - फिरती खुर्ची, हाताशी इलेक्ट्रिकची घंटी, एका कोपऱ्यात सोफा आणि शिवाय अटॅच्ड बाथरूम. आमच्या स्टाफरूमध्येसुद्धा घंटा असे, पण ती हातानं बडवावी लागे आणि ती कितीही बडवली, नव्हे ठेचली तरी शिपाई काही उगवत नसे. उलट इथे मी घंटेवर बोट दाबलं की शिपाई तत्परतेनं धावत यायचा. एकंदरीत काय, भलतीच मिजास!

तेव्हा मग जाहिरात देऊन मी प्राध्यापकांच्या जागांसाठी अर्ज मागवले. अर्ज पाहू लागलो तर काय, बहुसंख्य बायांचे; आणि त्या सुद्धा सगळ्या भलत्याच क्वालिफाइड. फ्रेंचच्या अर्धवेळ जागेसाठी अर्ज करणारी बाई फ्रान्समध्ये वर्षभर राहून आलेली होती. इंग्लिशच्या जागेसाठी अर्ज करणारी विदुषी एल्फिन्स्टन कॉलेजात शिकलेली होती, आणि पुन्हा पार्शीण. म्हणजे आहे काही बोलायची शहामत! इकॉनॉमिक्ससाठी जिचा अर्ज आला होता त्या बयेनं इकॉनॉमिक्स घेऊन दिल्ली युनिव्हर्सिटीत भलतेच मार्क मिळविले होते. अशा सगळ्या एकीहून एक सरस.

त्या मानाने पुरुष अर्जदार म्हणजे भलतेच ऑर्डिनरी होते. इंग्लिशचा

अर्जदार जेमतेम सेकंड क्लास मिळवलेला आणि तोसुद्धा रामनारायण रुइया किंवा अशाच कुठच्या तरी भटजी कॉलेजचा विद्यार्थी. म्हणजे कटापच. इकॉनॉमिक्ससाठी ज्यानं अर्ज केला होता तो पोर्ट ट्रस्टमध्ये कारकून होता आणि फावल्या वेळात अभ्यास करून त्यानं सेकंड क्लास गाठला होता. मराठीच्या जागेचा इच्छुक एन. सी. सी. त गेलेला होता, हाच त्याचा पराक्रम. उलट त्याच्या स्पर्धेला चिपळूणकर प्राइझ मिळवलेल्या दोन जगदम्बा उभ्या होत्या.

इंटरव्ह्यूमध्ये तर पुरुष उमेदवार साफ गारद झाले. एल्फिन्स्टनमधल्या पार्शिणीनं थेट ऑक्सफर्ड ॲक्सेंट लावला. मी तिला काही तरी प्रश्न विचारला तेव्हा तिनं तुच्छतापूर्वक नाकाला अशी काही अस्सल विलायती सुरकुती पाडली, की पुढे काही बोलायचा मला धीर झाला नाही. एल्फिन्स्टन कॉलेजचं हेच वैशिष्ट्य. नुसत्या नाकाला तुच्छतादर्शक सुरकुत्या पाडून तिथली मंडळी भाव खात असतात. उलट आमच्या भटजी कॉलेजातले गुरुजी. इतके नर्व्हस होते, की हे वर्गावर जाणार कसे, याचा प्रश्न होता. इकॉनॉमिक्ससाठी अर्ज करणाऱ्या पोर्ट ट्रस्टमधल्या गृहस्थांनी काही प्रश्नांनंतर आपण अर्थशास्त्र पार विसरून गेलो आहोत, अशी कबुली दिली. कारण त्यांना एम. ए. होऊन एक वर्ष झालं होतं. केवळ तीन महिने केलेला अर्थशास्त्राचा अभ्यास एक वर्षभर डोक्यात राहील, अशी अपेक्षा करणं अर्थातच गैर होतं. उलट दिल्लीवाली बया भलतीच टेचात होती. त्यातला भपका वगळला तरी अर्थशास्त्र तिला थोडंबहुत माहीत होतं.

हिंदीच्या अर्धवेळ जागेसाठी जी विदुषी आली ती विक्रम का आग्रा युनिव्हर्सिटीची एम. ए. पीएच. डी. आणि बी. टी. तर होतीच, पण आणखी काय काय बरंच होती. ती आली तीच मुळी बगलेत प्रचंड ओझं घेऊन आली. मला वाटलं, की ती सरळ स्टेशनवरून बाडबिस्तरा घेऊन आली असावी. पण तिनं ते ओझं माझ्या टेबलावर ठेवलं तेव्हा मला

आढळून आलं, की तो तिचा प्रबंध होता. तो पाहून माझी छाती दडपूनच गेली. मग तिनं विजयी मुद्रेनं एक प्रचंड भेंडोळं काढलं. बऱ्याच परिश्रमांनंतर मी ते उलगडलं तेव्हा त्यात मला पदव्यांची प्रमाणपत्रं, नाना सर्टिफिकेटं, प्रशस्तिपत्रं, वृत्तपत्रांतील कात्रणं वगैरे जबरदस्त मालमसाला आढळला.

मी घाबरून ते पुडकं बाजूला सारलं, तेव्हा मी ते अथपासून इतिपर्यंत तेथल्या तेथे वाचावं अशी तिनं आग्रहाची सूचना केली. आणि मी ती मनावर घेत नाही असं जेव्हा तिनं पाहिलं, तेव्हा ते पुडकं ओढून आपल्या हातात घेऊन ती ते मला साद्यंत वाचून दाखवू लागली. त्यावरून असं आढळून आलं, की एन. सी. सी., कॉलेजची व्हॉलिबॉल टीम, वक्तृत्व स्पर्धा वगैरे अनेक गोष्टींत तिनं भाग घेतला होता. शिवाय स्थानिक रोटरी क्लबच्या वतीनं तिनं सामाजिक कार्यही केलं होतं.

सुमारे एक तासानंतर हा इंटरव्ह्यू संपला तेव्हा मी पार थकून गेलो होतो. मी मनाशी असा निर्णय घेतला, की ह्या विदुषीचा राष्ट्राध्यक्षपदासाठी विचार व्हावा असं इंदिरा गांधींना ताबडतोब कळवायचं.

ह्या विदुषीशी स्पर्धा करणारा पुरुष उमेदवार मुंबई विद्यापीठाचा फाटका एम. ए. होता.

मराठी चिपळूणकर का कसलं प्राइझ मिळवणारी जगदम्बादेखील अशीच जबरदस्त होती. शाळेत असताना ती खो-खो चमूची कर्णधार होती, आणि तिची एक कविता चक्क सत्यकथेत छापून आली होती. सत्यकथेचा असा उल्लेख झाल्यावर मी साहजिकच नतमस्तक झालो. नंतर ती कविता प्रा. सरोजिनी वैद्य यांनाही आवडल्याचं तिनं मला सांगितलं, तेव्हा तर माझं मस्तक इतकं खाली झुकलं, की ते टेबलावर आपटलं.

या महामायेशी स्पर्धा करणारा पुरुष इच्छुक फाटका सेकंड क्लास एम. ए. होता. पण तो अंगापिंडानं चांगला मजबूत असून पुन्हा एन. सी.

सी. त ऑफिसर होता. आमच्या कॉलेजला तर एन. सी. सी. च्या ऑफिसरची फार गरज होती. तेव्हा मात्र सत्यकथा आणि सरोजिनीबाई वैद्य यांची मनोमन क्षमा मागून त्याचीच नेमणूक केली.

पण बाकी मात्र एकजात सगळ्या बायांची नेमणूक मी करून टाकली. आमच्या निवडसमितीवर एक अनुभवी गृहस्थ होते. ते म्हणाले, "अहो, तुम्ही इतक्या सगळ्या लेडीज नेमताय – जरा विचार करून काय ते करा."

पण माझ्या अंगात जोतीबा फुले, आगरकर, महर्षी कर्वे वगैरे मंडळींचा एकाच वेळी संचार झाला होता. मी निर्णायक स्वरात म्हटलं, "आमच्या कॉलेजात गुणवत्तेनुसारच नेमणुका होणार. हा पुरुष आणि ही स्त्री हा भेद मी करणार नाही."

ते अनुभवी गृहस्थ हसले आणि निघून गेले. मीदेखील नेमणूकपत्रांवर सह्या करून मोकळा झालो.

नंतर मग मनात शंका आली, की ह्या बायांना वर्गातले दीडशे टोळभैरव आवरतील का? की हरिनामाचा गजर कॉलेजात सारखा चालू राहील?

पण कॉलेज सुरू झाल्यावर चार दिवसांतच माझी शंका फोल असल्याचं मला आढळून आलं. अहो, काय त्या बायांचा दरारा! मी वर्गावरून फेरी मारत असताना आमची पाच फूट एक इंच उंचीची आणि शहाण्णव पौंड वजनाची अर्थशास्त्राची लेक्चरर बोट उगारून दम देत होती- 'यू देअर, यू ऑन द लास्ट बट वन बेंच..." आणि एक दीडशे पौंडांचा म्हसोबा गरीब गाईसारखा उभा राहून आज्ञाधारकपणे मान हलवीत होता. पुढल्या वर्गावर जातो तो इंग्लिश शिकवणारी पार्शीण तोंडातल्या तोंडात काही तरी सांगत होती आणि एक घाबरंघुबरं झालेलं पोरगं ते बोर्डावर लिहीत होतं. त्याच्या पुढच्या वर्गातलं दृश्य पाहून तर मला आश्चर्याचा धक्काच बसला. तिथं तीन चिरंजीव भिंतीकडे तोंड करून

उभे होते. त्या वर्गात कोण बया आहे ते पुढं होऊन पाहण्याचा धीर मला झाला नाही. कारण तिनं मलाही भिंतीकडे तोंड करून उभं राहायला सांगितलं असतं तर मी काय करणार होतो?

तेवढ्यात एका वर्गातून प्रचंड गजर ऐकू आला, म्हणून लगबगीनं तिथं गेलो तर आमचे मजबूत देहाचे आणि एन. सी. सी. त ऑफिसर असलेले प्राध्यापक घामाघूम होऊन मोठमोठ्यानं ओरडत होते व दणादण टेबल वाजवीत होते आणि समोर दीडशे पोरं शिमगा करीत होती. ही आमच्या मर्द पुरुषांची अवस्था!

मधली सुट्टी झाली तेव्हा चिडलेल्या पोरांचा एक घोळका माझ्याकडे आला. पोरं तावातावानं म्हणत होती, "सर, म्हणजे याचा अर्थ काय? सरळ भिंतीकडे तोंड करून उभं राहायला लावायचं म्हणजे काय हे कॉलेज आहे की शाळा आहे?"

मी त्यांना समजावून परत पाठवलं आणि आमच्या प्राध्यापिकांना बोलावून सांगितलं, "जरा सबुरीनं घ्या. पोरांवर इतकी दहशत बसवणं बरं नव्हे. मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात अजून कोणा प्राध्यापकानं मुलांना भिंतीकडे तोंड करून उभं केलेलं नाही, आणि तो विक्रम आपल्या कॉलेजात व्हावा असं मला वाटत नाही."

"पण सर, तुम्हीच सांगितलं होतं, की अगदी कडक राहायचं म्हणून." त्या चौघी-पाच जणींनी माझ्याकडे अशा काही नजरेनं पाहिलं, की चूक माझीच आहे हे मला ताबडतोब पटलं. तुमचंच चुकलं हे नुसत्या नजरेनं सिद्ध करायची केवढी जबरदस्त शक्ती स्त्रीच्या अंगी असते त्याचा मला पुन्हा एकदा प्रत्यय आला. शेवटी कशीबशी त्यांची समजूत काढून मी त्यांना परत पाठवलं.

एकंदरीत कॉलेज ठीक चाललं आहे, अशा गोड कल्पनेत मी असताना पुरुष प्राध्यापकांचा एक मोर्चाच माझ्या ऑफिसात दाखल झाला.

सी. त ऑफिसर होता. आमच्या कॉलेजला तर एन. सी. सी. च्या ऑफिसरची फार गरज होती. तेव्हा मात्र सत्यकथा आणि सरोजिनीबाई वैद्य यांची मनोमन क्षमा मागून त्याचीच नेमणूक केली.

पण बाकी मात्र एकजात सगळ्या बायांची नेमणूक मी करून टाकली. आमच्या निवडसमितीवर एक अनुभवी गृहस्थ होते. ते म्हणाले, "अहो, तुम्ही इतक्या सगळ्या लेडीज नेमताय – जरा विचार करून काय ते करा."

पण माझ्या अंगात जोतीबा फुले, आगरकर, महर्षी कर्वे वगैरे मंडळींचा एकाच वेळी संचार झाला होता. मी निर्णायक स्वरात म्हटलं, "आमच्या कॉलेजात गुणवत्तेनुसारच नेमणुका होणार. हा पुरुष आणि ही स्त्री हा भेद मी करणार नाही."

ते अनुभवी गृहस्थ हसले आणि निघून गेले. मीदेखील नेमणूकपत्रांवर सह्या करून मोकळा झालो.

नंतर मग मनात शंका आली, की ह्या बायांना वर्गातले दीडशे टोळभैरव आवरतील का? की हरिनामाचा गजर कॉलेजात सारखा चालू राहील?

पण कॉलेज सुरू झाल्यावर चार दिवसांतच माझी शंका फोल असल्याचं मला आढळून आलं. अहो, काय त्या बायांचा दरारा! मी वर्गावरून फेरी मारत असताना आमची पाच फूट एक इंच उंचीची आणि शहाण्णव पौंड वजनाची अर्थशास्त्राची लेक्चरर बोट उगारून दम देत होती- 'यू देअर, यू ऑन द लास्ट बट वन बेंच..." आणि एक दीडशे पौंडांचा म्हसोबा गरीब गाईसारखा उभा राहून आज्ञाधारकपणे मान हलवीत होता. पुढल्या वर्गावर जातो तो इंग्लिश शिकवणारी पार्शीण तोंडातल्या तोंडात काही तरी सांगत होती आणि एक घाबरंघुबरं झालेलं पोरगं ते बोर्डावर लिहीत होतं. त्याच्या पुढच्या वर्गातलं दृश्य पाहून तर मला आश्चर्याचा धक्काच बसला. तिथं तीन चिरंजीव भिंतीकडे तोंड करून

उभे होते. त्या वर्गात कोण बया आहे ते पुढं होऊन पाहण्याचा धीर मला झाला नाही. कारण तिनं मलाही भिंतीकडे तोंड करून उभं राहायला सांगितलं असतं तर मी काय करणार होतो?

तेवढ्यात एका वर्गातून प्रचंड गजर ऐकू आला, म्हणून लगबगीनं तिथं गेलो तर आमचे मजबूत देहाचे आणि एन. सी. सी. त ऑफिसर असलेले प्राध्यापक घामाघूम होऊन मोठमोठ्यानं ओरडत होते व दणादण टेबल वाजवीत होते आणि समोर दीडशे पोरं शिमगा करीत होती. ही आमच्या मर्द पुरुषांची अवस्था!

मधली सुट्टी झाली तेव्हा चिडलेल्या पोरांचा एक घोळका माझ्याकडे आला. पोरं तावातावानं म्हणत होती, "सर, म्हणजे याचा अर्थ काय? सरळ भिंतीकडे तोंड करून उभं राहायला लावायचं म्हणजे काय हे कॉलेज आहे की शाळा आहे?"

मी त्यांना समजावून परत पाठवलं आणि आमच्या प्राध्यापिकांना बोलावून सांगितलं, "जरा सबुरीनं घ्या. पोरांवर इतकी दहशत बसवणं बरं नव्हे. मुंबई विद्यापीठाच्या इतिहासात अजून कोणा प्राध्यापकानं मुलांना भिंतीकडे तोंड करून उभं केलेलं नाही, आणि तो विक्रम आपल्या कॉलेजात व्हावा असं मला वाटत नाही."

"पण सर, तुम्हीच सांगितलं होतं, की अगदी कडक राहायचं म्हणून." त्या चौघी-पाच जणींनी माझ्याकडे अशा काही नजरेनं पाहिलं, की चूक माझीच आहे हे मला ताबडतोब पटलं. तुमचंच चुकलं हे नुसत्या नजरेनं सिद्ध करायची केवढी जबरदस्त शक्ती स्त्रीच्या अंगी असते त्याचा मला पुन्हा एकदा प्रत्यय आला. शेवटी कशीबशी त्यांची समजूत काढून मी त्यांना परत पाठवलं.

एकंदरीत कॉलेज ठीक चाललं आहे, अशा गोड कल्पनेत मी असताना पुरुष प्राध्यापकांचा एक मोर्चाच माझ्या ऑफिसात दाखल झाला.

त्यांतला एक तावातावानं म्हणाला "सर, ह्याचा तुम्ही काहीतरी बंदोबस्त केलाच पाहिजे."

"बंदोबस्त? आणि तो कशाचा?" मी आश्चर्यानं विचारलं.

"कशाचा म्हणजे? ह्या-ह्या लेडीजचा. तुम्ही त्यांना फार शेफारून ठेवलं आहे." त्या प्राध्यापकांचा सात्त्विक संताप अनावर झाला होता.

"शेफारून? आणि मी? आहे तरी काय हा प्रकार?"

"म्हणजे? आम्हीच काय म्हणून सगळी कामं करायची? ह्या इव्हिनिंग क्लासची लेक्चर घेणार नाहीत. का, तर म्हणे रात्री एकट्यानं कसं जायचं-यायचं? घेतलं तर फक्त पहिलं घेतात. मग आम्ही बसतोय नऊ वाजेपर्यंत. जिमखाना या चालवणार नाहीत. कारण त्यात आऊट-डोअर वर्क असतं. मॅगेझिन चालवायला यांना एक पुरुष असिस्टंट लागतो. कारण प्रेसमध्ये जाऊन प्रुफांची ने-आण या कशा करणार? स्टुडंट्स युनियनच्या कार्यक्रमासाठी या तीननंतर थांबणार नाहीत. कारण चार वाजता यांची मुलं शाळेतून परत येतात..."

आरोपांची यादी संपली म्हणून नव्हे, परंतु श्वास घेण्यासाठी म्हणून सदरहू प्राध्यापक थांबले.

तेवढ्यात एका स्वास्थ्यप्रिय मध्यमवयीन प्राध्यापकांनी सूर लावला, "सर, मुख्य म्हणजे या स्टाफरूममध्ये सारख्या वॅक-वॅक करीत असतात. डोकं उठवतात, सर."

"वॅक-वॅक? म्हणजे काय?"

"सारख्या आपसांत बडबडत असतात.... न थांबता. वर्गात इतकं बोलल्यावर यांना आणखी बोलायला एनर्जी कशी राहते कोण जाणे आणि स्टाफरूममध्ये जी छोटी केबिन आहे ना - शांतपणे बसण्यासाठी केलेली-ती यांनी बळकावली आहे."

"बळकावली आहे?"

"होय सर. सगळ्या आत घुसून बसतात आणि आत वेणीफणी

करतात. मग आम्ही कसं जायचं आतमध्ये? भलत्या जहांबाज आहेत!''

त्या जहांबाज होत्या हे मला ताबडतोब पटलं. कारण त्या गोष्टीचा मलाही थोडाफार अनुभव आला होता.

तेवढ्यात एक उसळत्या रक्ताचा तरुण प्राध्यापक ओरडला, ''आणि सर, त्यांतली एक स्टाफरूममध्ये स्वेटर विणते. ते फार अनॉयिंग होतं सर. त्याला तुम्ही बंदी घातली पाहिजे.''

''पण युनिव्हर्सिटीचा असा नियम नाही, की स्टाफरूममध्ये स्वेटर विणू नये म्हणून.'' मी युनिव्हर्सिटीची नियमावली चाळू लागलो.

''मग तुम्ही करून घ्या, सर. ॲकॅडेमिक कौन्सिलपुढे रेझोल्युशन मांडा.'' तो तरुण प्राध्यापक भलताच बिथरला होता.

पुरुष प्राध्यापकांची कशीबशी समजूत काढून मी त्यांना वाटेला लावलं आणि प्राध्यापिकांना बोलावणं धाडलं. ताबडतोब त्यांची फौज येऊन दाखल झाली. त्या युद्धाला तयार होत्या हे त्यांच्या मुद्रांवरून सहज ओळखता येत होतं.

मी खाकरून शक्य तितक्या सौम्यपणे पुरुष प्राध्यापकांच्या तक्रारी त्यांना सांगितल्या.

त्यासरशी त्यांतली एक उसळून म्हणाली, ''तुम्ही स्वेटर विणायला बंदी घालणार असाल, तर सिगरेट ओढायलादेखील बंदी केली पाहिजे. त्याचा आम्हाला फार त्रास होतो.''

मी घाईघाईनं हातातली सिगरेट विझवली.

''त्या त्रासामुळेच आम्ही आतल्या केबिनमध्ये जाऊन बसतो.'' दुसरीनं सूर लावला.

आपण फार बोलतो हा आरोप ऐकून तर त्या सर्व जणींना आश्चर्याचा धक्काच बसला. उलट काही पुरुष प्राध्यापक उगीचच चोंबडेपणानं येऊन आपल्याशी हास्यविनोद करायचा प्रयत्न करतात, अशी त्यांची तक्रार होती.

या वादातून काही निष्पन्न होणार नाही हे ओळखून मी म्हटलं, "हे पाहा, बाकी सगळं राहू द्या. पण कामाच्या बाबतीत पुरुष आणि स्त्री असा भेद या कॉलेजात केला जाणार नाही. सर्वांना सारखा पगार मिळतो, तेव्हा सर्वांनी सारखं काम केलं पाहिजे."

माझं म्हणणं त्यांनी एकदम मान्य केलं आणि आपण पुरुष प्राध्यापकांइतकंच काम करतो, हे टाइमटेबल काढून मला दाखवून दिलं.

"रात्री नऊ वाजेपर्यंत तुम्हीदेखील लेक्चर्स घेतली पाहिजेत." मी टेबलावर निर्णायकपणे हात आपटला.

थोडा वेळ दाट शांतता. मग त्यांतली एक साळसूदपणे म्हणाली, "आमची काहीच हरकत नाही. फक्त रात्री घरी पोहोचवायला आम्हाला प्यून द्या."

या कामासाठी किती प्यून ठेवावे लागतील याचा मी घाईघाईनं हिशोब केला आणि म्हटलं, "शक्य नाही."

एकच कलकलाट! आणि मग रात्री एकट्यानं प्रवास करणाऱ्या बायांवर किती दुर्धर प्रसंग ओढवतात त्याचं भीषण चित्रण माझ्यापुढे करण्यात आलं. एक बाई म्हणे साडीशिवायच घरी आली होती. तिच्या सर्वांगावर काळेनिळे वळ होते. दुसरी जी बेपत्ता झाली ती अजून परत आलेलीच नव्हती. तिसरी रक्ताच्या थारोळ्यात मरून पडलेली दुसऱ्या दिवशी आगगाडीत सापडली होती. तिची मुलं अजून आकांत करीत होती.

ही वर्णनं ऐकून माझं नीतिधैर्य पार खचून गेलं. रोज माझ्या एका प्राध्यापिकेचा गळा दाबला जातो आहे आणि याला कारणीभूत झालेला नरराक्षस प्रिन्सिपॉल, अशी माझी दिगंत कीर्ती होत आहे, असं चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभं राहिलं.

पुन्हा प्रत्येक प्राध्यापिका खलास झाली म्हणजे कॉलेजला एक-एक दिवस सुट्टी द्यावी लागली असती, आणि दुसऱ्या दिवशी शोकसभा घेऊन त्यांच्या गुणवर्णनपर भाषण मला करावं लागलं असतं, ह्या नुसत्या

कल्पनेनं माझ्या अंगावर शहारे आले आणि मी तडजोडीला तयार झालो.

बरीच घासाघीस झाल्यावर तडजोड झाली ती अशी : या प्राध्यापिका पहिलं लेक्चर घेऊन सव्वासात वाजताच पळत असत, त्याऐवजी त्यांनी रात्री आठ वाजेपर्यंत काम करावं. प्रत्येकीला वेगळा प्यून देणं शक्य नसल्यामुळं सर्वांना मिळून एकच प्यून द्यावा. त्यानं घरापर्यंत न पोहोचवता फक्त स्टेशनपर्यंत पोहोचवायचं.

मी सुटकेचा निःश्वास सोडला आणि प्राध्यापिकांच्या संरक्षणासाठी एका दांडग्या प्यूनची नेमणूक केली. पुन्हा कलकलाट करीत त्या आल्या आणि तो प्यून आम्हाला पसंत नसल्याचं त्यांनी सांगितलं. आता आणखी दांडगा प्यून कोठून आणावा, असा प्रश्न मला पडला. पण तेवढ्यात त्यांनीच एका प्यूनचं नाव सुचवलं. तो अगदी म्हातारा आणि लुकडा होता. तो त्यांचं काय संरक्षण करणार, असा मला प्रश्न पडला. पण मी तो त्यांना विचारला नाही. म्हटलं, कटकट मिटली ना, पुष्कळ झालं!

पण खरं म्हणजे कटकट मिटली नव्हती. ते कसं ते सांगण्यासारखं आहे; पण ती एक वेगळीच फिरकी होईल.

## प्राध्यापिका : आणखी रोमांचकारी अनुभव

मी प्राध्यापिकांच्या बाबतीत कडक धोरण स्वीकारायचं ठरवलं खरं, पण ते काही बेटं जमेना. उलट त्यांच्याच कडकपणामुळं सारं कॉलेज जेरीला आलं. स्टाफ टी-क्लबसाठी चहा करणारे प्यून रडकुंडीला आले. कारण चमचा चमचा साखरेचा हिशोब त्यांना द्यावा लागायचा. एका आठवड्याला साखर जरा जास्त लागली तर दुसऱ्या आठवड्याला अगोड चहा प्यायला लागायचा.

स्टुडंट्स युनियनच्या सेक्रेटरीनं टॅक्सीवर खर्च केला तर बाई त्याला बसचे पैसे देऊन वरचे पैसे खिशातून भरायला लावायच्या. त्यामुळे नवा सूट मिळायचं तर सोडाच, पण त्याच्या अंगावर होता तो बुशशर्ट जायची

पाळी आली. पगारवाढ अठ्ठावीस तारखेला असली आणि तीन दिवसांचा वाढलेला पगार पुढल्या महिन्यात देऊ, असा जर अकाउंटंटनं विचार केला, तर त्याची अशी उलटतपासणी व्हायची, की आपण गुन्हेगार आहोत असं त्याला पटायचं. शिपायांना दिवाळीचं पोस्त इतक्या काटकसरीनं दिलं जाऊ लागलं, की ते भलतेच नाराज झाले. इतकंच नव्हे, तर सारे प्रोफेसर घरी गेल्यावर प्रिन्सिपॉल गुपचूप स्टाफ टी-क्लबमधून आणखी एखादा कप चहा घेतात की काय, अशी चौकशी एका संशयी प्राध्यापिकेनं केली. एकंदरीत काय, सगळं कॉलेज अगदी बेजार होऊन गेलं.

पुन्हा या बायांची एकजूट अशी विलक्षण, की काही विचारू नका. यांची एकजूट मोडल्याशिवाय काहीही करता येणार नाही, असा सल्ला एका सीनियर प्राध्यापकांनी मला दिला, तेव्हा ते कसं करावं याबाबत मी त्यांना सल्ला विचारला. बराच वेळ विचार केल्यावर त्या प्राध्यापकांनी नैराश्यपूर्ण सुस्कारा सोडला आणि काहीच सल्ला न देता ते निघून गेले.

पण पुरुषजातीला जे केवळ अशक्य वाटलं, ते निसर्गक्रमानं एके दिवशी आपोआप घडून आलं. मी ऑफिसात बसून स्टुडंट्स युनियनच्या हिशोबाचा तंटा सोडवत होतो.

स्टुडंट्स युनियन चालवणाऱ्या बाईंनी आपल्या पद्धतीनं एका वहीत हिशोब लिहून ठेवले होते आणि अकांउंटन्सीचे प्राध्यापक हातवारे करून म्हणत होते, “हे काय हिशोब झाले? यातलं मला एक अक्षरदेखील कळत नाही.”

प्राध्यापिका रागावून म्हणाल्या, “न कळायला काय झालं? चांगले व्यवस्थित लिहिलेले आहेत! अगदी पै-पैचा हिशोब आहे. पार्टीच्या वेळी सामोसे उरले तर तेसुद्धा मी निम्म्या किमतीला प्रोफेसरांना विकले. पाहुण्याला टॅक्सीतून आणलं तर मी त्यांना रिसीव्ह करताना मीटरचे पैसे एका डोळ्यानं पाहते. आणि तरी...”

अकाउंटन्सीचे प्राध्यापक आपल्या मनावर भयंकर ताबा ठेवीत म्हणाले, "अहो, तसं नव्हे – पण अकाउंट्स एका विशिष्ट पद्धतीने लिहावे लागतात. त्यासाठी व्हावचरं करावी लागतात. आता हा टॅक्सीचा खर्च झाला – त्याचं व्हाउचर कुठे आहे?"

"म्हणजे टॅक्सीवाल्याला काय मी बिल द्यायला सांगू? असं कुठे देतात का?" बाईंनी बिनतोड उत्तर दिलं.

"मग ते आपण बनवायचं."

"पण मी लिहिलं आहे ना वहीत."

अकाउंटन्सीचे प्रोफेसर अवाक होऊन नुसतेच आपले केस उपटू लागले.

मी खाकरून म्हटलं, "तसं नाही - पण त्याची एक मेथड आहे. त्याप्रमाणे.."

"म्हणजे तुम्ही कंटेंटपेक्षा फॉर्मलाच अधिक महत्त्व देता. आम्ही इतकं जीव तोडून काम करावं..." बाई इंग्रजीच्या प्राध्यापिका असल्यामुळे त्यांनी फॉर्म आणि कंटेंट माझ्या तोंडावर फेकला.

"धिस इज इंपॉसिबल." अकाउंटन्सीचे प्रोफेसर किंचाळले.

"तर मग तुम्हीच लिहा कसे ते अकाउंट्स". बाईंनी आपली वही त्या प्राध्यापकांसमोर आदळली.

तेव्हा अकाउंटन्सीचे प्राध्यापक ताडकन उठले आणि तरातरा निघून गेले.

मी घाईघाईनं टेबलाच्या खणातून रुमाल काढला. कारण बाईंच्या डोळ्यांत अश्रू तरारताना मला दिसत होते आणि प्राध्यापिकांनी रडणं या गोष्टीची मला आता सवय झाली होती.

पहिल्यानं प्राध्यापिका माझ्या खोलीत रडली तेव्हा मी इतका घाबरून गेलो होतो, की काही विचारू नका. तिला मी समज द्यावी म्हणून तिच्या हेड ऑफ द डिपार्टमेंटने तिला माझ्याकडे पाठवलं होतं आणि मी

प्रिन्सिपॉल लोक देतात त्या पद्धतीनं तिला समज दिली होती. पाहता पाहता ती वाद घालायची थांबली. तिचा चेहरा गोरामोरा झाला, आणि ती एकदम ओक्साबोक्शी रडू लागली की हो.

मी इतका घाबरलो, की काही विचारू नका! टेबलाखाली लपावं की खिडकीतून उडी मारून पळून जावं ते मला कळेना. मी अत्यंत क्रूर आणि दुष्ट मनुष्य आहे, अशी माझी खात्री पटली. उद्या मुंबईतले सगळे प्राध्यापक प्रचंड मोर्चा काढून मला या गोष्टीचा जाब विचारणार याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नव्हती.

त्या प्राध्यापिकेची मी कशीबशी समजूत काढून तिला वाटेला लावली आणि मग घाईघाईनं मी कॉलेजातल्या एका सिनियर प्राध्यापिकेला बोलावलं आणि झालेला प्रकार तिला अपराधी मुद्रेनं सांगितला.

त्या सीनियर प्राध्यापिका म्हणाल्या, "तुम्ही फार कडक आहात."

मी अपराधी मुद्रेनं होकारार्थी मान हलवली.

"दुसऱ्यांना लागेल असं बोलता."

मी पुन्हा अधिकच अपराधी मुद्रेनं मान हालवली.

"आणि पुन्हा तसलीच ती आहे." सीनियर प्राध्यापिकाबाईंनी पुस्ती जोडली.

"तसलीच म्हणजे?"

"कांगावा करते. खोट्टं रडते."

माझ्या भिवया आकाशात उडाल्या. "खोट्टं रडते? अहो असं कसं होईल? चांगल्या ओक्साबोक्शी रडल्या. असं मुद्दाम रडता येईल का?"

सीनियर प्राध्यापिका हसल्या आणि म्हणाल्या,

"त्यात काय आहे? मी दाखवू रडून?"

"नको नको." मी घाईनं म्हटलं.

नंतर बराच वेळ स्त्री हा किती गूढ आणि लुच्चा प्राणी आहे याचा मी उद्विग्न मनानं विचार करीत होतो. एकदा वाटलं, की आपण आता

अगदी कठोर व्हायचं. आपल्यासमोर कोणी धो धो रडलं तरी आपण विरघळायचं नाही. पण पुन्हा प्रश्न पडला, की रडणं खोट्टं कुठचं आणि खरं कुठचं ते कसं ओळखायचं? नाही तर आम्ही मारे रडणं खोट्टं म्हणून कठोर मुद्रा करून बसायचो आणि ते बेटं रडणं खरं असायचं.

तेव्हा रडण्याची ही भानगडच नको, म्हणून मी प्राध्यापिकांना काही बोलायचं नाही असं ठरवलं. पण तरी रडण्यातून माझी सुटका झाली नाही. एकदा एका प्राध्यापिकेची आई वारली म्हणून सहानुभूती दाखवली तर अश्रूंच्या महापुरात वाहून जायची पाळी आली. दुसऱ्यांदा... जाऊ दे झालं. सांगायचं इतकंच, की प्राध्यापिकांच्या अश्रूंनी माझ्या टेबलाचं पॉलिश जाऊ लागलं आणि म्हणून मी अर्धा डझन रुमाल आणून माझ्या खणात ठेवून दिले. प्राध्यापिका रडणार अशी चिन्हं दिसू लागली की मी घाईघाईनं खणातला रुमाल काढू लागलो.

त्याप्रमाणे सदरहू, स्टुडंट्स युनियनचे अकाउंट्स स्वतंत्र पद्धतीने लिहिणाऱ्या प्राध्यापिकेच्या डोळ्यांत अश्रू तरारले. तेव्हा मी खणातून रुमाल बाहेर काढला.

परंतु प्रस्तुत प्राध्यापिकेला अश्रुविमोचनाची संधी त्या दिवशी मिळाली नाही. कारण रुदनाची पूर्वतयारी होत असतानाच माझ्या ऑफिसचं दार धाडदिशी उघडलं आणि आमचे स्वास्थ्यप्रिय मध्यमवयीन प्राध्यापक घाबऱ्याघुबऱ्या आत येऊन म्हणाले, "अहो, बघा बघा – तिकडे काय चाललं आहे ते."

"काय चाललं आहे?"

"भयंकर! फारच भयंकर."

"अहो, पण काय?"

"भांडण! कडाक्याचं भांडण!"

"कोणाचं?"

"दोघींचं. त्या .... त्या दोघींचं." प्राध्यापकांना सविस्तर आणि

सुसंगत बोलणंदेखील अशक्य झालं होतं.

हे ऐकून रडण्याची पूर्वतयारी थांबवून माझ्या ऑफिसातल्या प्राध्यापिकाबाई ते आकर्षक दृश्य बघायला तुरुतुरु धावत गेल्या, आणि त्यांच्या मागोमाग मीदेखील धावलो.

स्टाफरूममध्ये तुंबळ संग्रामच चालला होता. दोन प्राध्यापिका आक्रमक पवित्र्यात उभ्या राहून भेदक आणि स्फोटक शब्दांचा एकमेकींवर भडिमार करीत होत्या. त्या दोघी एकदम बोलत होत्या, तरीदेखील दुसरी काय बोलते आहे ते प्रत्येकीला ऐकू येत होते आणि त्या एकमेकींना समर्पक उत्तरं देत होत्या.

त्यांचं ते युद्धकौशल्य पाहून मी तर थक्कच झालो. कौतुकानं टाळ्या वाजवाव्या आणि युद्धाला अधिकच उत्तेजन द्यावं असं मला वाटत होतं; पण प्रिन्सिपॉल या नात्यानं माझी जबाबदारी ओळखून मी दोन्ही हात उभारून आवाहन केलं, "लेडीज, लेडीज... प्लीज, प्लीज..."

याहून अधिक मला बोलता येईना. कारण माझं वक्तृत्व मला सोडून गेलं होतं आणि त्यांच्या वाक्‌सरिता मात्र धो धो वाहत होत्या.

पुन्हा हात उभारून मी म्हटलं, "लेडीज- लेडीज..."

बऱ्याच वेळा असं आवाहन केल्यावर युद्ध थांबलं आणि मग अश्रुसरिता वाहू लागल्या. नंतर प्रत्येकीनं माझ्या ऑफिसात येऊन आपली बाजू मला सांगितली, आणि अर्थातच माझ्या खणातले दोन रुमाल खराब झाले.

या दोघी प्राध्यापिका शिकवणाऱ्या उत्तम होत्या. विद्यार्थ्यांना त्या आवडत असतं, आणि यामुळेच दोघींत चुरस लागली. मग त्यांतल्या एकीने एक दिवस वर्गात दुसरीच्या शिकवण्याबद्दल काही तरी शेरा मारला. विद्यार्थ्यांनी अर्थातच उत्साहानं तो दुसरीच्या कानावर घातला. तेव्हा दुसरीने आपल्या वर्गात पहिलीबद्दल चांगले दोन-चार शेरे मारले. आणि ते केवळ शिकविण्याबद्दलच नव्हते. मुलांनी अर्थातच

आज्ञाधारकपणे ही गोष्ट पहिल्या प्राध्यापिकेच्या निदर्शनाला आणली. तेव्हा पहिलीनं आपलं अर्धं लेक्चर दुसरीच्या गुणावगुणांची छाननी करण्यात खर्च केलं. त्याबद्दल दुसरीनं स्टाफरूममध्ये पहिलीला जाब विचारला, आणि त्यातूनच ते घनघोर युद्ध निर्माण झालं होतं.

झालं! एकजूट भंग पावली. पाहता पाहता त्या युद्धात सामील न झालेल्या प्राध्यापिका एक अ़गर दुसऱ्या पक्षात सामील झाल्यामुळे खरं म्हणजे मला आनंद व्हायला हवा होता; पण दोन्ही पक्ष माझ्याकडे येऊन ज्या कागाळ्या सांगू लागले, त्या ऐकता ऐकता मी अगदी बेजार होऊन गेलो.

त्यांच्या तक्रारी आणि निवेदनं ऐकून माझ्या कॉलेजात कट आणि कारस्थानं यापलीकडे काही होतच नाही असं मला वाटू लागलं. दोन्ही पक्ष एकमेकांना शह आणि प्रतिशह देण्याकरिता ज्या क्लृप्त्या लढवीत त्या ऐकून कोणत्याही देशाच्या गुप्तहेरांच्या प्रमुखानं आश्चर्यानं तोंडात बोटं घातली असती. त्या काळात या बाया घरी स्वयंपाकात तिखटमीठ घालीत नसाव्यात. तर ते सगळं तिखटमीठ कॉलेजात आणून त्या मसालेदार गोष्टी तयार करीत आणि त्या मला ऐकवीत. ह्यांची एकजूट परवडली, पण हे भांडण नको असं मला होऊन गेलं.

त्यातच या प्राध्यापिकांची मुलं फटाफटा आजारी पडू लागली. एकदा एका प्राध्यापिकेला मी म्हटलं, "आज चार वाजेपर्यंत थांबा. स्टुडंट्स युनियनचा कार्यक्रम आहे. त्यावर देखरेख करा."

त्यावर ती म्हणाली, "पण सर, आज नाही जमायचं."

त्यावरं मी संतापून म्हटलं, "ते नाही काही चालायचं. रोज दोन वाजता पळता. एक दिवस थांबलात तर काय होणार आहे?"

ताबडतोब त्या प्राध्यापिकेच्या मुद्रेवर हौतात्म्याचा भाव पसरला. ती म्हणाली, "ठीक आहे. तुम्ही म्हणता तर मी थांबते. पण मी निघाले तेव्हा माझ्या मुलाच्या अंगात दोन ताप होता."

मी दचकून म्हणालो, “दोन? अरे बाप रे!”

“नाही, पण काही हरकत नाही. मी थांबते.”

“अहो, असं काय करता? दोनाच्या वर ताप गेला तर डोक्यावर बर्फाची पिशवी धरावी लागते ना? त्याची काही व्यवस्था केली आहे का?

“घरात मोलकरीण आहे. ती बघेल.”

“अहो, पण तिला ताप बघता येतो का? आणि काही भलतंच झालं म्हणजे?” मी अगदी घाबराघुबरा झालो.

“नको, पण तुम्ही म्हणताय तर मी आपली थांबते.” तिचा चेहरा जणू दृढनिश्चयाच्या खडकातूनच खोदून तयार केला आहे असं वाटत होतं.

“अहो, मेहेरबानी करा...” आणि अशा बऱ्याच विनवण्या करून मी त्या निग्रही महिलेला मोठ्या मिनतवारीनं घरी पाठवली. बालहत्येच्या भयंकर पातकातून आपण वाचलो म्हणून मग मी सुस्कारा सोडला.

दुसऱ्या दिवशी एकीचा फोन आला की मुलाला फ्ल्यू झाला आहे, तेव्हा येता येत नाही. तिसऱ्या दिवशी आणखी दोघींच्या मुलांना गोवर झाला. नंतर एकीच्या मुलीला कावीळ झाली.

मुलं इतकी आजारी पडतात आणि त्यांची इतकी देखभाल करावी लागते, याची मला कल्पनाच नव्हती. या बाबतीत मला इतकं अज्ञानात का ठेवलंस, असा प्रश्न कमरेवर हात ठेवून बायकोला विचारला. तेव्हा ती हातवारे करून म्हणाली, “आपल्या मुलांना कधी बोट लावलें नाहीं, आणि आता प्राध्यापिकांच्या मुलांची मात्र चिंता करताय.” या तिच्या खोचक बोलण्याला उत्तर देणं अर्थातच शक्य नव्हतं. पण इतकं मात्र खरं, की थोडक्याच दिवसांत मी पहिल्या दर्जाचा बालरोगतज्ज्ञ झालो. फ्ल्यू झाला म्हणजे किती दिवसांची कॅज्युअल लीव्ह आणि कावीळ झाल्यावर किती आठवड्यांची लौकर घरी जाण्याची सवलत, याचं गणित मला पाठ झालं. नव्हे, त्याचं एक कोष्टकच मी तयार केलं.

त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात तीन प्राध्यापिका फार लठ्ठ होत आहेत आणि एकंदरीत मंद गतीनं चालत आहेत असं मला आढळून आलं. हे असं का व्हावं, याचा मी विचार करीत असतानाच त्यांपैकी एक रजेचा अर्ज घेऊन आली.

"तीन महिने? इतकी कशाला?" अर्ज वाचून मी खुर्चीतून उडालोच.

प्राध्यापिका काहीच बोलली नाही. मग माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी म्हटलं, "माय गॉड!" आणि मुकाट्यानं रजा मंजूर केली. तेवढ्यात दुसरी आली, आणि मग तिसरी. मला घेरी येणार असं वाटू लागलं.

१ डिसेंबरपासून त्या रजेवर जाणार होत्या, आणि एक मार्चला म्हणजे लेक्चर्स थांबल्यावर त्या कामावर रुजू होणार होत्या. मग पंधरा दिवस कॉलेजात नुसतं येऊन बसणं आणि नंतर तीन महिन्यांची उन्हाळ्याची सुट्टी!

ह्या सगळ्यांचं एकाच वेळी हे कसं काय जमून आलं याचा मी विचार करीत होतो. तेवढ्यात एका अनुभवी प्रिन्सिपॉलनी मला सांगितलं, की प्राध्यापिका या नेहमी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातच प्रसूत होतात.

आयत्या वेळी तात्पुरते प्राध्यापक मिळणं शक्य नव्हतं. म्हणून या प्राध्यापिकांचं काम पुरुष प्राध्यापकांना वाटून द्यावं लागलं. त्यामुळं ते इतके बिथरले, की मी दिसलो म्हणजे खाऊ का गिळू अशा नजरेनं माझ्याकडे पाहू लागले.

आणि मी कॉलेजचा प्रिन्सिपॉल असून माझ्याच कॉलेजात एखाद्या चोरासारखा वावरू लागलो.

●●●

# शिवराया, अनावरण व ज्योतीराव

कुसुमाग्रज

## शिवराया

*महाराज,*
*प्रस्थापित आकाशाचा भेद करून*
*भविष्याचं अंतराळ शोधणारा*
*तुमचा प्रदीप्त इतिहास*
*आम्हाला समजतच नाही.*

*आम्ही देऊ पाहात आहोत*
*तुम्हाला तिकीट*
*या पार्टीच्या आमदारकीचं,*
*त्या पार्टीच्या खासदारकीचं,*
*देऊ पाहात आहोत नायकत्व*
*या जातीचं, त्या जमातीचं,*
*आणि करू पाहात आहोत*
*तुम्हाला महान बेडूक*
*आमच्या या दीड वितीच्या*
*गटारलेल्या डबक्यातील.*

# अनावरण

मी तुमच्या पुतळ्याचं
बाबासाहेब,
आज अनावरण केलं.
(तुम्हाला कळलंच असेल)
आणि नंतर
तुमच्या पुतळ्याला
डोळे मिटून भाविकतेनं
नमस्कार केला.
('नाटक केलंस बामणा?')
नाटक?
थोडंफार असेलही
लोकांच्या नजराच
नाटकाला जन्म देतात
ते पृथ्वीवर वावरणाऱ्या
कोणालाच चुकत नाही.
('ऐकलंय-''जग ही रंगभूमी'' वगैरे')
कबूल आहे, पण
सारंच नाटक नव्हतं.
निमिषार्ध-
अगदी निमिषार्ध बाबासाहेब,
माझ्या दृष्टीतून अवतरला -
एक श्रद्धाशील श्रमण
बोधिवृक्षाच्या तळाशी बसलेल्या
तथागताकडे पाहाणारा.

('कविता करतोस काय यमक्या?')
नाही बाबासाहेब,
'तुम्ही' हा विषय
कवितेत मावणारा नाही
हे पूर्वीच लक्षात आलंय माझ्या.
रंगीत फुग्यामध्ये
आकाश पकडण्यासारखं...
आणि तरीही
सहस्र कविता लिहिल्याचं
अपूर्व समाधान
त्या क्षणी मला मिळालं.
('लोकांच्या टाळ्या घेतल्याचं?')
तेही असतंच,
कोणत्याही व्यासपीठावर
टाळ्यांची तोरणं
बांधावी लागतातच.
पण मला मिळालं
'ते' समाधान नव्हतं,
तो एक अद्‌भुत 'अनुभव' होता.
त्या क्षणार्धात मी
माझ्या संगमरवरी चौथऱ्यावरून
खाली-खोल-खोल--
कोसळत गेलो
कड्यावरून दरीत
भिरकावलेल्या दगडासारखा
थेट पातळतळापर्यंत,

जेथे
'खाली' ही संज्ञाच
शिल्लक राहिली नव्हती.
त्या तळावरून
मी तुमच्या पुतळ्याकडे पाहिलं
तेव्हा पुतळा दिसलाच नाही,
दिसत होता
जाणवत होता
एक विराट दाहक तेजोगोल
सूर्याच्या कोरोनासारखा

## ज्योतीराव

तुमचा देहाकार पुतळा
ज्योतीराव, आज राजधानीत
राजधानीच्या गर्भागारात
थाटानं उभा राहिला -
आनंद वाटला.
टाळ्यांनी गजरलेली भाषणं
हारतुऱ्यांच्या राशी
(हे तुमच्या समाजाला प्रोत्साहनच)
वृत्तपत्रांतून फोटो, स्फुटे, इत्यादी -
हेही आनंददायकच.
ज्योतीराव परवडत नसले तरी
त्यांचे पुतळे आम्हाला परवडतात
आणि वर्षातून एकदा

घनघोर आठवतात
लांबरुंद लफ्फेदार भाषणांसाठी -
'हेही नसे थोडके.'
जेव्हा ज्योतीराव,
चंद्रसूर्य मावळतात,
तेव्हा त्या घनांध काळोखात
काजव्यांनाही
प्रकाशदाते म्हणावं लागतं.
थांबा - ज्योतीराव,
तुमच्या हातातला आसूड
असा क्रोधानं उगारू नका.
तुमचं सारं सत्यशोधन
गावागावातल्या भिंतींवरती
कोळिष्टकासारखं
चढून बसलं आहे.
मान्य आहे...
जातीयतेवर पहिला
वज्रकठोर प्रहार करणारं
तुमचं महर्षीपद
आम्ही माळ्यांच्या जमातीत
रेटलं आहे,
मान्य आहे...
तुम्ही दिलेले प्रकाशकिरण
सत्तालालसेच्या गटारात
आम्ही फेकले
आणि तुम्हाला केले

फक्त भोई
सरंजामी पालख्यांचे,
मान्य आहे...
पण एक लक्षात ठेवा, ज्योतीराव,
तुम्ही आता फक्त
पुतळा आहात,
पुतळ्यांना अधिकार नसतो
संतप्त होण्याचा,
भोवतालच्या व्यवहारात उतरण्याचा,
त्यांना अधिकार असतो फक्त
जयंतीमयंतीच्या हारांचा,
आणि एरव्ही,
काकादिक पक्ष्यांच्या
विष्ठाप्रधान सहवासाचा.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3492
२६८३३
२११८३
शाखा

# तातू सामंत : एक पिशानवल्ली

जी. ए. कुलकर्णी

तातू सामंत म्हणजे एक पिशानवल्ली पोरगा होता. त्याच्या डोक्याला बरोबर बसणारी टोपी जगात अद्याप निर्माण न झाल्याप्रमाणे एक टीचभर टोपी तुळतुळीत डोक्यावर कुठे तरी ठेवून बेडूकडोळ्यांनी समोर पाहत तो वर्गात स्वस्थ बसलेला असे. तो पेन्सिलदेखील ओठाजवळ एखाद्या चिलमीप्रमाणे धरी. त्याची ही सवय सुधारायच्या बाबतीत साऱ्याच मास्तरांनी हात टेकले होते व चिलम्या सामंत असे त्याचे नाव पडून गेले होते. त्या वेळी वर्गाला खेळ सक्तीचे असत. केवळ त्यामुळे आठवड्यातून दोनदा तो ग्राऊंडवर दिसे. फूटबॉलच्या वेळी तर तो इतरांच्यापेक्षा जास्त वेगाने धावे. फूटबॉलला पाऊल मारण्यासाठी नव्हे, तर तो धावणारा फूटबॉल आपल्याला खाऊन टाकण्यासाठी आपल्या मागे लागला आहे, असे वाटून त्याच्यापासून सुटण्यासाठी. तेथून सुटून तो एकदा परत आला व धापा टाकत पेन्सिल तोंडाशी धरून बसला की घंटा होईपर्यंत जगाला हरवलाच.

कातडी फुग्याला लाथा मारणे किंवा फळकुटाने चेंडू बडवत राहणे हे अगदी खुळचटपणाचे काम आहे, असे तो स्पष्ट सांगत असे. त्यामुळे तो वर्गात फारसा लोकप्रिय नव्हता. त्याच्या घरी फक्त त्याची आईच होती. अगदी थेट सांगाड्याप्रमाणे दिसणारी तशी दुसरी बाई आम्ही कधीच पाहिली नाही. तातूला घरी जायला पाच मिनिटे उशीर झाला की ती

शाळेच्या कोपऱ्यावर येऊन थांबे, आणि तातू येताच त्याच्या खांद्यावर हात ठेवून चालू लागे. याबद्दल पोरे तातूची चेष्टा करत; पण तो मात्र अगदी मख्खपणे चालत असे. त्याने कधी आईचा हात खांद्यावरून काढला नाही, की शाळेकडे येऊ नको असे तिला बजावले नाही. तातूबरोबर कुणी घरी गेले की त्याची आई बशीभर पोहे देत असे. खोबऱ्याचा स्पर्शदिखील नसलेले ते पोहे हाडाच्या तुकड्यांप्रमाणे वाटत आणि ते खाताना आमचे त्राण संपे. त्यात भर म्हणजे ती बशीत थोडेदेखील उरवू देत नसे. आमच्या पाठीवर हात ठेवून बशीतले सारे संपवण्याचा तिचा आग्रह बशी रिकामी होईपर्यंत चालूच असे. जर कधी कुणी दातदुखीची सबब सांगितली तर ती लाहीपीठ देत असे. पण तो घट्ट काळसर गोळा पाहताच भूक लगेच मरत असे, व त्यापेक्षा पोहे परवडले, असे वाटू लागे.

तातू तिसरीत आमच्या वर्गात आला, आणि मॅट्रिक होईपर्यंत पाच वर्षे आम्ही शेजारी शेजारी बसलो. त्याच्या शेजारी बसण्याचे मला आणखी एक कारण होते. माझ्या खालोखाल त्याची सर्वांत जास्त वेळा वर्गातून हकालपट्टी झाली होती. हो, दामले मास्तरांकडून त्याची कधी हकालपट्टी झाली नव्हती आणि आता ते शक्य नव्हते. कारण आता ते निवृत्त होऊन नागपूरला गेले होते. उलट आपटे मास्तरांनी मला कधी बाहेर घातले नव्हते. ते तातूने दोनदा साधले होते. त्यांच्याकडून मी कधी हाकलला जाणे शक्य नव्हते. कारण मी बहुधा त्यांच्या तासाला बसतच नसे. आपटे मास्तरांच्या नावावर शास्त्र व भूगोल हे विषय होते, पण स्वतःच्या विषयांखेरीज इतर उचापतींतच त्यांना जास्त रस असे. प्रदर्शने भरवणे, सहली काढणे, नाचगाणी बसवणे हे त्यांचे खरे धंदे. त्यांच्या भावाचे पुस्तके-वह्यांचे दुकान होते. त्या दुकानातून पेपर, वह्या घेण्याविषयी ते सगळ्यांना दटावणी करत. त्यांची बायको एक भजनी मंडळ चालवत असे, तर तिची धाकटी बहीण सकाळपासून संध्याकाळपर्यंत बेल घालत गावात भटकत असे.

एकदा आपटे मास्तरांनी कोणताही एक प्राणी अगर पक्षी याविषयी त्याचे खाणे, त्याची राहण्याची पद्धत ही माहिती गोळा करून एक निबंध तयार करण्यास सांगितले होते. त्यात तातूचा निबंध सर्वांत प्रसिद्ध ठरला. त्याला त्याबद्दल वर्गाबाहेर जावे लागले, आणि प्रिन्सिपॉलकडून आठ आणे दंड झाला. तो कधी प्रत्यक्ष द्यावा लागला नाही ही गोष्ट निराळी. त्याने एका चतकोर कागदावर लिहिले होते, "पेंग्विन पक्षी आमच्या गल्लीत कुणाकडेच नाही. त्यामुळे त्याच्या खाण्यापिण्याविषयी माहिती मिळत नाही. पण तो दिसायला असा असतो," असे लिहून त्याखाली त्याने कुठून तरी मिळविलेले पेंग्विनचे एक लहान चित्र चिकटवले होते. एकदा पृथ्वीचा गोल काढून आणा, असा अभ्यास असता त्याने एक गोल काढला. त्यावर पर्वताचे शिखर दाखवले व लिहिले : "शंकर - पार्वतीचे निवासस्थान गौरीशंकर," आणि खाली नागाचा फणा काढून त्याने लिहिले : "पृथ्वी डोक्यावर धरणारा शेष." तत्काळ झालेला परिणाम म्हणजे वर्गातून हकालपट्टी! पण त्याची ग्रहणाची आकृती पाहिल्यानंतर मात्र आपटेंनी त्याचा पाठलाग बंद केला. त्याने एका कागदावर काळ्या कागदाचे एक वर्तुळ तेवढे चिकटवलेले होते. पृथ्वी कोठे आहे, असे विचारताच आपण पृथ्वीवरूनच ग्रहण पाहत आहो, असे त्याचे उत्तर होते. मग सूर्य तरी कुठे आहे, तर तो चंद्राप्रमाणे आहे; कारण खग्रास सूर्यग्रहण आहे, असा त्याचा जबाब हजर! वास्तविक ड्रॉइंगचे एकत्र असलेले दोन तास म्हणजे आरामाची वेळ. दड्डीकर मास्तर 'काही तरी डिझाइन काढा,' असे सांगत व आपल्या लहान खोलीत जाऊन माळ ओढत कसला तरी जप करत बसत. एकदा मुद्दाम तिकडे जाऊन "डिफिकल्टी आहे" असे सांगून तातूने त्यांना वर्गात बोलावून आणले आणि विचारले, "सर, मी एका निग्रो मुलीचे चित्र काढले आहे. ती लाजली आहे. ती लाजली आहे, असे दाखवायला तिच्या गालावर कसला रंग वापरू?" तेव्हापासून तातूला ड्रॉइंग हॉल बंद झाला. एकदा शाळेत समाजकार्य करणाऱ्या बाईचे अगदी

चोख मोजून घ्यावे असे ऐसपैस नऊवारी भाषण झाले. अगदी वैतागाने रेगे मास्तर आम्हाला म्हणाले, "या बायकांचे समाजकार्य तत्काळ थांबविण्यास आता एकच मार्ग उरला आहे. सारा समाजच नष्ट केला पाहिजे." पण आपटे मास्तरांचा उत्साह अनावर होता. त्यांनी ताबडतोब एक परिसंवाद ठेवला व काही पोरांनी समाजसेवा करणाऱ्या स्त्रियांविषयी माहिती द्यावी, अशी योजना केली. त्यात तातूने भाग घ्यायचे ठरवले. वास्तविक आपटे मास्तरांनी निदान तातूबद्दल तरी धोका पत्करायचा नव्हता. तातू प्लॅटफार्मवर उभा राहिला, पण त्याचे भाषण एका मिनिटातच संपवून त्याला प्रिन्सिपॉलकडे पाठवण्यात आले. त्याने अशी सुरुवात केली होती, "सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियांमध्ये दोन प्रकार असतात. एक कुरूप आणि दुसरा म्हणजे अतिकुरूप..."

पण एका प्रसंगानंतर मात्र आम्ही सगळ्यांनी त्याची पाठ थोपटली. केवळ शाकाहाराचा आग्रह धरणारे एक गृहस्थ शाळेत आले. त्यांनी त्या विषयावर आवेशपूर्ण भाषण केले व शेवटी सांगितले, "गव्हाचा दाणा चैतन्यपूर्ण आहे. तो जमिनीत टाका, त्यातून हिरवेगार रोप वर येते. मटण-मांस जमिनीत टाका, तर काय येईल? माती?"

व्याख्यानानंतर त्यांनी प्रश्न विचारायला सांगितले. त्या विषयात तसे कुणालाच आतडे नव्हते. तातूने तर कधी कोंबडीचे अंडेदेखील हातात धरले नसेल. पण प्रश्न विचारायला उभा राहिला तो तातू. त्याने विचारले, "तुम्ही गहू कच्चे खाता की चपाती-ब्रेडच्या रूपात?"

"मी चपाती-पोळ्या खातो. कच्चा गहू खायला मी घोडा नाही." व्याख्याते म्हणाले, व काही पोरे भस्सदिशी हसली.

"मग त्या चपात्या जमिनीत टाकल्या तर काय येईल, माती?" तातूने तसे विचारताच पाहुण्यांचा चेहरा लालसर झाला, व प्रिन्सिपॉलनी घाईघाईने सभा संपवली. पण आम्ही पाठीवर मारलेल्या थापांमुळे तातू अगदी जेरीला आला.

खुद्द दातार मास्तरांशीदेखील त्याचा एक समरप्रसंग घडला होता. पण त्या वेळी त्याला वर्गाबाहेर जाण्याची पाळी आली नाही. त्याने दातार मास्तरांना म्हटले, "सर, विठोबा भेटायला आला, त्या वेळी पुंडलीक काय करत होता?"

या त्याच्या प्रश्नाने दातार मास्तर क्षणभर बावरलेच. कारण त्या वेळी ते वाक्याचे पृथक्करण सांगत होते.

"हा प्रश्न महत्त्वाचा आहे," तातूचे अजून संपले नव्हते. "आपण काम करत असलो की कुणाला तरी बसण्यासाठी आपण एखादी वीट फेकतो. आपण उकिडवे बसलो असता टेकायला वीट फार उपयोगी पडतेच, पण ही साधी गोष्ट ध्यानात न घेता कसरत करत विठोबा उभाच का राहिला? मी तसे उभे राहण्याचा प्रयत्न केला, तेव्हा एकदा मी घसरून पडलो, तर एकदा पावलांना रग लागली."

"तातू, आता हा विषय संपेपर्यंत तू तोंड शिवून गप्प बसला नाहीस तर बघ भोपळ्या, पायाखालची वीट डोक्यात येईल." दातार मास्तर म्हणाले आणि प्रसंग सावरला गेला.

पण मराठी हा विषय असेल तर मात्र त्याच्यापुढे बोलण्याचे कुणाला धैर्य होत नसे. आम्ही कधी नावेदेखील न ऐकलेल्या पुस्तकांतील गोष्टी तो आम्हाला सांगत असे. कविता म्हणून दाखवत असे. हे सगळे तो केव्हा करत असे देव जाणे. त्याने मला 'सावळ्या तांडेल' ही कादंबरी वाचायला दिली होती. पण हळूच सांगितले होते, "शिवाजीच्या काळात दुर्बीण नव्हती." नंतर खूपच वर्षांनी मी कॅप्टन मॅरियटची 'पुअर जॅक' ही कादंबरी वाचली, तेव्हा सावळ्या तांडेलची पुन्हा आठवण झाली. 'शशांक'देखील मला त्याच्याकडूनच मिळाली होती. एक दिवस तो स्वतःशीच गुणगुणत होता :

*"स्वातंत्र्य जिथे, शांती जिथे प्रेम इमानी*
*लावण्य नसे जेथ जणू चीज किराणी*

*तेथे चल राणी,*
*आत्मप्रगतीच्या त्या गूढ कथा ज्या न कुराणी, न पुराणी*
*तेथे चल राणी,*
*तेथे चल राणी.''*
*''सुधारकात अग्रणी कमाल तूच मोहरा!''*

मी त्याबद्दल त्याला विचारले, तर त्या माधव जूलियनच्या कविता आहेत असे त्याने सांगितले. मी म्हटले, ''असले कधी कवीचे नाव असते काय? कुणाचा तरी थोरला भाऊ, धाकटा भाऊ असे नाव घेऊन माजघरातून हळूच बाहेर यायचे असते. आणि जूलियन म्हणजे तरी काय?''

आमच्या वेळी आमचा काव्याशी परिचय म्हणजे बहुधा मेळ्यातील पदांप्रमाणे वाटणाऱ्या आवेशपूर्ण कवितांशी. येथे झाडणी मारून कोळिष्टके झाडा, कसले तरी वाद्य हाणा, ठोका, फुंका असल्या म्युन्सिपालटी, मिलिटरी किंवा बँडवादनाच्या पद्याशी. एक मिनिटाची सूचना मिळताच टेबलावर मुठी आपटून आवेशाने म्हणता येणार नाही ती कविताच नव्हे, असा आमचा आग्रह. आणि हा कोण जूलियन राणीला दूर कुठे तरी चलण्याची विनंती करतो आहे? सुधारक कोण याची नावं त्या वेळी पक्की घट्ट ठरलेली असत, आणि याची एक कविता कुणाला उद्देशून, तर सुधारकाग्रणी मोहरा कमाल याला! जूलियन हे नावदेखील परके, नाजूक, म्हणूनच आकर्षक. अगदी वयस्क सुधारकांना देखील महादेव हे नाव बदलून माधव होण्याचा ध्यास.

नंतर एक दिवस तातू संध्याकाळी घरी आला व मला ओढतच चालू लागला. तो म्हणाला, ''माधव जूलियनचे भाषण आहे. चल लवकर.'' आम्हाला हॉलमध्ये बऱ्याच मागे बसायला जागा मिळाली. जूलियन काय बोलले हे आज आठवत नाही – पण त्यांनी आपली एक कविता ''अर्थो हि कन्या परकीय एव, बाळ जा तप्ताश्रू'' ही म्हणून दाखवली, ती मात्र

आज आठवते, भावते. त्याच वेळी मी ठरविले, की कधी काळी कॉलेजमध्ये गेलोच तर या कवीच्या सगळ्या कवितांचा अभ्यास करायचा. पण ते मात्र घडलेच नाही. मी मराठी विषय तात्पुरता घेतलाही, पण पहिल्याच तासाला यशवंतांनी एका कवितेत किती वेळा यतिभंग केला आहे, यावरच एक प्राध्यापक रेफ्रिजरेटर चेहऱ्याने बोलत राहिले, व मग मी इंग्रजीकडे वळलो व मग ते सारे राहूनच गेले. कारण सवत किंवा पोटभाडेकरू चालत नाही, किंवा तिला भंगलेल्या निष्ठेची पत्रास नाही; पण कोंबड्यांच्या कळपात एक रंगीत पीस टाकून हा विलायती कवी डोळ्यांसमोरून निघून गेला हे मात्र खरे.

त्या वर्षी आम्हाला गडकरी यांची 'चिमुकलीच कविता' ही कविता होती, आणि गडकरी म्हटले की मास्तरांचा हुरूप अनावर होत असे. आम्हाला तर वाटे, की मास्तर गडकऱ्यांची बाजू घेऊन कुणाशी तरी किंवा स्वतःशीच सतत भांडत आहेत. एखादी कविता हे केवळ निमित्त.

एकदा त्यांनी आम्हाला भाषांतराला एक उतारा दिला. आम्ही त्यात गुंतलो तर ते खुर्चीत जाऊन बसले व एक फाइल उघडून ते लिहू लागले. पण त्यांचे लिहिणे पाच-दहा मिनिटेच टिकले. त्यांनी फाइल बंद केली, तपकिरीची चिमूट भरली, आणि ते आमच्यासमोर येऊन उभे राहिले. राग आवरण्याचा प्रयत्न करत ते म्हणाले, "म्हणे बंडगार्डनवर कशाला गेला होता? तेथे काय एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज होते की काय?"

आम्ही थोडे दचकलोच. तसे कुणी म्हटले हे तर आम्हाला माहीत नव्हतेच, पण बंड गार्डन म्हणजे काय हेदेखील माहीत नव्हते. पण मास्तरांना त्याचे काहीच नव्हते. कारण एका दृष्टीने ते आमच्याशी बोलतच नव्हते. "त्या वेळी बंड गार्डनवरच काय, कुठेच एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज नव्हते. तेव्हा सुधाकर कुठेही गेला असता तरी हाच प्रश्न विचारता आला असता. काही तरी बोलून नाक खाजवायचे, दात विचकायचे, झाले! बस्स, दुसरे काही नाही. अरे भोपळ्यांनो, एक

पोस्टकार्ड घ्यायला पोस्टात गेलो असता एखादा म्हातारा हळूच आपल्या नातीची पत्रिका हातात देतो, किंवा आपल्या पांडोबाला कुठे तरी रेव्हेन्यूमध्ये द्या चिटकवून, म्हणून सांगतो. म्हणजे पोस्ट ऑफिस काय वधू-वरमंडळ होते, की कारकून भरती करण्याचे ठिकाण होते? सुधाकर विमनस्कपणे भटकत बंडगार्डनकडे गेला होता. तेथे त्याच्या ओळखीचे लोक भेटले इतकेच. होय की नाही?''

आम्हाला कसलीच माहिती नव्हती. पण आम्ही काही बोलायच्या आतच नानू बापटाने 'होय' म्हणून टाकले. मास्तरांचा इसाळ कमी झाला नव्हता. पण तेवढ्यात तातू सामंताने विचारले, ''सर, तुम्ही कधी गडकरी यांना भेटला होता का प्रत्यक्ष?'' "भेटला होता का? भेटला होता का?'' हातवारे करत मास्तर पुढे सरकत म्हणाले, तेव्हा नानू बापट तर गाठ मारल्याप्रमाणे आक्रसला. मास्तर म्हणाले, ''मी इतक्या वेळा पुण्याला गेलो ते काय तेथले टांगे आणि अनेक मारुती मोजायला की काय? मी त्यांना दोनदा पाहिले. एकदा मी एकटाच गेलो होतो. त्या वेळी मी त्यांना पाहिले. पण त्या वेळी पायांतील शक्तीच गेली, अणि मी बावळटपणे पाहत राहून तसाच परतलो. दुसऱ्या खेपेला मात्र मी एका लेखकाची विनवणी करून त्याला बरोबर घेऊन गेलो. ते दोघे खूप बोलले, पण मला मात्र एक शब्द बोलायला झाले नाही. येताना मी त्यांच्या घरासमोरील पिंपळाची चार पाने घेऊन आलो. ती मी अगदी जपून ठेवली होती. त्यांतील दोन पाने मित्रांना दिली. एक माझ्यासाठी हवे." मग ते मला म्हणाले, ''पुढे कधी तरी तू गडकरी यांचा अभ्यास केलास, तर तुला ते उरलेले पान देईन.'' नंतर अनेक वर्षांनी मी गडकऱ्यांच्या कविता, त्यांची नाटके वाचली; पण त्याआधीच मास्तरांकडून ते पिंपळपान मला मिळायचे नाही, हे ठरून गेले होते.

पण मनातील बऱ्याच जळफळाटाचा आजच निचरा करण्याचे मास्तरांनी ठरवले होते की काय कुणास ठाऊक! ते म्हणाले, ''गडकऱ्यांनी

एकदा एका फुटक्या तपेलीवर कविता केली म्हणून कुणी तरी त्यांचा उपहास केला. म्हणे फुटकी तपेली अगर एखादे टमरेल हा काय कवितेचा विषय होतो की काय? आता काय बोलणार कपाळ! भोपळ्यांनो, ते सारे कविता कोण करते यावर अवलंबून असते. एखाद्या झुरळाने हिमालयावर कविता केली म्हणजे का ती हिमालयाएवढी होते? उलट, बर्न्स नावाच्या एका कवीने नांगराचे टोक लागून मेलेल्या उंदरावर कविता लिहिली आहे. आणि त्यात माणसाच्या लहान, असहाय जीवनाचे प्रतिबिंब पडले आहे. आणखी एका कवीने, आता मला नाव आठवत नाही, तर एका गाढवावरच कविता लिहिली आहे.''

त्यावर तातू सोडून इतर सर्व पोरे हसली.

''तर त्या कवितेत गाढव म्हणते, अरे, मला पाहताच सगळे जण खिदळतात. मला गोड आवाज नाही, रूप नाही, काही नाही. उरलेले सारे सामान कसेबसे एकत्र आणून कंटाळत दैवाने मला निर्माण केले – असला प्राणी मी. पण लक्षात ठेवा, माझ्याही आयुष्यात भाग्याचा एक दिवस येऊन गेला आहे. जीजसने जेरुशलेममध्ये प्रवेश केला, त्या वेळी त्याने शृंगारलेला घोडा किंवा उंट यांची निवड केली नाही. तो मान मला मिळाला होता.''

या तासाला आमचे भाषांतर कोपऱ्यात पडले. मग मास्तर रागारागाने पुन्हा खुर्चीत जाऊन बसले व लिहिण्यासाठी त्यांनी फाइल उघडली असेल नसेल तोच घंटा झाली. एकदा एका तासाला त्यांनी ''सौंदर्य'' नावाचा धडा घेतला. त्यांनी त्या लेखाच्या अगदी चिंधड्या करून टाकल्या. वैतागाने त्यांनी पुस्तक टेबलावर आपटले व खुर्चीत बसले.

''कशाला असले धडे पुस्तकात घेतात कुणास ठाऊक! एखाद्याला जेवायला बोलवावे आणि त्यापुढे मेलेली एक बेडकी ठेवावी, तसला प्रकार आहे हा.'' ते चिडून म्हणाले. त्यांनी तपकिरीची डबी उघडली, पण आपण

नुकतीच तपकीर घेतली आहे हे त्यांच्या ध्यानात आले, व त्यांनी ती फटदिशी बंद केली. पण मास्तरांचा राग त्या फडतूस निबंधामुळे निर्माण झालेला नसावाच. कारण हा निबंध आदल्या वर्षीदेखील होताच, व त्या वेळच्या वर्गाला त्यांनीच तो शिकवला होता.

"म्हणे गडकऱ्यांची माणसे साध्या माणसांप्रमाणे बोलत नाहीत. शब्दांना धरबंद कसा घालावा, हे त्यांना समजलेच नाही. काशी भोपळ्यांनो, अरे, त्यांच्या पात्रांप्रमाणे बोलायला येत नाही म्हणून आपण ओशाळे व्हायचे की त्याचाच टेंभा मिरवायचा? आम्ही सामान्य माणसे बोलतो ते तोंडात डिंकाची बाटली घेतल्याप्रमाणे. एखादे नृत्य पाहावे आणि ओरडावे – सामान्य माणसे असे कधी चालतात की काय? तुम्ही जन्मतःच कर्मदरिद्री जन्मलात, पण दारिद्र्याची पताका मिरवण्यात तुम्हाला अभिमान. तुम्ही विष्णूलादेखील म्हणाल, "छातीवर कौस्तुभमणी मिरवायचा म्हणजे देवा, जरा जास्तच झाले. किती सामान्य लोकांकडे कौस्तुभमणी असतो?" आणि दररोजची, दररोजची भाषा म्हणून तुम्ही गवगवा करता त्या भाषेत आम्ही काय दिवे लावतो? कशासाठी ती वापरतो? तर मोलकरीण अजून आली नाही काय? राकेल संपले आहे? आला वाटते पुन्हा हा खवीस अगदी सकाळीच पैस उसने मागायला! अहो, देतो की तुमचे पाच रुपये. का कुठे पळून चाललो आहे? आता काय करणार ऐन वेळी? परटाने पँटची सारी बटणेच तोडून टाकली आहेत. ए बाई, मला जरा आणखी थोडा वेळ झोपू दे. ऐन वेळी झोपेत असता, आरडाओरड करून भूकंप करणे हा सगळ्याच सतीसावित्रींचा हक्क आहे की काय? - असले दिव्य उद्‌गार काढायला? आणि यासाठी गडकरी कशाला हवेत? उंदराची पिटके मारायला तानाजी कशाला हवा?" तातू सारे शांतपणे ऐकून घेत होता, व प्रभाकर त्याला सतत खुणा करत होता. पण त्याला तसल्या चिथावणीची गरजच नव्हती. तो आधीच तयार होऊन राहिला होता. तो म्हणाला, "पण सर, त्यांची माणसे फारच लांब लांब

बोलतात. शेवटचे वाक्य ऐकल्यानंतर पहिले वाक्य काय होते हे ध्यानात राहत नाही.''

''ए चिलम्या, डझन भोपळ्या, एक सांगून ठेवतो, चांगले लक्षात ठेव,'' थोडे फिरून येऊन मास्तर म्हणाले, त्यांच्याकडे दांडपट्टा असता तर त्यांनी या वेळी एक पलटदेखील फिरवली असती. ''हे बघ, गडकरी म्हणजे एक धबधबा आहे. तो आपल्याच जल्लोषात जाणार. तो लहान-मोठा करायला काही एखादा नळ नव्हे. तसले काही पाहिजे असले तर चौथ्या मजल्यावरील नळासमोर जाऊन बसा, आणि सद्‌गदित होऊन घसा वाटेल तेवढा भरून आणा. त्यासाठी गिरसप्पाच्या धबधब्याकडे कशाला जाता शेण खायला?''

मास्तरांचा आवेश उतरला. त्यांनी टेबलावरचे पुस्तक उचलले. पण चुकून गोगलगाय उचलल्याप्रमाणे त्यांनी ते चटकन खाली टाकले. ते पुन्हा म्हणाले, ''गडकऱ्यांच्या घरी मेणबत्त्या, लाटन दिसणार नाहीत. तिथे रंगीत चंद्रज्योती, भुईनळे कारंजत असतात. त्यावर तुमची पिरपिर काय, तर उदबत्तीचे टोकदेखील पुरे झाले असते?''

आता टेबलावरील पुस्तक तर त्यांच्या दृष्टीने मेलेच होते. पण घंटेला तर अजून अवकाश होता. तातूला आणखी काही तरी म्हणायचे होते, पण त्याला बोलू न देता मास्तरच म्हणाले, ''आणखी एक सांगतो. यांच्या नाटकांत खरी पात्रे आहेत ती त्यांची भाषणेच. एका भाषणाला दुसरे सामोरे जाते, संघर्ष घडतो, व काही वेळा तर लखलखाट होऊन डोळे दिपतात. सुधाकर, वृंदावन, भूपाल, धुंडिराज ही नावे आपली आहेत सोयीसाठी. नायट्रिक ॲसिड, तेजाब ही नावेही आहेत सोयीसाठीच. पण तेजाब म्हणजे काय, हे त्याला हात लावून बघ म्हणजे समजेल. अरे, अंग पुसायला राजापुरी पंचे आहेतच की दारिद्र्यांनो; पण वरातीत पाहिजे ती पैठणच.'' तरीसुद्धा घंटेला अवकाश होता. तातूने हात वर केला व म्हटले, ''सर, मला बऱ्याच दिवसांपासून एक विचारायचे होते.''

त्यावर आम्हांला एकदम उत्साह वाटला. अशा रीतीने तातूने सुरुवात केली की तो काही तरी भलतेच वेगळे बोलणार हे आम्हाला माहीत होते. तो म्हणाला, ''सर, पासोडी म्हणजे काय?''

मास्तर दचकून त्याच्याकडे पाहतच राहिले. ते म्हणाले, ''पासोडी म्हणजे चादरीप्रमाणे जाड सुताडी पांघरूण. आता पासोडी का आठवली?''

''सर, असल्या पासोडीवर कसल्या टाकाने, बोरूने लिहिता येते? मी एकदा तसे लिहून पाहण्याचा प्रयत्न केला, तर दोऱ्यात अडकून बोरू एकदा मोडला. मी दासोपंतांच्या पासोडीविषयी कुठे तरी वाचले, की त्यावर त्यांनी आपल्या कविता लिहिल्या. मला वाटते, पासोडी या शब्दाचा अर्थ वेगळा आहे.''

''असे तुम्हाला वाटते का?'' कमरेवर हात ठेवून मास्तर म्हणाले, ''मग पंडितराज, आपला अर्थ सांगून आम्हा सर्व पामरांना का धन्य करत नाही?''

''तो शब्द पासोडी नसून पासोदी असा असावा. पासोदी म्हणजे पासोदाची कविता. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, एकनाथांची भारुडे, भागवत त्याप्रमाणे.''

''पण ज्ञानभास्कर, पासोदा म्हणजे तरी काय?''

''पासोदा हे कवीचे नाव; पण ते त्याने उलट लिहिले आहे. खरे नाव दासोपा – दासप्पा किंवा दासोपा असे नाव असते, सर.''

एकदम दडपण कमी झाल्याप्रमाणे मास्तर मोठ्याने हसू लागले. आमच्या घरी पूर्वी ते, आजोबा करंदीकर, अप्पा काळे बोलत असता त्यांचे असले मनमोकळे हसणे आम्हाला आत ऐकू येत असे. त्यांच्यातील ताण, राग – सारे आता ओसरून गेले होते. आम्हाला अगदी जवळचे वाटणारे मास्तर दिसू लागले. ते म्हणाले, ''तातू, तुझ्या डोक्याला झाकण असते तर बरे झाले असते बघ. म्हणजे कधी तरी ते काढून आत काय काय

चालले आहे हे पाहता आले असते. कमाल गंमत झाली असती!''

तोच घंटा झाली. आम्ही उठलो, पण जात असता मास्तरांच्या चेहऱ्यावर अजूनही हसणे होते.

मला एकदा तरी वर्गातून हाकलून घातल्याखेरीज कोणतेच वर्ष जाऊ नये असे लिखितच होते की काय कुणास ठाऊक! आणि या खेपेला एका दृष्टीने कांदेविक्या जबाबदार होता, याचा मला विशेष राग आला. हा कांदेविक्या अ तुकडीत होता. पण दहा मिनिटांच्या सुट्टीत तो कधी तरी आमच्याकडे येई व नंतरचा तास आमच्यातच बसे. आडनावाच्या बाबतीत पोरांच्या जिभा अगदी नाइलाज झाला तरच सरळ राहत. कांदेविक्या हे काही त्याचे खरे नाव नव्हते. ते होते कानविंदे. आणखी एक नाकाडी म्हणून विद्यार्थी होता. तो तर पहिल्याच दिवशी 'नाकात काडी नाकाडी' होऊन बसला. दड्डीकराचे धड्ड होणे, गोखल्यांचे खोकल्या, बोरकराचे बोक्या हे सारे रीतसरच होते. प्रभाकरलादेखील त्याचा 'प्र' अगदी परवापरवाच परत मिळाला होता. तोपर्यंत त्याला भाकरवरच समाधान मानावे लागत होते. या मुद्रादानातून सुटायची ती तीनच नावे. कुलकर्णी, देशपांडे आणि जोशी. या तीन नावांची पैदासच अशी भयानक होती, की निव्वळ संख्येच्या आधारावरच टिकून राहणे फारसे अवघड नव्हते; पण त्यात जर आद्याक्षरेच धोकेबाज असतील तर कपाळाला हात लावायचा व गप्प बसायचे. एक पी. जी. जोशी पाजी जोशी झाला; एक डी. आर. कुलकर्णी ढोर कुलकर्णी झाला; आणि डी. एम. व टी. आर. जोशी व ढम्म जोशी आणि टर्र जोशी झाले.

कानविंदे इकडे यायचा म्हणजे तो काही आम्हाला प्रेमाने भेटायला यायचा नाही. त्याचा एक वीतभर लेख कुठल्या तरी मुलांच्या मासिकात प्रसिद्ध झाला होता. तेव्हापासून तो कपाळावर दोन विचारी सुरकुत्या टाकून इकडे-तिकडे भटकत विश्वाची चिंता करत असे. तो आमच्याकडे आला की आम्ही ओळखत असू, की त्याने नवीन काही तरी लिहिले आहे.

आम्ही मुद्दामच वेगळे विषय काढून त्याच्याकडे दुर्लक्ष करून त्याला उतावीळ करत होतो. त्याला पाहताच तातूने अफगाणिस्तानातील नद्यांची माहिती द्यायला सुरुवात केली, तर प्रभाकरने चीनमध्ये माणसे झुरळांचे किती प्रकार खातात याचे अत्यंत सविस्तर आणि काल्पनिक वर्णन द्यायला सुरुवात केली. अखेर न राहवून कानविंदेच म्हणाला, ''काल मी एक कविता केली आहे. तिचे नाव आहे 'हा चांदोबा आहे सुंदर.'' ते नाव ऐकताच तातू अंगाला गाठ मारून मागे कोपऱ्यात सरकला. प्रभाकरने आपल्या कपाळावर तर हात मारून घेतलाच, पण आम्हा दोघा-तिघांच्या कपाळावरदेखील हात मारला.

*आभाळाचे निळे पाणी पोहायला*
*कोवळ्या तारका त्या खायाला*
*ढगांचा सावरी कापूस झोपायला*
*पण अमावास्येला असतोस कुठे रे?*
*हसतो बिलंदर! हा चांदोबा आहे सुंदर*

आणि त्याबरोबर हसण्याचा स्फोट झाला. प्रभाकर तर एक पाय वर करून 'हसतो बिलंदर, हसतो बिलंदर' म्हणत नाचू लागला. तोपर्यंत सुट्टी संपल्याची घंटा झाली, आणि कणकेच्या गोळ्याप्रमाणे चेहरा झालेला कानविंदे बाहेर पडायच्या आत दातार मास्तर वर्गात आले, तेव्हा तो खाली मान घालून आमच्याच वर्गात बसला.

''सर, या कानविंदेने एक अप्रतिम कविता लिहिली आहे,'' प्रभाकर म्हणाला, ''त्यात एक बिलंदर चंद्र आहे. तो सुंदर आहे म्हणून बिलंदर आहे की बिलंदर आहे म्हणून सुंदर आहे, हे मात्र आम्हाला समजले नाही.''

''मला आणखी काही तसल्या ओळी माहीत आहेत,'' तातू म्हणाला, ''का न खाशी गोमय ताजे? - एखाद्याला शेण खायला सांगतानासुद्धा त्यातल्या त्यात त्याने ताजे शेण खावे हे सांगण्याइतके सौजन्य आजकाल दिसत नाही.''

“माती असशी, मातीत मिळशी. पण लक्षात ठेवा, हे आत्म्याला लागू नसे.” प्रभाकर म्हणाला, “एखाद्या औषधाच्या बाटलीवर लिहितात तसे हे फक्त बाहेरून लावायचे. पोटात घ्यायचे नाही. आत्म्याला हे लागू नसे.” तातूने मळकट डायरीसारखी एक वही काढली होती, व तिच्यातून तो मधून मधून वाचत होता -

*उठा उठा रे बांधा कंबर*
*तुमच्यापुरती ही घी-शक्कर*
*टाकुनि रूढीशी द्या टक्कर!*
*खुबी ओळखा, क्या है अंदर!*

“असे होते कधी कधी.” मास्तर म्हणाले. पण आज एकंदरीने ते व्यग्र दिसत होते. कारण त्यांनी खोटेच रागावून कुणालाच भोपळ्या म्हटले नाही.

“आज येताना मला एक प्रेत दिसले. ते एका मुलाचे होते; पण त्याची आई मारुतीच्या देवळापुढे उभी राहून त्या मुलाला पूर्ण आयुष्य देऊन सुखी ठेव, असे हात जोडून म्हणत मध्येच हसत होती. मला एकदम राजहंस कवितेची आठवण झाली.” ते सांगत होते. वास्तविक आम्ही त्यांचे वेगळे स्वरूप पाहून गप्प बसायला हवे होते; पण आम्ही आज फसफसून झिंगल्याप्रमाणे झालो होतो की काय कुणास ठाऊक! मी म्हटले, “त्या कवितेतसुद्धा असल्या ओळी आहेतच-

*ते हृदय कसे आईचे*
*मी उगाच सांगत नाही.”*

एवढ्यावरदेखील थांबायला हरकत नव्हती; पण माझ्यात कसले तरी पिसे चढले होते आणि शेजारच्या कांदेविक्याला पाहून तर ते जास्तच वाढले. मी सूर काढला -

*परांजपेच्या हॉटेलातिल पुरी-पातळभाजी,*
*मी उगाच सांगत नाही!”*

*मग प्रभाकरदेखील चेकाळला. तो म्हणाला,*

*"तानिबाइची मिरची भजी*
*मी उगाच सांगत नाही."*

मग इतर काही पोरांनादेखील त्यातील गंमत समजली, आणि ती "उगाच सांगत नाही" ही ओळ एकत्र म्हणण्यात सामील झाली.

*बादशाहिमधला खिमा ब्रेड -*
*मी उगाच सांगत नाही*
*ब्रम्हचारी सिनेमा बघा तरी -*
*मी उगाच सांगत नाही*
*डिलाइटमधले रवा-डोसे*
*मी उगाच सांगत नाही...*

हा वाह्यातपणा पंधरा मिनिटे चालला, व आम्ही पोटाचे चक्र होईपर्यंत खिदळलो. पण मध्येच काही तरी तुटल्यासारखे झाले व सगळे जण गप्पगार झाले. मास्तर माझ्यापुढे येऊन उभे राहिले होते व माझ्याकडे पाहत होते. त्यांचा चेहरा रक्त साकळल्यासारखा झाला होता व उजवा हात किंचित थरथरत होता. मग आम्ही पूर्वी कधी न ऐकलेल्या आवाजात ते मला म्हणाले, "तुम्ही आपली पुस्तके गोळा करा आणि वर्गातून चालते व्हा आणि मला विचारल्याखेरीज माझ्या तासाला येऊ नका."

हा आवाज, 'तुम्ही' या शब्दाचा वापर, हे सारे मास्तरांचेच; यावर माझा विश्वास बसेना. पण त्यामुळे मला एकदम मुस्कुटात मारल्याप्रमाणे झाले. मी खाली मान घालून पुस्तके गोळा केली व बाहेर पडून घरी आलो. घरी करंदीकर आजोबा येऊन बसले होते. मला पाहताच "काय म्हणतो आमचा किट्टू मास्तर," असे ते विचारणार हे मला माहीत होते. मी तसाच घरासमोरून पुढे गेलो व बराच वेळ पिंपळकट्ट्यावर बसून बऱ्याच उशिरा घरी परतलो.

त्यानंतर दोन दिवसांनी मास्तरांचा तास होता. आधीचा तास बायबलचा होता. त्या वेळी मला बऱ्याच नव्या गोष्टी ऐकायला मिळत.

शिवाय चांदेकर मास्तर गाणेदेखील सुरेख म्हणत असत. आज आई आजारी म्हणून तातू आला नव्हता. मी घाईघाईने पुस्तके गोळा केली व त्याच्या घरी जावे म्हणून निघालो, तर दारातच दातार मास्तर उभे.

"काय रे, कुठे निघालास?" त्यांनी विचारले.

"घरी. वर्गात बसू नको असे तुम्ही सांगितलेत."

"जा, फार शहाणा झालास. बाकावर जाऊन बस." आत येत ते म्हणाले व थोडे हसले.

पण नंतर साऱ्या तासभर त्यांनी नजरदेखील माझ्याकडे वळवली नाही. पण त्यांचे बरेचसे बोलणे माझ्यासाठीच होते.

ते म्हणाले, "कित्येकदा फार मोठ्या कवींच्या केसांतदेखील नट्टा-पट्टा उमटतो. मग निर्जीव ओळी लिहिल्या जातात, आणि त्या वाचताना मन विरजते. शेक्सपियरच्या नाटकातदेखील ओळीच्या ओळी रिकाम्या गाडग्याप्रमाणे येतात. पण हिमालयाची थोरवी त्याच्या शिखरावरून ठरवावी – त्यातील खोल दऱ्याभेगांवरून नव्हे. गंगेला देखील पाणउतार असतो, आणि सरस्वतीला देखील थकून जांभई येते. म्हणून राजहंससारख्या कवितेतही 'मी उगाच सांगत नाही' असल्या ओळी येतात.

माझा ताण तटकन तुटला व मी रागाने ओठ आवळले. जाताना देखील मास्तरांनी माझ्याकडे पाहिले नाही. त्यानंतरचा तास चुकवून मी घरी आलो तेव्हा करंदीकर आजोबा नुकतेच पगडी टेबलावर ठेवत होते. मला पाहताच ते म्हणाले, "काय बच्चमजी, कसा आहे आमचा किट्टू मास्तर?"

मी उसळत्या रागात त्यांना सारी हकीकत सांगितली व म्हटले, "तुमचे किट्टू मास्तर पार्शिआलिटी अंपायर आहेत. मी तसे म्हटले तर त्यांनी मला वर्गातून हाकलून दिले; पण आज मात्र त्यांनी स्वतःच त्या ओळीवर टीका केली. म्हणून मी नंतरचा तास चुकवून घरी आलो."

त्यावर करंदीकर आजोबा इतके हसले, की त्यांना खोकला आवरायला पाच मिनिटे लागली. तोपर्यंत अप्पा काळेदेखील आले. त्यांनी

पायरीवरूनच सिगारेट गटारात टाकली व ते आत आले.

"मोठा खोकला उकरून काढायचे तुमचे वय संपले, भीष्माचार्य!" ते म्हणाले. खरे म्हणजे आजोबा अप्पा काळ्यांपेक्षा आठ-दहा वर्षांनी मोठे असतील, पण ते अप्पांना नेहमी भीष्माचार्य, द्रोणाचार्य असल्या महाभारतातील नावांनीच हाक मारत. करंदीकरांनी अप्पांना सारी हकीकत सांगितली. तेवढ्यात आमचे दादा घरी आले, आणि माझे सगळेच बिंग बाहेर पडले. मग करंदीकर मला म्हणाले, "हे बघ बच्चमजी, तू काही तरी वाह्यात बोलणे, आणि किट्टूने काही म्हणणे, दोन्ही सारखेच, होय रे? त्याच्यासारखे गडकऱ्यांवर प्रेम कर, आणि मग तसे बोल. तू तुकाराम आहेस का? तुझी भक्ती असेल तर तू विठोबालादेखील विठ्या, काळ्या म्हण की! आणखी एक गोष्ट सांगून ठेवतो. आमचा किट्टू म्हणजे एक अरभाट माणूस आहे अरभाट!"

अरभाट हा एक अतिशय गुणी कानडी शब्द आहे. अरभाट म्हणजे खानदानी, भव्य, मोठ्या थाटामाटाचा. मठातील जेवण कसे होते? अरभाट. मन्सूरांचे गाणे कसे झाले? तर अरभाट. हृषिकेशला गंगा कशी आहे, तर अरभाट. देवळासमोर झालेल्या नाटकातील हिरण्यकश्यपूच्या मिशा कशा होत्या, तर अरभाट. म्हणजे अगदी क्लास!' "तुला सांगून ठेवतो. तू एक गोष्ट कर. किट्टूच्या बाबतीत तू नायडू आणि गडकरी यांच्या भानगडीत पडू नकोस." माझ्या पाठीवर थाप मारत करंदीकर म्हणाले.

मग अप्पा काळे किंचित पुढे सरकले. आवाज नेहमीचाच ठेवून पण एखादे गुपित सांगण्याचा आविर्भाव आणत ते डोळे वात्रट करत म्हणाले, "त्याच्या जोडीला देविकाराणी व गायत्रीदेवी यांच्याविषयीदेखील एक शब्द काढू नको. काय समजले?" आणि त्यावर काळे व करंदीकर - दोघेही हसले. देविकाराणी कोण, हे त्या काळी मला काहीच माहीत नव्हते. देविकाराणी आणि जयपूरच्या गायत्रीदेवी या दोन खानदानी नावांचे जे सुगंधी निळे चांदणे आयुष्यात पसरले ते फार नंतरच्या काळात. आणि

त्या वयात पसरलेल्या चांदण्याचे गंध कधी ओसरत नाहीत, की त्यांना कधी कृष्णपक्षाची बाधा होत नाही. मास्तरांचे रागावणे, त्यांनी हाकलून लावणे, त्यांनी केलेली निबंधाची, हस्ताक्षराची स्तुती, हे सारे आयुष्याच्या वेडवाऱ्यात अस्ताव्यस्त उडून गेले. पण त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेने एक कोनाडा गाभाऱ्यासारखा होतो. तो अनुभव वेगळाच होता.

त्यांनी 'चिमुकलीच कविता' शिकवायला घेतली ती या वर्षातील शेवटचीच कविता होती. नव्हे, ती शाळेतीलच शेवटची कविता होती.

"यात एक ओळ फार झगझगीत आहे." तातू हळूच म्हणाला. तो शेजारी बसला होता खरा, पण मनाने तो दूर कुठे तरी निघून गेला होता.

कविता संथपणे चालली होती. गोंडस नाजूक चिमणी बाला हळूहळू स्पष्ट होत चालली. केस सरळच, पण काही मात्र कुरळे. कच्च्या पोवळ्यांच्या चकत्या करून लावल्याप्रमाणे वर्खी नखे. (नखे लाखिया, दात मोतिया, आणि स्तनाकार पेले, यांची जपानी रमलाची रात्र चिमुकलीच कविता मोठी झाल्यानंतरची.) विशेष प्रतिकार न करता, पण फारसे न झंकारता आम्ही त्या संथ ओळी ऐकत होतो. मग कसलीच चाहूल न दाखवता ती ओळ आली व सारे अंग थरारून गेले. तिच्या हनुवटीवरील तीळ म्हणजे तिच्या पुण्याईने गणित करत असता विधीने दिलेले दशांश चिन्ह. कमळाच्या परागतंतूंतील एक विजेच्या झळाळीने उजळ झाल्याप्रमाणे मी अगदी बावरून गेलो व सारेच विसरलो.

नंतर बऱ्याच वर्षांची गोष्ट आहे. खऱ्या काव्याचे लक्षण कसे ओळखावे, हे आपल्यापुरते सांगताना ए. ई. हाउसमनने म्हटले आहे : एखादी ओळ आठवताच सारे अंग थरथरून येते. जर त्या वेळी मी दाढी करत असेन तर चेहऱ्यावरील केस एकदम ताठरतात. ही खूण त्याला पुरेशी आहे. Elfs and fairies shall dance no more ...... Brightness falls from the air, Queens have died young and fair......

एमिली डिकिन्सनला जाणवणारे लक्षण निराळे आहे : "खरी

कविता वाचताना खोल कुठे तरी असा गारठा जाणवतो, की विश्वातील सारी उष्णता जरी त्या क्षणी आपल्यात भरली, तरी तो नाहीसा होणार नाही असे वाटू लागते.''

तसल्या जातीचा एक लहान अनुभव मला आला. मास्तरांनी ती ओळ वाचली तेव्हा. गणितातील निर्जीव टिंबाला एका दशवर्षेच्या जीवनात निर्णायक रूप प्राप्त झाले. मास्तरांनी ती कविता अनेकदा शिकवली असेल, पण ते या ओळीवर थांबले. पुस्तकात बोट ठेवून ते खिडकीपाशी गेले, व तेथे किंचित रेंगाळून ते परतले. ''या माणसाची भूकच वेगळी होती. त्याला एखादा पक्षी पाळायचा असता तर त्याला गरुडदेखील निर्जीव वाटला असता. त्याने रूक पक्षीच मिळवायचा प्रयत्न केला असता.''

त्यानंतर मास्तर पुष्कळ बोलत राहिले. पण आता माझेच मन थाऱ्यावर नव्हते. दररोजच दिसणारा, खिडकीतून आलेला उन्हाचा पट्टा आज जास्तच का झळझळत आहे हे मला समजेना. पलीकडील ख्रिश्चन स्मशानभूमीतील झाडे स्तब्ध उभी होती खरी, पण त्यांचे सारे लक्ष माझ्याकडेच होते. कपाळाला एक लहान सुरकुती देऊन, मान किंचित वाकडी करून ब्रह्मदेव हे दशांश चिन्ह देऊन त्या मुलीचे भवितव्य ठरवण्याच्या विचारात आहे, आणि त्याच्या आज्ञेची वाट पाहत एक तेजस्वी टिंब त्याच्यासमोर तरंगत आहे, असे चित्र समोर अस्पष्ट दिसू लागले.

नंतर बऱ्याच काळाने माझ्या मनात आले, की ते टिंब म्हणजे तिच्या हनुवटीवरील तीळ नव्हता, तर ती एका गोंदण्याची खूण होती. म्हणजे ते टिंब कुठे द्यायचे, हे जरी ब्रह्मदेवाने ठरवले होते, तरी त्याने अर्जुनाप्रमाणे एका गोंदणकाराला नाममात्र केले होते.

''आणखी एक ओळ जाता जाता तसेच चेटुक करून जाणारी आहे'', जागा झाल्याप्रमाणे तातू म्हणाला, ''कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही.''

●●●

# मायबाई, मदनाचे वाटेकरी व सर्वांनाच

इंद्रजित भालेराव

## मायबाई बहिणाई

मायबाई बहिणाई
देखिंसनी जयगाव,
तुला माणसाचं येळं
व्हइसनी पांडुरंग
हिरिताचं देणंघेणं
काय, कशाले म्हणावं,
मना जीवा संसाराची
लपलेली कमरिखा
पोया आखजी न् गुढी
परि तुह्या गाण्यामंधी
माय खोकली, गोसाई,
सदा जगाच्या कारणी
काया काया शेतामधी
पाखराच्या बोलीसह
तुला माणुसकी ठावं,
गाणं तुहं नित घेई

तुहं घरोटं देखलं
मन माहं हारिखलं
देव तठीच दिसला
पीक रानात हासला
खरं तुला समजलं
एका तुला उमजलं
तुला गुपितं कळाली
तुह्या दैवानं मिळाली
व्हते आम्हांलाबी ठावं
त्याला येगळीच चव
योगी, जयराम बुवा
त्यांचा चंदनि झिजवा
काय काय जे घडलं
तुला माहीत पडलं
तुला माणसाची हाव
माह्या हिरिताचा ठाव

# मदनाचे वाटेकरी

मदनाचे वाटेकरी
बलुत्याचे धनी बारा
उभे खळ्याच्या पाळूला
भटजीच्या येरझारा
पाणी पळालं तोंडाचं
उन्हाळ्याचा जीव लाही
कुंभाराचा कोरा डेरा
जीव गारगार राही
माळनीच्या माळव्यानं
चव भाकरीला आली
भुरकीचा घास सुका
नेला ढकलीत खाली
सोनाराच्या हातनीनं
आसा फिरविला हात
गोंडराचा ढीग न्यारा
नाही खडा मदनात
उधळायचे टोपले
खीरखीरे कैकाड्याचे
मांग करील चांगले
दानेदुने मातऱ्याचे
उपकार सगळ्याचे
आणखीन कोण कोण?
येसकऱ्यानं राखलं
सुगीमधी उभं धान
मदनाचं सुभलाभ
आधी राशीच्या शेजारी
ज्याचं त्याला पव्हचू द्या
जरी धन्याची बेजारी

# सर्वांनाच

सर्वांनाच बांधता यावेत चौसोपी वाडे आणि लादन्याची घरं
हे इथल्या निवाऱ्याच्या गरजेचं स्थापत्य आहे
सर्वांनाच मिळावं खायला दही-दूध-तूप-लोणी
हाळसमान्या कष्टाच्या शरीरशास्त्राचं ते अगत्य आहे

बंगईवर बसावं म्हातारीनं झुलत राणीसारखं निवांत
घर भरलेलं असावं तिच्याच खोड-पिट्या लेकराबाळांनी

जरी थकलेली असली काळी कपिला गाय गोठ्यात बसलेली,
तरी गोठा भरलेला असावा तिच्याच बाळसेदार वासरांनी

सगळं असावं पूर्वीचंच, जुनं ते सोनं, म्हणून
फक्त नसावी गावाला तटबंदी किंवा गावकूस आतबाहेर
जुन्या-नव्या सगळ्याच सासुरवासिनींच्यासाठी
इथं-तिथं सगळीकडं सारखंच व्हावं सासर-माहेर

●●●

# आकाशातील ग्रहांच्या गमतीजमती

प्रभाकर जठार

गायनाचार्य वझेबुवा हे दिनानाथांचे द्वितीय गुरू. (बेळगावला जाहीर गंडाबंधन ऑगस्ट १९२५ मध्ये) पहिले, गोव्यातील म्हारदोळचे रघुनाथमामा माशेलकर. पण एक गंमत-दिनानाथांच्या आईंनी त्या काळात शंभर रुपये देऊन दिनानाथांना माशेलकरांचा जो गंडा बांधला तो तबला शिकण्यासाठी, पण जेव्हा 'तबला जमणार नाही आणि दिनाचा गळाही चांगला आहे, म्हणून गाणे' असे झाले, तेव्हा ते दिनानाथांचे पहिले गान-गुरू झाले. अर्थात ते गानऋषी भास्करबुवा बखले यांचे गुरुबंधू असल्याने त्यांचा त्याही क्षेत्रात निर्विवाद अधिकार होता. वझेबुवांचा गंडाबंद शागीर्द होण्याचे दिनानाथांनी ठरवले ते दोन कारणांसाठी. त्यांना स्वतःच्या गानविद्येला सांप्रदायिक गुरुत्वाची 'ब्रह्म-मुद्रा' हवी होती आणि 'रणदुंदुभी' या नवीन नाटकासाठी कुणातरी नामवंत संगीततज्ज्ञाकडून व्यावसायिक आब म्हणून 'चाली' हव्या होत्या. तेव्हा वझेबुवांनी अट घातली : 'चाली देईन पण शिष्य म्हणून. धंदा म्हणून नाही! नाहीतर शास्त्रीय संगीतात दिनानाथांचा मूळ ओढा भास्करबुवा बखले यांच्याकडे होता. त्यांना त्यांचे शिष्यत्व हवे होते. पण ते गंधर्व नाटक मंडळींकडे असल्याने आणि दिनानाथांच्या 'बलवंत'चे नवीन दर्जेदार नाटक (नाटककार वीर वामनराव जोशी) तर लवकरच रंगभूमीवर येणार होते. केशवराव भोसले यांच्या 'ललितकलादर्श'साठी त्यांच्या गाजलेल्या 'राक्षसी

महत्त्वाकांक्षा' या नाटकासाठी चाली दिल्या होत्या त्या गायनाचार्य वझेबुवांनी. हे गंडाबंधन बेळगाव मुक्कामी जाहीर इमाम-इतमामाने झाले. 'रणदुंदुभी' हे नाटक विलक्षण गाजले. त्यातील 'वितरि प्रखर' (तिलक कामोद), 'दिव्य स्वातंत्र्य (मालकंस), 'काही नाही पाही' (सुहासुघराई)... अशा पक्क्या शास्त्रीय बंदिशींवरील चाली वझेबुवांच्या असणार; पण इतर गझल-कवालीवरील चाली वझेबुवांनी दिल्या असतील, का खुद्द दिनानाथांनीच त्या दिल्या असतील याबद्दल मला संदेह आहे. 'परवशता' हे पद तर राष्ट्रीय मेळ्यासाठी वीर वामनरावांनी 'रणदुंदुभी'च्या अगोदर दोन वर्षे लिहिले होते.

गंडाबंधनानंतर पंधरा-वीस दिवसांनी कोल्हटकरांनी वझेबुवांना सहज विचारले, "काय बुवा, शिष्य काय म्हणतोय?"

"शिष्य मुळातच तयार आहे. आणि विद्येपेक्षा तिच्यातील तोडगे त्याने अधिक आत्मसात केले आहेत. बैठकीत मोठमोठ्यांना पाणी पाजल्याखेरीज तो राहणार नाही," असे त्यांनी उत्तर दिले.

दिनानाथांना काही चिजा बुवांच्याकडून शिष्य या नात्याने जरूर मिळाल्या; पण आणखी काही 'पदांच्या चाली निवडण्यासाठी' दोन-चार चिजा म्हणून दाखवत, त्या सर्व एकपाठी दिनानाथांना पाठ होत. ह्या पद्धतीने त्या त्यांच्या संग्रहात जमा झाल्या. पण तसा वझेबुवांचा दिनानाथांवर फारसा प्रभाव पडला नाही.

काही लक्षणीय प्रसंग वझेबुवा-दिनानाथ यांच्या संबंधात झाले. त्यांतले एक-दोन उद्धृत करतो.

एकदा बुवा एका अनवट रागातील 'बंदिश' म्हणत होते. ती दिनानाथांच्या कानावर गेली. त्यांना फार आवडली. त्यांनी बुवांच्याकडे ती मागितली. बुवा धूर्त होते. सहसा कुणाला ठाऊक असेल असा तो राग नव्हता. तेव्हा ही वेळ बरी आहे असा विचार करून बुवा म्हणाले, "हे बघ, मी देईन; पण जर तू मला तुझ्या हातातलं घड्याळ देत असलास

तर.'' दिनानाथांना आपले सोन्याचे घड्याळ गमवावयाचे नव्हते, आणि ती चिज जरी त्यांना आवडली असली तरी त्यांच्या संग्रहात अनवट रागरागिण्यांचे दुर्भिक्ष्य नव्हते. त्यांनी त्या चिजेचा आग्रह धरला नाही; पण बुवांना त्यांनी त्या अनवट रागातील दुसऱ्या दोन-तीन चिजा म्हणून दाखवल्या. बुवा चकित झाले. दिनानाथ कुठे पोहोचले होते ते त्यांनी ओळखले. त्यांनी दिनानाथांना नमस्कार केला. पुढे ते म्हणाले, ''तू माझा गंडा बांधलास खरा, पण खरं तर मीच तुझा गंडा बांधायला पाहिजे!''

भास्करबुवा काय, वझेबुवा काय, यांचे सर्व संगीत कंपन्यांत जाणे-येणे होते. भास्करबुवा 'गंधर्व' चे असूनही, काही मतभेदांच्या वेळी आठ-दहा महिने 'बलवंत'मध्येच मुक्काम ठोकून होते. गोविंदराव टेंबे हेदेखील 'गंधर्व'चे पण सुमारे दीड-वर्ष 'बलवंत'मध्ये त्यांचे वास्तव्य होते. या दोघांनाही 'बलवंत' जे करत होती, त्यांचा वेगळेपणा, त्यांची जिद्द याबद्दल ओलावा होता. अशा त्या काळात वझेबुवा 'गंधर्व'मध्ये गेले असताना नारायणरावांना बोलण्याच्या ओघात म्हणाले, ''काय हो, आपल्या हिंदू नाटक मंडळींत तुम्ही त्या मुसलमान थिरकवाँचे काय एवढे स्तोम माजवून ठेवले आहेत?'' वाऱ्याबरोबर वझेबुवांचा हा जळजळीत प्रश्न थिरकवाँच्या कानावर गेला. आधीच त्यांचा घमेंडखोर म्हणून लौकिक, ते वझेबुवांच्या या बोलण्याने खवळले. बुवांना आपला 'हात दाखवायची' संधी कुठे मिळते आहे का, हे डोळ्यांत पाणी घालून पाहू लागले. दैवाला देखील अशा अपूर्वतेची आवड असते. संधी आली. वझेबुवांचे 'गंधर्व मंडळी'त गाणे ठरले. तंबोऱ्याला एकीकडे वझेबुवांचे गायक चिरंजीव शिवरामबुवा, तर दुसरीकडे गुणी दिनानाथ. तबल्याला अर्थातच बुवांचे नेहमीचे तबलजी. बैठक सुरू होण्याच्या तयारीत असता अचानक थिरकवाँ आले. आणि थेट जाऊन तबल्याला बसले. बुवांना नमस्कार करून, ''आपल्यासारख्या गुणीजनांबरोबर साथ करायला मिळायला भाग्य लागते,'' असे म्हणत त्यांनी तबला लावायला सुरवात केली. वेळ

लागला नाही. खाँसाहेबांनी अशी थाप त्या तबल्यावर दिली की, तो किती सुरात लागला आहे, हे सर्वांना कळत असता 'हा थिरकवाँ आहे – जपून असा'' असा इशाराही त्याने दिला. गायनाचार्य वझेबुवांना पुढील गोष्टींचा अंदाज आला, पण ते सगळ्या गोष्टींना नि सगळ्या प्रसंगांना तयारच असल्याने मिष्किल हसत डोळे मिचकावत इकडेतिकडे पाहू लागले. बैठकीचा आरंभ 'बागेश्री'ने झाला. दोन-चार 'समा' देऊन गेल्या असतील-नसतील आणि एकाएकी उचल खाल्ल्यागत थिरकवाँचा हात तबल्यावर भर वेगात धावू लागला. तिकडे 'बांया' देखील अहंकाराने घुमू लागला. थिरकवाँच्या वादनाने साथीदाराचा सरळ मार्ग सोडला आणि लय शास्त्राच्या आड-कुआड गणितात अनिर्बंध त्वेषाने तो संचार करू लागला. थिरकवाँना त्या तोड्या-तुकड्यांत, परणांत, दिर्घ चक्रधार बोलात बुवांना 'सम' दिसत होती; पण इतरांना ती कुठे आहे हे कळेनासे झाले होते. बुवा आवर्तनाच्या हिशेबाने नेहमीप्रमाणे गात गात 'समे'वर येत होते, पण ते थांबले की साथीला बसलेले शिवरामबुवा नीट व्यवस्थित साथ करीत असूनही थिरकवाँच्या या आकस्मिक आक्रमणाने गोंधळून जात होते, तिथे वझेबुवा त्यांच्या मदतीला येत होते, स्वतः मध्येच म्हणून त्यांना 'सम' दाखवत होते; पण हे सारखे कसे चालणार? त्यानंतरच्या संधीला दिनानाथांच्याकडे कलती दृष्टी करून, 'हं-तू म्हण' असे त्यांनी मानेने सांगितले. तिकडे थिरकवाँ लयीच्या घनदाट जंगलात तयारीच्या जोरावर फिरत होते. दिनानाथांनी तशाच अधिकाराच्या बळावर, बिबळ्या वाघाप्रमाणे, 'बागेश्री'च्या एका अवघड स्वरावरून सळसळत्या, सरसरत्या तानेने चाल केली आणि आत्मविश्वासाने 'सम' साधली. वझेबुवांच्याबरोबर थिरकवाँनीही दिनानाथांच्या या विलक्षण जागरूक लक्षवेधाला 'वाः!' म्हणून दाद दिली.

मुंबईत सी. पी. टँकला असलेल्या हिराबागेत गायनाचार्य वझेबुवा आणि त्यांचे दोन शिष्य असा संयुक्त जलसा आयोजिला होता. मराठी

रंगभूमीच्या उत्कर्षाचा तो काळ होता. नारायणरावांची 'गंधर्व', पेंढारकरांची 'ललितकलादर्श' आणि दिनानाथांची 'बलवंत' या नाटक कंपन्या आघाडीवर होत्या. प्रत्येक कंपनीचा स्वतंत्र भोक्ता प्रेक्षकवर्ग होता आणि खुद्द कंपनीच्या मालकांत नसेल, पण त्यांच्यात चुरस असायची. आणि या जलशात वझेबुवांच्याबरोबर बापूसाहेब पेंढारकर आणि मास्टर दिनानाथ गाणार होते.

तुडुंब भरलेल्या हिराबागेत प्रथम पेंढारकर पांढरी पाचमध्ये शास्त्रोक्त रागसंगीत सुंदर गायले. सर्वांच्या – विशेषतः त्यांच्या चाहत्यांच्या टाळ्या घेत घेत ते उठले. नंतर रंगमंचावर आले दिनानाथ. त्यांनी तंबोरे मध्यमात जुळवले. वातावरणात वेगळी जाग आणि उत्सुकता निर्माण झाली. समोर बसलेले वझेबुवा चकित झाले, अस्वस्थ झाले. "आपले शिष्य चढ्या आवाजाचे आहेत. ते पांढरी पाचमध्ये रागदारी गाणार. आपलाही तोच स्वर आहे. तेव्हा त्यांच्यावर आपण सहज रंग जमवू," असा त्यांचा हिशेब होता; पण दिनाने तर सुरवातीलाच मध्यम करून टाकला. मामला अडचणीत टाकणारा आहे. गंमत काय झाली होती, की बुवांना शिष्यांचे चढे गाणे ठाऊक होते; पण 'रणदुंदुभी'च्या तालमीत पदांच्या बरोबर वीरश्रीपूर्ण भाषणांवरही 'बलवंता'नी जी मेहनत घेतली होती आणि परिणामी दिनानाथांच्या आवाजाला जे विलक्षण तेज आणि झळाळी प्राप्त झाली होती, त्यांचा दमश्वास व आवाका खूपच वाढला होता, त्याची त्यांना कल्पना नव्हती. दिनानाथांनी मेहनतीतील 'शंकरा' राग सुरू केला. जिद्दीने आणि आत्मविश्वासाने, एका वेगळ्याच 'तारुण्यमदमस्त' लकाकीने त्यांनी तो पेश केला आणि गाणे संपवताना तारसप्तकातील पंचमावर ते स्थिर झाले आणि तिथेच तंबोऱ्यावर हात ठेवून त्यांनी गाणे संपवले. मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात वेगळीच तेजोमयता निर्माण झाली होती. एक सन्नाटा पसरल्यासारखे झाले आणि लगेच टाळ्यांचा झंझावात सुटला. इकडे गुरुवर्य वझेबुवांची अवस्था फार

विचित्र झाली. पांढरी पाचच्या मध्यमात नित्याची ख्यालगायकी पेश करणे कठीणच होते. तंबोरा पांढरी पाचला उतरवणे, हे प्रतिष्ठेला धरून नव्हते. समयसूचकतेने बुवांनी हात जोडून श्रोत्यांना सांगितले, "माझ्या शिष्याचं ख्यालगायन तुम्ही ऐकलंच आहे. तेव्हा तेच न म्हणता मी तुम्हाला दोन-तीन भजनं ऐकवतो म्हणजे झालं."

शिवरामबुवा म्हणजे 'वझेबुवांची छोटी प्रतिमा'! दृश्यही तसेच, श्राव्यही तसेच! दिनानाथ त्यांचे गुरुबंधू. दोघेही गुणी व दोघेही मनमोकळे. एकदा शिवरामबुवांनी विचारले, "अरे दिना, तुझ्या गाण्यात नेहमी राग-बाह्य सूर डोकावतात. ते तुझ्या कसे मनात येतात? पण ते गोडही लागतात. तरीही रागाची शुद्धता त्यामुळे राहत नाही, हे तर नाकारता येणार नाही. असं नेहमी का होतं? का तुला रागाच्या शुद्ध स्वरूपाची कल्पना नाही, का तुझा गळा तुला जिकडे नेतो तिकडे जाणे तुला आवरतच नाही? काय, खरा प्रकार काय आहे?"

दिनानाथ क्षणभर स्वस्थ राहिले. नंतर मंद स्मित करीत म्हणाले, "तुझ्या प्रश्नाचं उत्तर तुला माझ्या गाण्यातच मिळेल." त्या दिवशी दिनानाथांची बैठक झाली. दिनानाथ पाच तास बेदरकार गायले; पण कुठेही राग-बाह्य सूर वा कल्पना आली नाही, आणि तरी ते गाणे तृप्त करून गेले. शिवरामबुवा सद्‌गदित कंठाने म्हणाले, "वा रे वा दिना! कमाल केलीस! आज तुझ्या अधिकाराची मला पूर्ण कल्पना आली. तुला शास्त्र माहीत आहे, तू विशुद्ध गाणं गाऊ शकतोस, हे महत्त्वाचं आहे. तरीही जेव्हा तू स्वतःला बांधून न घेता धैर्यानं आणि ताकदीनं बंधनापलीकडे सौंदर्यशोध घेतोस, इतरांना जे सुचत नाही, पेलत नाही, ते तू करतोस - मी तरी त्याला शाब्बासकीच देईन. नाहीतर एकेका रागात गाणारा इतका अडकून जातो, की कित्येकदा नंतरच्या रागातही अगोदरचा राग मधूनमधून डोकावत असतो. ते टाळता येतं आहे का, हे पाहायला जवळ जवळचे राग गायची फर्माईश बुजुर्ग मंडळी मुद्दाम

करतात. पूरियानंतर सोहनी किंवा मारवा. ते जसं कठीण आहे, तसंच पण वेगळ्या दिशेनं वेगळ्या अर्थानं मूळ रागाचं दडपण स्वत:वर न पडू देता किंवा रागबाह्य गोष्टी करूनही मूळ रागाची याद कायम ठेवणं हे येरागबाळ्याचं काम नाही. तुला शास्त्र माहीत आहे ते तू मांडू शकतोस, पण तुझा ओढा कलेकडे अधिक आहे आणि ह्या सौंदर्यासाठी तू बंडखोरी करायलाही कचरत नाहीस. वा! खरंच तुझं गाणं वेगळ्या कानांनी व वेगळ्या मनानं ऐकायला हवं, अजमावयाला हवं!''

●●●

बालगंधर्वांचे गाणे हे स्त्रीसुलभ प्रवृत्ती व सौंदर्य यांनी मुसमुसणारे तर दिनानाथांचे पुरुषी पराक्रमाने आणि ताकदीने रसरसलेले. माधुर्य हा गुण दोहोंतही होता. बालगंधर्वांच्यात तो कमालीचा होता. भान हरपून टाकणारा होता. दिनानाथांच्या गाण्यातील माधुर्य वेगळ्याच वर्गातले होते. बालगंधर्वांनी कधीही बेफाम प्रयोग केले नाहीत किंवा अनोखे रंगढंग तपासले नाहीत. दिनानाथांचे अगदी याउलट होते. गाण्यात बालगंधर्व हिशेबी होते, सावध होते, निश्चित उद्देशाने स्वरांच्या विश्वात वाटचाल करत होते. दिनानाथ गणिती नव्हते. ते 'अ-गणिता' च्या मागे होते. ते बेसावध नव्हते पण स्वत:च्या 'गळ्या'वर व मंगेशावर दृढ श्रद्धा बाळगून धाडसी प्रयत्न व प्रयोग करून अचाटाचा वेध घेण्याच्या हव्यासात होते.

त्या दोघांच्या रेकॉर्डिंगकडे, उदाहरणादाखल, बोट दाखवले तर वरील विचाराचा मथितार्थ स्पष्ट होईल.

दिनानाथांच्या स्वभावात नि गाण्यात जबरदस्त आत्मविश्वास होता. कित्येकदा तो बेदरकारपणा वाटे. बालगंधर्वांची पदे रेकॉर्ड झाली त्यासाठी नारायणराव अगोदर दोन-चार दिवस साथसंगतीसह त्या दृष्टीने म्हणून पाहात होते. खाण्यापिण्यात पथ्य सांभाळत होते. भविष्यकाळ या रेकॉर्डस्‌मधून आपल्याला पाहणार आहे याची त्यांना जाणीव होती.

याउलट दिनानाथ!

एच. एम. व्ही. कंपनीतील त्यांच्या पहिल्या रेकॉर्डिंगची ही हकीकत :

सोलापूर का नगरहून (नाटक कंपनी तिथे होती) रात्रीचा प्रवास करून दिनानाथ कांदेवाडीतील शांताराम मांजरेकर यांच्या घरी सकाळी दत्त म्हणून उभे राहिले. काळ्या काडीचे, सोगा सोडलेले धोतर, ओपन कॉलरचा शर्ट, कोट नि डोक्यावर डावीकडे कललेली पांढरी कडक टोपी असा त्यांचा वेष होता. शांताराम हे त्यांचे बालमित्र. गाण्याची उत्तम जाण असणारे, पेटीवर उत्तम हात असलेले. त्यांना पेटी काढायला सांगून, पेटी 'ट्यून' केलेली सुरेल स्थितीत आहे याची खात्री करून घेऊन, दिनानाथांनी एक-दोन पदे थोडी थोडी म्हणून अंदाज घेतला. कुठे, कशासाठी, हे काहीही न सांगता, "पेटी-तंबोरा घेऊन माझ्याबरोबर ताबडतोब चला," असे फर्माविले. जे निघाले ते रॅम्पार्ट रोडवर एच. एम. व्ही. मध्ये येऊन पोहोचले. आज दिनानाथांचे पहिले रेकॉर्डिंग होते. गणपतराव मोहिते, बाबी बोरकर (बलवंतचे पेटीवाले), परशराम सामंत वगैरे मंडळी हजर होतीच. सकाळचा साडेदहाचा सुमार होता. ट्युनिंगच्या दृष्टीने मांजरेकरांची पेटी व्यवस्थित असल्याने दिनानाथांनी साथसांगत करायला त्यांना बसवले. बाबीकडे पायपेटीवर फक्त सूर धरून ठेवण्याचे काम सोपवले. तेव्हा इलेक्ट्रिक रेकॉर्डिंग नुकते सुरू झाले होते. दिनानाथांनी आपल्या नेहमीच्या चढ्या सुरात गाण्याला सुरवात केली, पण आवाजाच्या स्रोताने रेकॉर्डिंगची नीडल् वॅक्समध्ये सारखी रुतू लागली. बरे, माइक दूर ठेवावा तर गाण्यातल्या बारक्या हलक्या 'जागा' नीट येईनात. शेवटी दिनानाथांना एक सूर कमी करणे भाग पडले. आता सारे सुसूत्र झाले होते. पदांच्या रेकॉर्डिंगला जी सुरवात झाली ती रात्रीचे साडेबारा वाजले तरी रेकॉर्डिंग चालूच होते. दिनानाथ एकदा पद म्हणत, "ठीक?" म्हणून विचारत, की 'टेक्र'च. दिनानाथांची तब्येत खुलावी म्हणून रमाकांत

रूपजी त्यांना मधून मधून 'ब्रॅण्डी' देत. ती घेत घेत दिनानाथ गात. दिनानाथांनी रेकॉर्ड केलेले पहिले पद 'रवि मी, चंद्र कसा माझा मिरवितसे?' हे होते. रात्री साडेबारा वाजेपर्यंत मांजरेकरांनी साथ केली. मग ते घरी परतले. पुढे बोरकरांनी साथ केली.

त्यानंतर दिनानाथ सकाळच्या गाडीने नागपूरला निघून गेले.

आवाजाच्या तेजामुळे आणि ताकदीमुळे तांत्रिक प्रश्न निर्माण करणारे आणखी एक दिनानाथांचे रेकॉर्डिंग.

'बलवंत कॉर्पोरेशन'च्या 'अंधेरी दुनिया' या पिक्चरच्या गाण्याचे स्टुडिओत रेकॉर्डिंग चालू होते. दिनानाथांचा चढा स्वर व रुंद जोरकस आवाज 'रेकॉर्डिंग मशिन'ला सहन होईना. अंतऱ्यातील एका तानेला नीडल वॅक्स मध्ये रुतून बसे नि रेकॉर्डिंग बंद पडे. बऱ्याच वेळा असे झाले. मोठा प्रश्न निर्माण झाला. 'माइक' आणखी दूर ठेवला तर साथीची वाद्ये नीट ऐकू येईनात. शेवटी जपानी इंजिनिअरने शक्कल काढली, तेव्हा 'माइक' एका बाजूला 'रिसीव्ह' करे, त्याची दुसरी बाजू 'डेड' असे. त्याने 'माइक' दिनानाथांच्या अगदी तोंडासमोर खूप जवळ ठेवला, पण 'डेड' बाजू त्यांच्याकडे करून. या खेपेला 'रेकॉर्डिंग' सुसूत्र झाले. समोरच्या भिंतीवर आदळून परत येणाऱ्या दिनानाथांच्या स्वरलहरीचे.

खरे तर आकाशातल्या ग्रहांच्या या अद्‌भुत गमतीजमती होत्या.

● ● ●

महमंद हुसेन खाँ यांनी सांगितलेल्या दिनानाथ आणि कादरबक्ष यांच्या काही आठवणी सांगण्यासारख्या आहेत.

मुंबईतील बालीवाला थिएटर, गंधर्व नाटक मंडळी खाली करत होती. जेवण झाले की जायचे. कारण नंतर तिथे बलवंत संगीत मंडळी येणार होती. थिएटरच्या वरच्या मजल्यावर सारंगिये कादरबक्ष यांचा मुक्काम होता. ते घरच्या मंडळींना घाई करत होते, ''जेवण झालं की नाही

तयार? निघायची वेळ झाली आहे."

"झालंच, थोडा वेळ. फक्त पाच-दहा मिनिटं." उत्तर आले.

बरे, मग तेवढा वेळ इकडे-तिकडे करीत घालवायचा त्यापेक्षा सारंगीवर तेवढाच रियाज होईल.... कादरबक्षांना असे वाटले. त्यांनी सारंगीवर गज ओढला. सारंगी गाऊ लागली. आता डोळे मिटून स्वरमग्न झालेल्या कादरबक्षांना जेवणाचा, जाण्याचा विसर पडला. इकडे 'बलवंत' येण्यास सुरवात झाली. 'गंधर्व' मधील इतर जण बाहेर पडले होते आणि वातावरणात काही हालचाल जाणवल्याने रियाजात बुडालेले कादरबक्ष जणू जागे झाले व त्यांनी डोळे उघडून समोर बघितले तर? राजबिंडे दिनानाथ दारात उभे राहून सारंगीला दाद देत होते. ('राजबिंडे' हे विशेषण लेखक के. डी. दीक्षित यांचे. किती यथार्थ होते ते दिनानाथांना!)

कादरबक्ष गडबडले. "गुस्ताखी माफ कीजिये" असे पुटपुटत "अजून यांचं जेवण तयार झालं नाही, म्हणून...." त्यांनी स्वयंपाकघराकडे रागाने बघितले. ते सारंगी आवरू लागले. झालेला प्रकार दिनानाथांच्या लक्षात आला. ते प्रेमळ चर्येने पुढे येत म्हणाले, "सारंगी का ठेवता खाँसाहेब? ती ऐकण्यासाठी तर मुद्दाम मी इथं आलो. आपला रियाज चालू दे. आम्हाला कसलीच घाई नाही. तुम्हीही संकोचानं घाई करू नका. अशी गाणारी सारंगी ऐकायला मिळायला भाग्य लागतं." ओशाळलेल्या कादरबक्षांना दिनानाथांनी उठू दिले नाही. "चालू दे खाँसाहेब. आम्ही सर्व गाण्यातली मंडळी मुद्दाम आपल्याला ऐकायला आलो आहोत." तोपर्यंत कृष्णराव कोल्हापुरे, गणपतराव मोहिते, परशराम सामंत... सारे 'बलवंत' हजर झाले होते. खोली भरून गेली होती. हे गाण्याचे वेड बघून कादरबक्षांच्यातील 'कलावंत' हरखून गेला होता. सारंगी दाद घेत वाजत होती. तिकडे जेवण तयार होतच होते.

दिनानाथांची सारंगीची स्वाभाविक आवड पाहून सारंगिये कादरबक्ष एकदा त्यांना म्हणाले, "तुमचा सारंगीवर इतका जर जीव आहे

तर नाटकात सारंगीची साथ का नाही घेत?" दिनानाथ म्हणाले, "खाँसाहेब, सारंगी-वाजवणाऱ्यांत मी दोघांना मानतो. एक बुंदूखाँ आणि दुसरे आपण. बुंदूखाँ येण्याचा तर प्रश्नच नाही आणि आपण तर 'गंधर्वां'च्याकडे आहात. माझं गाणं कसं आहे, हे आपल्याला ठाऊक आहे. सारंगी हे वाद्य कसं आहे हे तर आपण जाणताच. तर मग, साधारण वाजवणाऱ्यानं काही घोळ घातला तर प्रयोगाच्या वेळी कसं चालेल? सारंगी सुरात नि सुंदर वाजली तरच ती शतरंगिणी ठरते!"

●●●

दिनानाथ म्हटले की आक्रमक तानबाजीचे अडमतडम गाणे अशी एक सर्वसाधारण कल्पना प्रसृत दिसते; पण खरोखर ते तसे होते का? नव्हते.

'रणदुंदुभी'त तेजस्विनी सौदामिनीला म्हणते,

"...गुलामगिरी आणि मरण ही सख्खी भावंडे आहेत. किंबहुना गुलामगिरी ही मरणाहून मरण आहे."

आणि पांढरी पाचच्या तेजःपुंज रसरशीत मध्यमात दिनानाथांची अस्खलित वाणी गाऊ लागे :

***परवशता पाश दैवे ज्याच्या गळां लागला***
***सजीवपणी घडती सारे मरण भोग त्याला***

अशा तडफेने, अशा आर्ततेने, अशा त्वेषाने दिनानाथ हे गाणे गात की श्रोत्यांत पारतंत्र्याबद्दलची चीड, ती असह्य वेदना, दिनानाथांचे भाल्याचे टोक असलेले मधुर पण तीक्ष्ण स्वर श्रोत्यांत हां हां म्हणता संक्रमित करीत. 'प्रतिकार करा' असे जणू कळकळीने सांगणारी ती तेजस्वी स्फोटक भावना सर्वांना बेभान करी. नकळत ओठ चावले जात, हातांच्या मुठी वळू लागत, शरीरातील रुधिराभिसरणाला वेग येई. दिनानाथ अशा पदात तानबाजी करत नसत. मुळातच गळा विलक्षण

लवचिक व फिरणारा असल्याने 'काही गोष्टी' पदाच्या भावनेला न दुखवता येऊन गेल्या तर त्याला इलाज नसे; बिघडतही नसे. पद संपले की थिएटरमध्ये 'संचार' झाल्यासारखे वातावरण तयार होई. धूप टाकला की कसा तो हवेत जाणवतो, तसा दिनानाथांच्या आवाजाचा, गाण्याचा, स्वरांचा एक काल्पनिक 'दाटपणा' वातावरणात भरून राही. पारतंत्र्याची लाजिरवाणी खंत मनात खळबळून उठे... तर नंतर ज्या टाळ्या 'कोसळत' त्या एरवीच्या टाळ्यांपेक्षा दुप्पट जोरकस असत व दुप्पट काळ टिकत. थिएटरमधील श्रोते एकदिल झाले आहेत, असे वाटे. ते जणू सांगताहेत, 'तेजस्विनी, हेच हेच पुन्हा ऐकू दे, पुन्हा सांग, या निर्भत्सनेत प्रेरणा आहे- चेतावणी आहे. दिनानाथ! हा काळाचा संदेश पुन्हा ऐकवा. त्यात उद्याच्या स्वातंत्र्याची मंगल पहाट लपलेली आहे!'

आणि दिनानाथ पुन्हा गाऊ लागत.

असे दिनानाथांचे श्रोत्यांना अस्वस्थ करणे असे.

पुढे दुसऱ्या अंकातील प्रवेशाचा प्रारंभच उदास गंभीर असे. तेव्हा स्टेजवर हिरव्या प्रकाशाची गूढरम्य माया पसरलेली असे. तेजस्विनी कदंबांच्या सार्वभौम प्रतापादित्यांच्या संगमरवरी समाधीला प्रदक्षिणा घालत असते...मध्यंतरी राजा कंदर्पाने सुखासीनतेला बळी पडून, सभोवतालच्या मंत्रिमंडळातील सल्लागारांच्या भोंगळ शब्दजालाला भुलून, आक्रमक मातंगेश्वरापुढे (कदंबांच्या मांडलिक राजापुढे) शरणागती पत्करून, युद्ध टाळण्याच्या नेभळ्या प्रस्तावाला मान्यता देण्याचे ठरलेले असते...पण स्वातंत्र्यवेडी तेजस्विनी स्वतः रणांगणावर जाऊन प्रतिकार करण्याचे ठरवते; पण जनतेचे पुरेसे पाठबळ नसल्याने कंदर्पाच्या पित्याच्या शौर्यशाली प्रतापादित्यांच्या समाधीपाशी जाऊन त्यांचा आशीर्वाद, त्यांची तेजप्रेरणा मागायची ठरवते...तिची प्रदक्षिणा पुरी होते. ती हात जोडून उत्कट प्रार्थना करू लागते. दिनानाथांचे 'तिलक कामोदा'तील अविस्मरणीय पद सुरू होते :

*वितरि प्रखर तेजोबल*
*करिजन समर-निरत,*
*हरुनि, दयाल, मोहजाल...*
*करूनि दया*
*ने विलया*
*हा स्वदेश-विनाश काल...*

ही तेजस्विनीची भावना दिनानाथ इतके समरसून गात.... तानबाजी नाही, आक्रमकता नाही, कणखर सुरांतील तळमळ, त्यातूनच स्फुरलेली माफक पण भावपरिपोषक वेगळ्याच ढंगाच्या स्वरपुंजांची आलापी...पद संपवताना मात्र, म्यानातून तळपती तलवार सर्रकन उपसली जावी अशी, एकच आरोह-अवरोही गतिमान आवेशपूर्ण तान घेऊन दिनानाथ 'सम' साधत... त्या स्वरसंपन्न रसपरिपोषाने अभावित टाळी पडे... पण वास्तवात प्रेक्षकश्रोत्यांची मने अंतर्मुख झालेली असत...स्वातंत्र्य-स्वातंत्र्य-स्वातंत्र्य 'प्रतापादित्य महाराज, द्या हो तेजस्विनीने आकांताने मागितलेले वरदान...' सारी मने मुग्ध-आक्रोश करत...

दिनानाथांचे उदात्त सूर साऱ्यांना शांत, अंतर्मुख करत!

'आपदा राज्यपदा भयदा', 'काही नाही पाही जनिं मोल'...सारख्या अन्य पदांत झडी झडत, त्यातील चमत्कृती ऐकणाऱ्याला चमत्कार वाटे, मानवी गळ्याच्या बेफाम, बेधुंद बेदरकार आक्रमक स्वरूपाचे आणि त्यातील विजिगीषु वृत्तीचे ते दिपवणारे थैमान ('मानापमाना'तील 'युवति मना दारुण रण' मध्येही असेच 'चौकटीत बंदिस्त केलेले वादळ' अनुभवास येई!) बघून त्याला पंचमहाभूतांच्या सामर्थ्याची आठवण होई... असेही करणारे, घडवणारे तेच दिनानाथ असत!

'रणदुंदुभी'त तेजस्विनी कैद झालेली असते. तेजस्विनीच्या स्वातंत्र्याच्या हट्टामुळे पुन्हा रणकुंड पेटलेले असते, कदंबांची पिछेहाट होत

असते, मातंगयुवराजाला वाटत असते, 'शरणागति पत्करून कदंब आज शरण आले नाहीत तर त्यांचा सर्वनाश अटळ आहे', पण तेजस्विनी युवराजाला म्हणते :

***दिव्य स्वातंत्र्यरवि आत्मतेजोबले***
***प्रगटता अवनितलिं कोण त्या लोपवी?***
***शौर्य-सागर-लहरि गगन-मंडल महा***
***भेदिता कवन त्या अबल कर थोपवी?***

दिनानाथांचा हा 'मालकंस' निश्चयाने आणि उदात्त रसाने ओथंबलेला असे. स्वरांचे थिएटर व्यापून टाकणारे भरदार लगाव, ते बेहेलावे, ती उत्कट घनगंभीरता अंगावर रोमांच उभे करी. प्रथम निखळ 'मालकंस' गाऊन, टाळी नंतर अंतऱ्यातील 'शौर्यसागर-लहरि गगन- मंडल महा (भेदिता)...इथे दिनानाथ फार वेगळ्या तऱ्हेने त्या 'महा गगन-मंडळा'ची व्यापकता आणि विरलता 'चित्रित' करत. 'मालकंसा'तून 'भैरवी' आणि पुन्हा 'मालकंस' असे फिरत भरपूर दमश्वास घेऊन स्वरांना बलवंत कंप देत, दोन स्वरांच्या श्रुतीश्रुतीमधून तानेने जात. आणि 'भेदिता कवन त्या'ला जाऊन मिळत. 'भैरवी'च्या स्वरावलीला 'गगनमंडल महा'ही अक्षरे खेळवत. त्यामुळे अंतरिक्षाचा अद्‌भुत भास निर्माण होई. गंभीर 'मालकंस' व सर्वव्यापी 'भैरवी' यांचा जो आकाशव्यापी खेळ वायुतत्त्वावर चाले, त्यामुळे भारलेले वातावरण निर्माण होई. 'भेदिता'च्या तार मध्यमाने त्याला विलक्षण उंची लाभे... छे छे छे... असे स्वरांनी भावचित्र निर्माण करणे ही मुळात कल्पना आणि त्याची ती प्रत्यक्ष कृती, ही फक्त दिनानाथांच्या बाबतच शक्य आहे असे वाटे. प्रेक्षकश्रोते श्वास रोधून तो अचाट प्रकार पाहत, अद्‌भुतरस अनुभवत, कडकडून टाळ्या देत! 'वा वा वा! क्या बात है दिनानाथ' अशी निःशब्द 'दाद' श्रोत्यांच्या सामूहिक मनात तरळे.

पुढे कदंबांना अचानक 'जंगली लोकांची' कुमक मिळते. त्यांच्या

वावटळीसारख्या निकराच्या हल्ल्यामागून हल्ला होण्याने मातंग सेनेची दाणादाण उडते. मातंगयुवराज तेजस्विनीला तोफेच्या तोंडी बांधतो, इशारा मिळताच तोफ उडवून तिचा निकाल लावण्याची आज्ञा देतो आणि स्वतः मातंगसेनेची पळापळ रोखण्यास जाऊ लागतो. इतक्यात 'जंगली टोळ्यांचा नाईक' विजयाचा जयजयकार करत प्रवेशतो. मातंगेश्वरावर चाल करून जातो. तेव्हा मातंगेश्वर तेजस्विनीकडे त्याचे लक्ष वेधतो. "तलवार खाली ठेव माझ्या पायाशी आणि स्वतःच्या व तेजस्विनीच्या प्राणांची याचना कर; नाहीतर तेजस्विनीच्या चिंधड्या उडतील." असे सुनावतो. ते ऐकून तो नाईक कचरतो, तेव्हा तेजस्विनी ओरडून सांगते, "वीरा, भलत्या मोहास बळी पडू नको. मी मेले तरी चालेल. जय माझ्यापेक्षा अधिक मोलाचा नि महत्त्वाचा आहे. तलवार बिनदिक्कत चालीव!" गोंधळलेला नाईक स्वतःला सावरतो. शरणागती म्हणून मातंगेश्वराच्या पायाशी तलवार ठेवण्याच्या मिषाने वाकतो अन् तेव्हा बेसावध असलेल्या त्याच्यावर वार करून त्याला खाली पाडतो. तोंडावरील बुरखा दूर करतो तर मातंगेश्वराला काय दिसते? तो राजा कंदर्पच असतो! तेव्हा मरता मरता मातंगेश्वर कंदर्पावर जंबियाने प्राणघातक वार करतो.

तेजस्विनीची सुटका होते. ती कंदर्पाला बघून चकित व आनंदित होते. आपले सर्वस्व त्याला अर्पण करण्याचा इरादा बोलू लागते. तेव्हा कंदर्प स्वतःला झालेल्या जबर जखमेबद्दल सांगतो व आपण फारच थोड्या काळाचे सोबती आहोत, असे म्हणून तिला तिच्या इराद्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा, "ईश्वराची तशीच इच्छा असेल तर मी धैर्याने त्याला तोंड देईन कारण आपल्यासारख्या स्वातंत्र्यवीराच्या नावाने प्राप्त होणारे वैधव्य हे मंगल सौभाग्यच आहे" - असे तेजस्विनी जाहीर करते. त्या सुमारास दिनानाथ एक विलक्षण भावपूर्ण सुरातील उदात्त अभिप्रायाने भरलेले गाणे, फक्त 'आउट लाइन'च, म्हणत :

*संचिता सहावया प्रबल हृदय प्रणय लीन*
*सदा धरी धीरा, शोक हरी सारा...*

ते उदास उदात्त 'जोगिया'च्या अंगाचे विचित्र स्वर, तो नाटकाचा करुण तेजस्वी शेवट, तो मानवीमूल्यांचा हृदयस्पर्शी रसोत्कर्ष, प्रेक्षक श्रोत्यांना बेभान करत असे, सुखवत-दुखवत असे. मनाच्या साऱ्या तरफांना स्पर्श करत असे. अंतरात अनंत तृप्ती पण डोळ्यांत पाण्याचा पडदा आणि गळ्यात खाली न जाऊ शकणारा आवंढा...पडदा पडे!

असे होते दिनानाथ ! अशी होत होती 'बलवंत'ची नाटके!

दिनानाथ दोन होते. वीररसपूर्ण, चमत्कृतिरम्य, वेगळ्याच जातीची जबरदस्त तनाईत करणारे, आक्रमक. ते तुम्हाला अस्वस्थ करत, तुमची मती गुंग करून टाकत, त्या दैदिप्यमान लखलखाटाने डोळे आणि मने दिपून जात. तर दुसरे दिनानाथ रसरशीत, तेजःपुंज पण शांत. उदात्ततेकडे झुकलेले. ताना न घेता, भरीव भावभरित सुरांच्या लगावांनी, अत्यंत कल्पक आणि मोहक स्वरपुंजांनी रागभाव, पदाची भावना, तुमच्यात खोलवर पोहोचवणारे. पहिले बहिर्मुख तर दुसरे तुम्हालाही अंतर्मुख करणारे, तुम्हाला शांत, शांत करणारे.

दिनानाथ हे विरोधी गुणविशेषांचे एक अत्यंत दुर्मिळ एकत्रीकरण होते! दिनानाथ, दिनानाथ होते!!

●●●

मराठी रंगभूमीवरील पदांनी जीवनाचा प्रवास किती उजळून टाकला आहे! मागे वळून पाहिले तर 'स्ट्रीट-लाइटस' प्रमाणे ही पदे दिसतात. प्रत्येकाचे वेगळे, तेजःपुंज, सुरेल वातावरण, त्या त्या कलाकाराचे व्यक्तिमत्त्व त्यांना बिलगलेले, रंगभूमीवरील नि बाहेरील अनेक आठवणी त्यांच्याभोवती गोळा झालेल्या! मराठी मनाला शास्त्रीय संगीताकडे अभावितपणे कुणी नेले असेल तर ते या पदांनी.

आज मला आठवताहेत त्या तीन भैरवी, म्हणजेच भैरवीतील तीन पदे. त्या स्त्री-भूमिकेतून पेश केल्या गेल्या आहेत, पण त्यांची नाटके वेगवेगळ्या जातीची आहेत. पौराणिक, ऐतिहासिक नि सामाजिक. त्या गाणाऱ्यांची व्यक्तिमत्त्वे व शैली वेगवेगळ्या आहेत. त्यांचे परिणामही वेगवेगळे आहेत. मात्र ती तीनही पदे विलक्षण प्रभावशाली आहेत. 'भैरवी' या रागिणीचा उल्लेख निघाला की त्यांपैकी कोणते तरी एक चटकन माझ्या कानात येऊन गुणगुणू लागते.

***नृपकन्या तव जाया, आर्या,***
***सुखविलासी सोडी ना विनया***

नारायणराव बालगंधर्व यांच्या 'स्वयंवर' नाटाकतली ही भैरवी राजस-प्रसन्न-लडिवाळ-आर्जवी होती, तशीच ती हिरवी स्वप्नाळूही होती! कारण, ती भैरवी नारायणरावांच्या रूपाने 'गंधर्व मंडळी'च्या रंगमंचावर, हिरव्या दिव्याच्या गूढरम्य प्रकाशात यावयाची - कमरपट्टा, शालू परिधान केलेली कुंडिनपूरची नृपकन्या रुक्मिणी ती गायची. रुक्मिणीची कृष्णप्रीती असाधारण होती. 'राजवाड्यातील गाणाऱ्या नाचणाऱ्या मुली गोपकन्यांप्रमाणे गाऊ लागाव्यात आणि तेव्हा मुख्य गवळण राधा आपण असावे - असे मनात येण्याइतकी ती गोकुळमय झालेली होती. 'अजि राधाबाला मीच गोपाळा' या 'देसकारा'चे सूर वातावरणात अजूनही रेंगाळत असायचे. 'रुक्मिणीचे लग्न शिशुपालाशी दोन महिन्यानंतरच्या मुहूर्तावर ठरले आहे. तेवढ्या अवधीत आपण तिचे हरण करावे' हा रुक्मिणीचा निरोप द्वारकेत कृष्णाला पोहोचवून चंद्रेश्वर परत आलेला असायचा. त्याच्याबरोबर गोकुळचा एक वृद्ध गवळी (म्हणजे स्वतः कृष्णच!) कुंडिनपुरास आलेला असायचा. 'तो गोकुळचा व द्वारकेचा! आणि गवळी! मी त्याच्या दर्शनाला धावून गेलेच पाहिजे' असे म्हणत रुक्मिणी राजवाड्यातून गवळीवाड्यात येऊन पोहोचलेली असायची, 'खडा मारायचा झाला तर-' या तिच्या लोभस 'स्वगता'त ती रंगून जायची.

श्रीकृष्णाशी काल्पनिक संवाद करताना, 'हे काय हो, डोक्यावरची घागर फोडून- मला ओलीचिंब करून - 'असं काय म्हणून पाहत राहायचं?' असे कृतक्‌कोपाने विचारायची आणि 'ही रुक्मिणी गवळण झाली असली तरी मूळची राजकन्या आहे, मला नाही गडे इतके निर्लज्ज होता येत,' असे बजावायची. खाडिलकरांच्या शृंगाररसाची गोडी चाखत असता, या स्त्रीसुलभ विनयभावाने प्रेक्षक हरखून जायचे. आणि तेव्हाच कादरबक्षांची सारंगी गाऊ लागायची, थिरकवाँची सुरेल थाप तबल्यावर उमटायची, आणि बालगंधर्वांचे 'नृपकन्या तव जाया' हे पद सुरू व्हायचे!

बालगंधर्वांचा आवाज आर्जवी, सात्त्विक. स्वरांना एक गोलाई नि अलोट गोडी. शब्दांचे कानेकोपरे छेदून त्यांना त्यांनी गोल, लडिवाळ केलेले. आवाज तसे पाहिले तर 'ऑपेरा हाऊस'च्या तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचेल असा; पण तरीही एक प्रकारचा 'कंट्रोल्ड', पुढे जाणाऱ्या स्वरांनाही मागे वळून पाहावयास लावणारा. भास्करबुवांच्या 'ना मारो पिचकारी' या 'दिपचंदी'तल्या ठुमरीवर बेतलेली 'नृपकन्या तव जाया' ही भैरवी, सुगंधी अगरबत्तीच्या धूम्रवलयांप्रमाणे हळूहळू चढत, पसरत जायची. थिएटरच्या कानाकोपऱ्यात भरायची. उत्कंठा, अपेक्षा आणि तृप्ती, या क्रमाने श्रोते धुंद व्हायचे. सूर आणि लय हातात हात घालून क्रीडा करत असायचे. ती भैरवी रुक्मिणीप्रमाणे राजस, सोज्ज्वळ असायची. त्या वेळी टपोऱ्या मोत्यांची लांबच लांब माळ रुक्मिणीच्या छातीवर रुळत असायची. हसतमुखाने ती सगळीकडे बघत असायची. कित्येकदा पावलांचा विशिष्ट कोन करून उभी राहून ती अदृश्य कृष्णाला निक्षून पण आर्जवाने सांगायची. गवळण की नृपकन्या - हे रुक्मिणीच्या मनातील द्वंद्व एका काव्यमय स्तरावर जायचे. तेव्हाचे अभिनय, बोलणे, उभे राहण्याचे पवित्रे...यांचे संकेत वेगळे होते, पण ते समजणारे नि आवडणारे ते प्रेक्षकही वेगळे होते. वेळेचे भान न ठेवणारे, पाऊण-पाऊण तास ही भैरवी होऊनही नाट्यसूत्रात खंड न पाडणारे लोकविलक्षण प्रेक्षक

श्रोते होते ते. त्याला कारणही तसेच सबळ होते. नाट्य व भाव यांचा परिपोष, शब्द व अभिनयाप्रमाणे स्वरांतूनही साधणारे नारायणराव एक 'बालगंधर्व' होते!

दुसरी भैरवी तडफदार मास्टर दिनानाथांची - भव्य पाणीदार डोळ्यांत क्षात्रतेज असणाऱ्या, प्रसन्न हास्यात अस्मिता दर्शवणाऱ्या मास्टर दिनानाथांची.

***सुकतातचि जगीं या***
***जशी कीं फुले गळत पाकळी पाकळी***
***उमलती नाही कलिका ज्या!***

सावरकरांच्या वास्तव वीरतत्त्वज्ञानाने ओथंबलेल्या 'संन्यस्त खड्ग' या नाटकातली. या नाटकात वीररसाप्रमाणे काव्यही होते. त्याला उदात्ततेची किनार होती. या नाटकातला शृंगार जसा स्पष्ट होता तसाच तो खरा होता. या जगात सुकलेल्या प्रीतिफुलांना स्वर्गलोकात उमलवून देवफुले करणाऱ्या उत्तुंग कल्पनांनी नटलेला! वीररसाच्या पार्श्वभूमीवर फुलणारा हा शृंगार, धगधगत्या अंगारातून उधळल्या जाणाऱ्या अग्निफुलांसारखा वाटे! गंमत अशी की, खाडिलकरांच्या प्रकृतीशी नारायणरावांची प्रकृती जशी जुळून जाई तशीच दिनानाथांची वृत्ती आणि जीवनदृष्टी सावरकरांशी जमून जाई!

शाक्यांचा तरुण सेनापती वल्लभसेन, कोसलेश्वर विद्युतगर्भाच्या हाती सापडलेला आहे - वल्लभाचे प्राण की शाक्यांचे स्वातंत्र्य, असा बिकट प्रश्न शाक्यांच्यापुढे कोसलेश्वराने उभा केला आहे. देशासाठी संन्यासाश्रमाच्या अवास्तव अहिंसेला दूर लोटून, हातात 'संन्यस्त खड्ग' घेऊन, वल्लभाचा पिता वीर विक्रमसिंह शाक्य राष्ट्राच्या मदतीला धावून आला आहे - कदाचित देऊ केलेल्या वल्लभाच्या लाजिरवाण्या जीवदान-रक्षणार्थ, 'शरण नाही रण, मारीत मारीत मरण!' असा तेजस्वी निर्णय समर-सभेत घेतला गेला आहे, त्यातील निर्णायक मत सुलोचन या एका

अनोख्या तरुण वीराचे आहे आणि तो वीर दुसरा तिसरा कोणी नसून, वल्लभाची पुरुषवेषधारी लाडकी पोरसवदा पत्नी सुलोचनाच आहे.

अशा भावकल्लोळाच्या पार्श्वभूमीवर दिनानाथांचे 'हाय सखे ग हाय' हे गाणे सुरू व्हायचे. आपल्या तंबूत परतलेली सुलोचना आपल्या सखीला - नलिनीला, कळवळून सांगायची, 'मी माझे राष्ट्रकर्तव्य करीत असताना, ज्या माझ्या वल्लभाने विश्वासाने माझ्या मांडीवर मान ठेवली होती, त्याचाच मी केसानं गळा कापला आहे - एका अनुरक्ताचं रक्त माझ्या हृदयावर उडालं आहे!''

पुढे तिला वाटते, आपण आपल्या प्रियकराशी काल्पनिक एकान्तात तरी बोलावे, आपल्या स्त्रीसुलभ कोमल भावांना तरी जागवावे. नलिनीला बाहेर पहारा करण्यास सांगून, आपला पुरुष-वेश उतरवून ती कल्पनेच्या राज्यात जाते नि चित्रांकित वल्लभाला म्हणते,

***प्रिया घे निजांकी जाता जाता,***
***एकदा मला घे!***

दिनानाथांचे हे पद 'ख्वाजाके कलस्पे मैं तो' या लोकप्रिय गझलावर बांधलेले होते. त्यांच्या तोंडून ते अतिशय हृदयंगम वाटायचे.

आणि यापुढील 'स्वगता'त सुलोचनेला तिच्या नुकत्याच होऊन गेलेल्या विवाह-वाढदिनी अपूर्ण राहिलेल्या शृंगाराची आठवण व्हायची. आपण वीरांगना म्हणून कर्तव्य बजावले, वल्लभासारख्या वीराच्या जायेचे पद (स्थान) कम अस्सल ठरू दिले नाही हीही भावना त्याच वेळी तिच्या मनात दाटायची, पण त्याबरोबरच तिला पुन्हा आठवायचे, भगवान कामदेवाच्या पूजेसाठी आपण गुंफीत होतो ती माला, वल्लभाच्या रणांगणाकडे अचानक जाण्याने अपुरीच राहिली की! ती फुलेदेखील आता सुकून गेली की! काय हे मर्त्य जग आहे! छे, पण हे कसे विसरून चालेल की ज्या जगात फुले सुकतात त्याच जगात ती फुलतातही! आणि इथे सुरू व्हायची दिनानाथांची भैरवी - 'सुकतातचि जगीं या.'

या भैरवीचा बाज वेगळा होता. वझेबुवांच्या 'मौ मनको फसिया' या 'द्रुत' चिजेवर हे पद बांधलेले. मात्र प्रसंगातील उदात्त गंभीरतेचा नीट परिपोष व्हावा, म्हणून दिनानाथांनी ते पद मध्य-लयीत आणलेले आणि ठेका 'आध्धा' ठेवलेला. त्यांचे शब्दोच्चार स्वाभाविक स्पष्ट. गाणे जोरकस, बाहेर टाकलेले उच्चार नि स्वर दोन्हीही तीक्ष्ण, टोकदार तळपत्या तलवारीप्रमाणे. आत्मविश्वासाने फेकलेले त्यांचे जोषपूर्ण स्वर, आक्रमण करत जायचे, पुढे पुढेच जायचे, मागे म्हणून वळून बघायचे नाहीत! या भैरवीचा विस्तार दिनानाथी वेगळेपणाने व्हायचा तर तीव्र कोमल सुरांची त्यांची ती झपाटलेली भिरभिरती तान, केवळ कानांतूनच नव्हे, तर उभ्या अंगातून आरपार निघून जायची! करारी नि क्षात्रतेजसंपन्न सुलोचनेची ही भैरवी तशीच कणखर नि तेजस्वी वाटायची. ऐहिक, पारलौकिक जगाला गवसणी घालणाऱ्या प्रीतीच्या भव्य कल्पनेने उजळलेली पण उदास गंभीर वाटायची! तरीही 'ज्या या जगात फुले सुकतात, त्याच या जगात ती फुलतातही!' असा अमर आशावादही ती सांगून जायची!

तिसरी भैरवी आहे-

***बोला, बोला, अमृत बोला***

ही ज्योत्स्ना भोळे यांची, रांगणेकरांच्या 'कुलवधू' नाटकातली.

१९४२ चा युद्धकाळ म्हणून म्हणा, प्रेक्षकांची आवड बदलली म्हणून म्हणा - तीन तासांच्या हलक्याफुलक्या 'कुलवधू'चीच तेव्हा गरज होती. पूर्वीचे अमाप गाणे आता नको होते. बालगंधर्व-दिनानाथ हे ज्योत्स्नाबाईंच्यापेक्षा श्रेष्ठ खरे पण आज त्यांची 'गरज' नव्हती. दिनानाथ एप्रिल बेचाळीसमध्ये गेलेच होते म्हणा! भावगीतांसारखी सोपी, चटकदार गाणी हवी होती आणि 'भावगीत' म्हटल्यावर 'आला खुषित समिंदर' म्हणणाऱ्या, 'लावुनिया माया कां हो देवा' म्हणणाऱ्या 'ज्योत्स्नाबाई' - हेच स्वाभाविक उत्तर होते. शिवाय 'क्लासिकल'ला हलकेफुलके करून 'ऑडियन्स'ला हमखास रंगवणारे कल्पक मास्तर कृष्णराव, हे 'कुलवधू'चे

संगीत दिग्दर्शक होते. ती हवाच 'कुलवधू'ची होती.

भानुमतीने ज्यात काम केले होते ते 'पिक्चर' प्रकाशित झाले. त्या शुभारंभ प्रसंगी चित्रपट निर्मात्यांनी तिचा जाहीर सत्कार केला, 'भूलोकावर अवतरलेली ही एक शापभ्रष्ट देवताच आहे' वगैरे तिची स्तुती झाली. 'करमरकरां'नी घडवलेला तिचा अर्धपुतळा, सोन्याचे 'मेडल', 'हार' वगैरे घेऊन अत्यंत आनंदात भानुमती घरी येते. तिचा मत्सरी नवरा देवदत्त या समारंभाला आला नाही. त्याचा विषादही तिला मधूनमधून वाटत असतो. तरीही मोलकरणीच्या, पार्वतीच्या आग्रहावरून सत्काराच्या उत्तरादाखल तिने जे गाणे म्हटलेले असते, ते गाणे ती म्हणून दाखवते. ते म्हणजे -

***बोला, बोला, अमृत बोला***

'नृपकन्या' हे पद मध्य षड्जावरून उठते तर 'सुकतातचि' वरच्या षडजावरून, पण दोन्हीची सम पंचमावरच. 'दिपचंदी'तले 'बोला अमृत बोला' मध्य षडजावरून आरोही संपूर्ण तानेने सुरू होते व तार कोमल गंधारावर सम घेते. ही कल्पकता मास्तरांच्या खेरीज कुणाची असू शकेल?' भैरवीची हे देखणे आधुनिक रूप इतके मोहक होते की हिराबाई बडोदेकरांनाही 'या पदाची मूळ चीज' मास्तरांच्याकडून घेण्याची इच्छा झाली. मास्तरांनी ती चाल स्वतःच बांधली होती. कुठल्या चिजेवरून घेतलेली नव्हती म्हणे, हे अलाहिदा.

ज्योत्स्नाबाई सुरेल, लयदार, गाण्याला 'क्लासिकलचा बेस' असलेल्या. गळ्यात तान अगदी उपजत. बालगंधर्व-दिनानाथांच्या आवाजातले वजन त्यांच्या आवाजात नव्हते, तरी त्या भावगीतवजा नाट्यगीताला त्याची अनुपस्थिती जाणवायची नाही. शिवाय, 'स्त्रीनेच स्त्रीभूमिकेत गायलेले भावपूर्ण गाणे' असे त्यांच्या गाण्याचे वैशिष्ट्य होते. 'मन रमणा मधुसूदना', 'क्षण आला भाग्याचा' सारख्या प्रसन्न पदानंतर 'बोला अमृत बोला' ही भैरवी रंगतीच्या चढत्या कमानीचा उत्कर्षबिंदू

गाठायची! ज्योत्स्नाबाई ती इतकी सुंदर गायच्या की दर प्रयोगाला बदलणाऱ्या प्रेक्षक श्रोत्यांना ती जशी आवडायची तशीच प्रत्येक प्रयोगाला ती ऐकणाऱ्या रांगणेकर, एकसंबेकर यांनाही प्रत्येक वेळीही तितकीच आवडायची!

या तीन भैरवी मराठी रंगभूमीवरील 'लॅण्ड मार्कस' आहेत. 'भैरवी' कडे तीन तऱ्हेने ते सुंदर बघणे आहे. भैरवीची ती तीन चिरसुंदर रूपे आहेत!

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
दा. क्र. 3492
26133
2/9/03
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# महाराष्ट्र मागे का पडला? गाडगीळ सिद्धांत

**बाळ गाडगीळ**

महाराष्ट्र मागे का पडला? - हा प्रश्न अनादिकालापासून सर्व महाराष्ट्रीयांच्यापुढे तोंडाचा चंबू करून उभा आहे. आश्चर्य असे की, या प्रश्नाचे खरे उत्तर महाराष्ट्रात एवढे मोठ्ठेमोठ्ठे लोक होऊन गेले असूनसुद्धा अजूनही कुणालाच देता आलेले नाही. परंतु आनंदाची गोष्ट अशी की, या प्रश्नाचे उत्तर आता सापडले आहे. स्वाभाविक विनयामुळे येथे स्वतःचेच नाव सांगायला संकोच वाटतो. आत्मश्लाघा होईल अशी भीती वाटते. परंतु एका तपाच्या सुदीर्घ अभ्यासाचे आणि सखोल संशोधनाचे हे फल महाराष्ट्र-रसिकांच्या मुखी घालणे हे आम्हांला आमचे परमकर्तव्य वाटले, म्हणून हे औद्धत्य आमच्या हातून होत आहे. महाराष्ट्राने क्षमा करावी. वरील प्रश्नाचे उत्तर ज्या सिद्धांताच्या साहाय्याने आम्हांला सापडले, त्याला आम्ही 'गाडगीळ-सिद्धांत' असे नाव दिले आहे. हा आमचा नियम इतका प्रभावी आहे की, वरील गहन प्रश्नाशिवाय इतर शेकडो लहानमोठ्या प्रश्नांची उत्तरेही ह्या सिद्धांताच्या साहाय्याने खाडकन् मिळतात. राजकारण-समाजकारणापासून तो थेट नेहमीच्या व्यवहारापर्यंत नित्य आपली डोकी दुखविणारी प्रमेये या सिद्धांताच्या साहाय्याने चुटकीसरशी निकालात काढता येतात. उदाहरणार्थ :

(१) पुरुष बाजारात गेले असता त्यांना किडके बटाटे आणि कुजके टोमॅटोच कसे मिळतात?

(२) प्रत्येक नवऱ्याची बायको त्याच्या मित्राच्या बायकोच्या मानाने दिसायला कमी सुंदर, जास्त भांडखोर, जास्त कटकटी आणि कमी कामसू का असते?

(३) प्रत्येक बायकोचा नवरा तिच्या मैत्रिणीच्या नवऱ्याच्या मानाने जास्त आळशी आणि अधिक कामचुकार कसा असतो?

(४) घरात जेव्हा दोन भिन्न मते असतात (आणि ती बहुधा असतातच!) तेव्हा बायकांचाच का जय होतो आणि पुरुषांचाच का पराभव होतो? उदाहरणार्थ, बायकोला नाटक पाहायचे असते आणि नवऱ्याला सिनेमा, तेव्हा नाटकच का पाहिले जाते?

(५) आपले लग्न व्हायचे असते तेव्हा, आपण स्त्री असलो तर, चांगले पुरुष आपल्याला नाकारून परस्त्रीशीच का लग्न करतात ? आणि आपण पुरुष असलो तर विवाहेच्छु सुंदर तरूण मुली आपल्याला वगळून परपुरुषाशीच का लग्न करतात ?

(६) सार्वजनिक ठिकाणी आपले चांगले जोडे का नाहीसे होतात, आणि आपले जोडे जेव्हा वाईट असतात तेव्हा कुत्राही त्यांना का शिवत नाही? तसेच अशा ठिकाणी सगळीच पायतणे वाईट कशी असतात ?

(७) छत्र्या, रेनकोट्स, धोब्याला दिलेले कपडे, पुस्तके या बाबतीत वरीलसारखीच परिस्थिती का निर्माण होते? इत्यादि इत्यादि.

पण या प्रश्नांची उत्तरे देण्याआधी या सिद्धांताचा थोडा पूर्वेतिहास पाहणे उपयुक्त ठरेल.

सुरुवातीलाच हे प्रांजळपणे कबूल केले पाहिजे की, लेखकाला हा सिद्धांत सुचला तेव्हा तो महाराष्ट्राचा विचार करीत नसून, आपण स्वतःच मागे का पडलो याचा विचार करीत होता. त्याच्या अनेक मित्रांपैकी कुणी बँकेत, कुणी रेल्वेत, तर कुणी पोस्टात चिकटलेला होता. पण स्वतः लेखक मात्र शाळामास्तरच का राहिला, त्याचा एक मित्र 'प्यून' म्हणून कसा नोकरीला लागला; चढतचढत हेडक्लार्क कसा झाला, आणि रिटायर

होताना त्याला ९७॥ रुपये पेन्शन कसे बसले? दुसऱ्या एका मित्राने रेल्वेत क्लार्क असूनही सासूच्या मदतीने का होईना, पण शेवटी 'मातृ (बायकोची) छाया' हा बंगला कसा बांधला? आणि शेवटी लेखकाला स्वतःला मात्र शाळेच्या कोंडवाड्यात मुले हाकीत, जास्त रकमेवर सह्या करून कमी पगार घेण्यात कसे समाधान मानावे लागले! – या सर्व विचारमंथनातून 'गाडगीळ - सिद्धांता'चा जन्म झाला.

प्रस्तुत लेखकाच्या बाळपणापासूनच त्याला अर्थशास्त्राची थोडीशी गोडी होती. त्याचे वडील अर्थखात्यात नोकरीला होते. तेथे एकदा त्यांच्या साहेबांनी रागाने एक फाईल त्यांच्या डोक्यावर फेकून मारली. फाईल त्यांच्या डोक्याला चाटून गेली. कसेही असले तरी अर्थखात्यातील फाईल आणि तीही डोक्याला लागलेली! तेव्हापासून लेखकाच्या वडिलांना आर्थिक आकड्यांत गोडी वाटू लागली. त्याच सुमाराला लेखकाचा जन्म झाला. वडिलांनी कामासाठी घरी आणलेल्या फाइल्स बाल-लेखकाने आपल्या सुकोमल हातांनी खाली पाडून उलथ्या-पालथ्या कराव्या, वेळप्रसंगी त्यातील कागदांवर आपल्या बालबुद्धीप्रमाणे रेघोट्या ओढाव्या, कधीकधी कागद बालसुलभ लीलेने ओले करावे, कधी फाडूनही टाकावेत. यातूनच लेखकाला अर्थशास्त्राची ओळख झाली आणि प्रतिपच्चंद्रलेखेप्रमाणे लेखक जसजसा मोठामोठा होत गेला, तसतशी त्याची अर्थशास्त्राविषयीची आवडही वाढत गेली. एकदा तर लेखकाने एका फायलीत काढलेली आकृती पाहून, वडिलांच्या साहेबांनीही त्यांची पाठच थोपटली होती. साहेबमजकुरांनी लिहिलेल्या काही मजकुरापुढे लेखकाने एक भलेमोठे प्रश्नचिन्ह काढून ठेवले होते, आणि त्यामुळेच साहेबाला आपली चूक कळून आली म्हणे!

सारांश, लेखकाला अर्थशास्त्राचे बाळकडू अगदी लहानपणापासूनच मिळालेले आहे. पुढे वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर ते जेथे राहू लागले त्याच्या चार घरे पलीकडे एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ राहत असत.

बाललेखकाचे त्यांच्या घरी नेहमी जाणे-येणे असे. ते अर्थात खेळण्याच्या निमित्ताने. पण याही संबंधाचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. अर्थशास्त्रातील प्रमेये बाललेखकाला चुटकीसरशी समजू लागली, आणि ती सर्वांना समजावून सांगून त्याने लोकांना अगदी चकित करून सोडले. साहेबांनी फेकलेली फाईल वडिलांच्या डोक्याला नुसती चाटून न जाता चांगली लागून खोक पडली असती, किंवा अर्थशास्त्रज्ञ आणि लेखक एकाच घरात रहात असते, तर आज लेखकाने सबंध अर्थशास्त्रीय जग उलथेपालथे करून टाकले असते, असा त्याचा नम्र विश्वास आहे.

एकदा 'अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' हा मौलिक ग्रंथ चाळीत असताना प्रस्तुत लेखकाला खालील सिद्धांत आढळला :

'वाईट आणि चांगली - दोन्ही प्रकारची नाणी एकदम चलनात आली तर वाईट नाणी चांगल्यांना चलनातून बाहेर ढकलतात.'

अर्थशास्त्राचा शास्त्रार्थ माहीत नसणाऱ्यांसाठी हा सिद्धांत सोपा करून सांगतो. (अर्थशास्त्रज्ञांनी या औद्धत्याबद्दल क्षमा करावी.) हिणकस आणि शुद्ध अशी दोन प्रकारची नाणी जर एकदम वापरली जात असली तर शुद्ध नाणी चलनाबाहेर फेकली जातात. म्हणजे व्हिक्टोरिया राणीचा छाप असलेला (ज्यात चांदी जास्त असते) आणि जॉर्ज छाप रुपया (ज्यांत चांदी कमी असते) असे एकदम वापरात आले, तर राजा राणीची हकालपट्टी करतो. राणी-छाप रुपया चलन म्हणून वापरण्याऐवजी ती वितळवून त्याची चांदी विकणे जास्त फायदेशीर होते. असे झाले म्हणजे फक्त राजा-छाप हिणकस रुपयेच चलनात राहतात.

हा सिद्धांत जेव्हा लेखकाने वाचला तेव्हा प्रत्येक महाराष्ट्रीयाप्रमाणे त्याच्यापुढेही 'महाराष्ट्र मागे का पडला?' हा प्रश्न होताच; आणि तो स्वतःतर मागे पडलेल्या महाराष्ट्राच्याही मागे पडला होता. त्यामुळे या प्रश्नाने लेखकाच्या डोक्यात घर केले होते. वरील सिद्धांताचा महाराष्ट्राशी काहीतरी संबंध आहे असे त्याला अंतःस्फूर्तीने वाटले आणि मग त्याने

हा सिद्धांत एकदा, दोनदा, अनेकदा वाचला. शेवटी एकदा तो 'मूलतत्त्वां'-चे पुस्तक उशाला घेऊन झोपला असताना त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला! आणि त्या प्रकाशात 'महाराष्ट्र आणि आपण मागे का पडलो?' या प्रश्नाचे उत्तर त्याला झगझगीत दिसू लागले!

न्यूटनसाहेबाने सफरचंद पडताना पाहिले. इतर अनेकांनीही सफरचंदे पडताना पाहिली असतील. (महाराष्ट्रात असा देखावा क्वचित दिसतो. गळून पडेपर्यंत सफरचंद झाडावर ठेवणारा बागवान इकडे विरळा!) परंतु गुरुत्वाकर्षणाचा नियम इतर लोकांना सुचला नाही. आमच्या समोरच्या एवढ्यामोठ्या भीमाक्कांना आम्ही चांगले पहिल्या मजल्यावरून पडताना पाहिले, तरीसुद्धा हा नियम आम्हाला सुचला नाही. भीमाक्का पडल्या तिथे एक खड्डासुद्धा पडला; पण त्याचा आमच्यावर काही-एक परिणाम झाला नाही. पण एरवी कामचुकार असलेल्या आमच्या डोक्याने अर्थशास्त्रातला हा सिद्धांत वाचताना बरोबर काम दिले. इतर कोणालाही हा नियम वाचल्यानंतर जी कल्पना आली नव्हती ती आम्हाला एकदम आली, आणि तीवरूनच आम्हांला 'गाडगीळ- सिद्धांत' सुचला. (थोर संशोधक न्यूटन याचे उदाहरण याबरोबर देण्याचे कारण ? - पण चाणाक्ष वाचकांनी ते केव्हाच ओळखले असेल!)

हा सिद्धांत असा की, नाण्यांच्या बाबतीत जे खरे आहे ते चांगल्या-वाईट माणसाच्या बाबतीतही खरे आहे. व्यवहारात आपण नेहमी पाहतो तेव्हा इतरांचा जय, आपला मात्र पराभव; बायकोला यश आणि आपल्याला मात्र अपयश; साहेबाला बढती आणि आपल्याला मात्र कानपिचक्या; इंग्लंडच्या क्रिकेट-संघाचा जय आणि आपल्या संघाची मात्र धूळधाण, अशी दृश्ये पाहिली म्हणजे साहजिकच आपल्याला दुःख होते. पण एकदा 'गाडगीळ-सिद्धांत' आपल्याला माहीत झाला तर हे दुःख होणार नाही. उलट असे होत आहे याबद्दल आपल्याला धन्यच वाटेल! कारण चांगल्यांना गचांडी आणि वाईटांना पुष्पहार असा 'गाडगीळ-सिद्धांत'च

आहे. मग त्याबद्दल तक्रार करण्यात किंवा दुःख करण्यात काय अर्थ आहे? 'ज्याचे अंगी मोठेपण, तया यातना कठीण' असे काहीतरी तुकोबांनी म्हटलेच आहे. एकदा नवरा किंवा कुणाच्या हाताखालचा कारकून होण्याचे मोठेपण आपण स्वीकारले, म्हणजे बायको आणि साहेब यांच्या यातना आल्याच!

सफरचंद झाडावरून सुटले की ते जमिनीवर पडणारच. त्याबद्दल दुःख करण्यात काय अर्थ आहे ? हे टाळायचे असेल तर (१) सफरचंद पडण्याच्या आधीच मालकाने ते काढून घेतले पाहिजे, आणि (२) जो मालक नाही त्याने सफरचंद हवे असल्यास नेमके ते पडण्याच्या वेळी झाडाखाली हजर असले पाहिजे. म्हणजे ते इतरांना न मिळता त्यालाच मिळेल आणि त्याच्या पदरी निराशा येणार नाही. 'गाडगीळ- सिद्धांता' पासून तर आपल्याला यापेक्षासुद्धा महत्त्वाचे निष्कर्ष काढता येतात. पण त्यापूर्वी प्रत्यक्ष व्यवहारात हा सिद्धांत किती व्यवस्थितपणे आणि जवळजवळ निरपवाद आपले कार्य बजावीत असतो हे येथे दाखवायचे आहे.

आपल्या राजकारणासारख्या क्षेत्रात आपण लक्ष टाकले तर काय दिसते ? आता विषयाचे स्वरूप पाहता राजकारणाचे उदाहरण येथे घेणे बरोबर नाही हे आम्हालाही पटते. कारण हा लेख एका अत्यंत क्रांतिकारक शास्त्रीय सिद्धांताविषयी असल्यामुळे त्यात आपल्या राजकारणासारखा विनोदी विषय येऊ नये; आणि ते राजकारणसुद्धा भारतीय लोकशाहीबद्दल. हे वाचून वाचक म्हणतील, 'तोबा तोबा! अरे, तुम्ही काय गंभीर विषयावर लेख लिहिता आहात का चेष्टा लावलीय?' असे असूनही सर्वांना समजणे सोपे जावे म्हणूनच मुद्दाम भारतीय लोकशाही हाच विनोदी विषय आम्ही निवडला आहे. तरीही विनोद (शक्य तेवढा) टाळून चर्चेची पातळी जास्तीत जास्त गंभीर ठेवायचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

भारतात लोकशाही आहे. (या पहिल्याच विधानावर 'विनोद' असा आक्षेप येण्याचा संभव आहे. परंतु विनोद शक्य तेवढाच टाळायचे आश्वासन आम्ही दिलेले आहे हे वाचकांनी उदार मनाने लक्षात ठेवावे. गंभीर लेखनावरही काही अपरिहार्य अशा मर्यादा असतात.) लोकशाहीमध्ये अडाणी, स्वार्थी, संधिसाधू, सत्तालोलुप असेच लोक निवडून येतात, असा लोकशाहीवर काही आरोप करतात. असे होणे हे अन्यायाचे आहे का? - नाही. आपल्या सिद्धांताप्रमाणे पाहता असे होणेच इष्ट आहे. ज्ञानी, विचारवंत, निःस्वार्थी, समतोल वृत्तीचे, सेवावृत्ती धारण केलेले असे जे अल्पसंख्य उमेदवार असतात ते चांगले असल्यामुळे आपल्या सिद्धांताप्रमाणे त्यांना निवडणुकीत पडणे हेच आवश्यक आहे. तसेच चांगले लोक निवडून आले तरी ते फार काळ 'चलनात' राहत नाहीत. आपले काहीच शहाणपण चालणार नाही, आपण अल्पसंख्य आहोत याची खात्री असताही या लोकांनी निवडणुकीला उभे रहायचा आणि निवडून यायचा मूर्खपणा केलेला असतो, त्याबद्दल त्यांना योग्य शिक्षा मिळावयास नको का? कर्मधर्मसंयोगाने त्यांना ती लौकरच मिळते आणि ते निष्क्रिय बनतात, किंवा कंटाळून राजकारणातून निवृत्त होतात. खरे म्हणजे लोकशाही कारभार चालून सुद्धा अशा चांगल्या लोकांना निवडणुकीची तिकिटे मिळतात हीच अत्यंत खेदाची गोष्ट आहे!

लोकशाही म्हणजे बहुमतवाल्या लोकांचा कारभार. बहुमत हे नेहमी मूर्खांचेच बनलेले असते. म्हणून लोकशाही म्हणजे 'मूर्खांचे राज्य' असे कित्येक विचारवंत वैतागाने लिहिताना आढळतात. परंतु आपल्या सिद्धांताचा अभ्यास केला असता तर या विचारवंतांनी असे अविवेकी, आततायी आणि असभ्य उद्‌गार काढले नसते, यात काहीच संशय नाही.

'महाराष्ट्र मागे का पडला' हे आता सहज लक्षात येण्यासारखे आहे. महाराष्ट्राला नसत्या उचापतीच फार! या महाराष्ट्राला स्वराज्यसंस्थापनेचे लांडे कारभार करायला हवेत, स्वातंत्र्याच्या चळवळीत पुढेपुढे करायला

हवे, धाडसी घोषणा करायला हव्यात, क्रांतिकारक राजकारण म्हणाल तर तेथेही ठोऽठोऽ पिस्तुले वाजवीत महाराष्ट्राचे क्रांतिकारक हजर! रूढीच्या मोहोळावर दगड मारून गांधीलमाशा उठवायची महाराष्ट्राच्या समाजसुधारकांना नसती हौस! शिवाय स्पष्टवक्तेपणा फार. ताडफाड बोलून आपला सवतासुभा मांडायला तयार. सत्य बोलणे हा इतरांचा क्वचित धर्म असला तरी महाराष्ट्राचा मात्र धंदा आहे! राजकारणात काय खरे बोलून चालते ? पण महाराष्ट्राचे नाणेच फार खणखणीत पडले ना! जसा कलदार राणी-छाप रुपया! कुणीही बेशक वाजवून घ्यावा - पन्नासदा! अशा उपद्‌व्यापी महाराष्ट्राचे चालावे तरी कसे ? साहजिकच त्याला सगळ्यांनी थपडा मारून खाली बसविले, त्याची अगदी 'हुर्यो' केली, पण या बेट्याचे सुंभ जळले तरी परवापर्यंत हे लोक 'महाराष्ट्रासकट महाराष्ट्र पाहिजे' अशा हटवादी प्रामाणिक घोषणा करीत होते. आणखी खेदाची गोष्ट म्हणजे या व्रात्य महाराष्ट्राबरोबर सालस, गोड स्वभावाच्या गुजरातचेही नाक कापले गेले. मातीच्या नाजूक भांड्याने पितळेच्या तपेल्याबरोबर प्रवास करू नये असे चतुर इसापाने सांगितले आहे ते उगीच नाही. सारांश - कणखरपणा, स्पष्टवक्तेपणा, सत्याग्रह, चिकाटी या आपल्या असामान्य अवगुणांमुळे महाराष्ट्र मागे पडला. असला जाहीर मूर्खपणा करणे त्याने प्रयत्नपूर्वक ताबडतोब सोडून दिले पाहिजे, म्हणजे तो हां हां म्हणता पुढे येईल.

आता आमच्याच सिद्धांताप्रमाणे आम्ही स्वतः मागे का पडलो हे सांगतो. मी सेकंड क्लासात पास होऊन नोकरीला लागलो. नोकरी मोठ्या मिनतवारीने मिळलेली होती त्यामुळे मी अत्यंत मन लावून इमानेइतबारे काम करू लागलो. पहिल्यांदा माझ्या चुका होत; पण पुढे अनुभवाने मला त्या टाळता येऊ लागल्या. मी चांगले काम करीत असे एवढेच नव्हे, तर जास्त वेळही काम करीत असे. ऑफिस सुटल्यावर सगळे लोक घरोघर गेले तरी मी ऑफिसातच बसत असे. पुन्हा उरलेले काम मी घरी नेतच

असे. अशा रीतीने मी कामाचे भारेच्या भारे उपसले. कामच्या फायलींचे ढिगारेच्या ढिगारे पार खलास केले. बरे, मी प्रामाणिक एवढा की कुणी त्याचे काम केल्याबद्दल मला पैसे देऊ लागला तर मी ते साफ नाकारीत असे. 'नोकरीच्या पगाराबद्दल मिळणारे पैसे मला पुरले पाहिजेत; त्यावरच माझा हक्क आहे,' असे बाणेदार उत्तर देऊन मी कित्येक लोकांना परत पाठविले. तसाच मी स्पष्टवक्ताही फार. हेडक्लार्कच्या चुका मी जशाच्यातशा त्याच्या पदरात घातल्या, आणि तो जेव्हा माझ्यावर डाफरला, तेव्हा मोठ्या साहेबाकडे जाण्याची त्याला धमकी दिली. त्यावर हेडक्लार्क मला अपमानकारक असे खूप बोलला; पण मी त्याला काहीच दुरुत्तरे केली नाहीत. बिलकुल रजा न घेता सुट्ट्यांच्या दिवशीसुद्धा ऑफिसात जाऊन मी आपली कामे करीत राहिलो.

— आणि या सर्व सद्‌गुणांचा परिणाम व्हायचा तोच झाला. एके दिवशी माझी नोकरी गेली!

त्याचे असे झाले —

त्या दिवशी मला आमच्या मोठ्या साहेबाने बोलावले. मी अगदी छाती पुढे काढून अभिमानाने साहेबाच्या खोलीत गेलो आणि ऐटीत सलाम ठोकून त्याच्यासमोर उभा राहिलो. परंतु दुसऱ्याच क्षणाला माझी ही ऐट कुठल्या कुठे बेपत्ता झाली. कारण, साहेबमजकुरांनी माझी न भूतो न भविष्यति अशी......

पण तसे नकोच. काय झाले तेच सांगतो. मी गेल्याबरोबर साहेबाने मला विचारले, 'गाडगीळ, तुम्ही नोकरीला कधी लागलात?'

'चार महिने झाले साहेब.' मी उत्तरलो.

'कामाची सर्व माहिती झाली?' साहेबाने विचारले.

'होय साहेब. खडानूखडा माहिती झालीय.' मी म्हटले.

हे ऐकून साहेब खुर्चीत सावरून बसला, आणि मीही मोठ्या अभिमानाने माझ्या प्रगतीचा इतिहास साहेबाला ऐकवला.

‘तुम्ही ऑफिसला कधी येता?’ साहेबाने पुढे विचारले.

‘बरोबर साडेनवाच्या ठोक्याला येतो साहेब.’ ऑफिसची वेळ साडेदहाची होती. माझे उत्तर ऐकून साहेबाचा एक ओठ दुमडला.

‘आणि जाता कधी?’ त्याने विचारले.

‘कधी साडेसहा कधी सात-आठसुद्धा. एकदा संकष्टीच्या दिवशी तर चंद्रोदय होईपर्यंत मी ऑफिसमध्ये थांबलो होतो.’ मी उत्तरलो.

आमची ऑफिस सुटायची वेळ साडेपाचची होती. माझे उत्तर ऐकून साहेबाचा दुसरा ओठ दुमडला. त्याचे आश्चर्य दुणावत होते.

‘म्हणजे तुम्ही लौकर येता? उशिरा जाता ? जास्त वेळ काम करता?’ साहेबाने विचारले.

‘होय साहेब.’ मी अत्यंत अभिमानाने उत्तरलो.

‘आजपर्यंत रजा किती घेतलीत तुम्ही ?’ साहेबांचा प्रश्न.

‘एकही दिवस नाही साहेब!’ माझे उत्तर.

‘कधी आजार, लग्नसमारंभ-कशाकरताही नाही ?’ साहेबाचा प्रश्न.

‘नाही साहेब, मी मेलो असतो तरी ऑफिसला नित्याप्रमाणे येतच राहिलो असतो.’ मी छाती फुगवून म्हणालो.

- आणि काय झाले कुणास ठाऊक! आमचा साहेब एकदम भडकला. एखादा मोठा डांबरी फटाका उडावा तसा तो जागचा उडाला. खुर्चीच्या हातांना धरून तो जेमतेम उभा राहिला. थरथरा कापत रागाने लाल ल़ाल होऊन तो ओरडला,

‘तोबा तोबा! इन्शाल्ला! याचा तुला जाब द्यावा लागेल! काय म्हणून तू एवढं काम केलंस ? इथं कामं लौकर संपवून काय लढाया मारायला जायचंय ? आँ ? - कामं करण्यापेक्षा चहा का प्यायला नाहीस ? गप्पा का मारल्या नाहीस ? गोष्टीची पुस्तकं का वाचली नाहीस ? आणि काहीच नव्हतं, तर झोपायला काय झालं होतं ? निदान हजामती तरी करायच्या

होत्यास! - पण एवढं काम करायला कुणी सांगितलं होतं तुला ?' येथे साहेब थोडा वेळ थांबला. बोलता बोलता त्याला धाप लागली होती. घामाने त्याचा चेहरा डवरला होता.

'तुला सांगून ठेवतो - खबरदार यापुढं एवढं काम करशील तर! आणि हल्ली कामात एकही चूक नाही तुझ्या. शरमेची गोष्ट आहे! तू एकटा चारचार लोकांची काम करायला लागलास तर उरलेल्या तिघांनी काय उपाशी मरायचं? आणि हे काम संपल्यावर तुला दुसरं कोणतं काम देऊ मी ? याचा तरी विचार करायचा होतास! हे कुठलं ऑफिस आहे, माहित आहे तुला ?'

'मिलिटरी खातं आहे साहेब!' मी चाचरत उत्तरलो. साहेबाच्या भडिमारानं मी अगदी घाबरून गेलो होतो. हजारो काजवे माझ्या डोळ्यांपुढे चमचम करीत होते.

'एवढं माहीत असून अक्कल नाही ? इथं काम करायला लाज नाही वाटत ? लोकांना भिकेला लावायचंय ? लढाईचा पत्ता नाही, आणि म्हणे काम करतोय! - मोस्ट इनूएफिशंट! - फूलिश!- बेवकूफ...' साहेब कडाडला.

'साहेब, माझी चूक झाली. परत मी फार काम करणार नाही साहेब...' मी कशीबशी दोन वाक्ये बोललो.

'काय! फार काम करणार नाही ? म्हणजे काम करणारच ना ? काय हा उद्धटपणा! टेरिबल इनूसबॉर्डिनेशन! याबद्दल तुला कोर्टमार्शल करायला पाहिजे, आणि तुला इतकं प्रामाणिक असायला काय झालं? कॉंट्रॅक्टरनं दिलेले पैसे तू नाकारलेस का?'

'होय साहेब. हे आपल्यापुढं सांगायची मला शरम वाटते साहेब.' मी खालच्या मानेने उद्‌गारलो.

'आणि वर निर्लज्जासारखा स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीडपणासुद्धा! हेडक्लार्कच्या चुका तू त्याला समजावून सांगितल्यास? तोबा! अरे

हेडक्लार्क कधी चुकू शकतो का ? छेः छे:! तुझ्यासारखा कामसू, प्रामाणिक, स्पष्टवक्ता आणि लायक माणूस या जागेला नालायक आहे! चपरासीऽऽ' साहेब ओरडले आणि आमच्या ऑफिसमधून बाहेर जाणारा जो रस्ता होता तेथील 'बाहेर' या पाटीपर्यंत निरोप द्यायला चपरासी माझ्याबरोबर आला.

– अशा रीतीने माझी नोकरी गेली. आणि तेव्हापासून मी शाळामास्तर आहे. अर्थात येथेही माझे वरील दुर्गुण अजून कमी झालेले नाहीत. पण आमचे दयाळू हेडमास्तर आणि कृपाळू चालक आपले कसेतरी चालवून घेतात, इतकेच. कधीकधी मात्र मला मुले शिस्तीत का वागली, त्यांचा निकाल चांगला का लागला, वर्गात मुले नियमित का येतात, या प्रश्नांचा जाब द्यावा लागतो, आणि त्याबद्दल वरिष्ठांची तंबी मिळते. एवढे सोडले तर, आणि सही करतो त्यापेक्षा कमी पगार मला मिळतो हे, आणि सुट्टीचा पगार मिळत नाही, एवढे सोडले तर बाकी ठीक चालले आहे. माझ्याकडून असलेल्या सर्व अपेक्षा मी पुऱ्या करीन असा काही मला आत्मविश्वास नाही. पण मी जास्तीत जास्त बथ्थड, निगरगट्ट, चुकार, लोभी बनायचा मनःपूर्वक प्रयत्न करतो आहे. परवाच हेडमास्तर मला म्हणाले 'आहे, आहे! तुमच्यातही प्रगती आहे!'

– अशा रीतीने आम्ही मागे पडलो.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे 'गाडगीळ-सिद्धांत' हा अतिशय व्यापक सिद्धांत आहे. तो समाजकारणात, धर्मकारणात, शिक्षणसंस्थांत, जीवनात, कुठेही - जिथे जिथे माणसे आहेत तिथे तिथे चालू शकतो. तो सगळीकडे सारखाच परिणामकारकपणे कसा चालतो हे दाखविण्यासाठी स्वतंत्र ग्रंथरचनाच करावी लागेल. पुढे-मागे आमचा एखादा सत्‌शिष्य ही महनीय कामगिरी बजावीलही; पण तोपर्यंत या सिद्धांतावरून व्यवहारासाठी जी दिग्दर्शक तत्त्वे मिळतात, ती येथे मी थोडक्यात सांगतो.

आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर प्रामाणिक लोकांनी लुच्चे बनले पाहिजे. तसेच कामसू लोकांनी कामचुकार, खऱ्यांनी खोटे, शिस्तशीर लोकांनी बेशिस्त, बेडर लोकांनी भित्रे आणि शहाण्यांनी मूर्ख बनणे आवश्यक आहे. सुरुवातीला ही गोष्ट निश्चित अवघड जाईल; पण ती निश्चित कष्टसाध्य आहे. शहाण्याने मूर्ख होणे हे सुरुवातीला अवघड वाटले तरी पुढे पुढे ते फार सोपे जाते, असा तर आमचा वैयक्तिकच अनुभव आहे.

तेव्हा लक्षात ठेवा कसेही असले तरी तुमचे नाणे बद्द असले पाहिजे. ते खणखणीत असेल, राणी-छाप असेल, तर ताबडतोब तुमची उचलबांगडी झाल्याशिवाय राहणार नाही!

●●●

# या सुरांच्या मैफली, रांगोळी व सांगावा

वासंती मुझुमदार

## या सुरांच्या मैफली

*गे, या सुरांच्या मैफली : स्वरही बुलंद न लागतो;*
*अंतांतुनी आकांत हा, साकी, तुला मी बाहतो.*

*मेघावत्या तिमिरांतुनी हुंकारसा मी उमटतो;*
*बोलावत्या विलयांतुनी साकी, तुला मी बाहतो.*

*कोंदूनिया नभ भोवती उठलीं तमाचीं वादळें,*
*रुतली नखें, उठली क्षतें, गळले नवांकुर कोवळे.*

*निष्पर्ण झाली गे तनू, गेली निघोनी सावली;*
*मंदावल्या श्वासांतुनी गगनें व्यथेचीं पाहिलीं.*

*स्वर लागुं दे गे एकदा अन् भोगुं दे नभमंडळा;*
*साकी अता जवळी रहा या भोगतांना स्वरकळा.*

# रांगोळी

नभ दूर उडोनी गेलें,
बघ फाटुनि गेली दीठ;
उन्मत्त वादळी वारे,
थरथरतो सागरकाठ.

चल तसाच होडीमधुनी :
उन्मनी जळाची साथ.
अन् सूर्य आंत भिजलेला
घुसमटतो, मीहि अशान्त.

तूं बोलुं नको ना कांही,
लव ऐक सांगतें, राजा,
हो निर्दय, कर आघात
झंकारुन स्वर घे माझा.

निःशब्द मीहि गातांना
स्मित तुझिया ओठांवरती;
जातांना थरकत होडी
नभ, सूर्य परतुनी बुडती.

बघ नाहि जळाचा पार;
भय : जाशिल तूंहि अवेळीं.
या श्रांत समुद्रावरती
घालीन मीहि रांगोळी.

# सांगावा

कुंभ भरला भरला,
लोणी उतों आलें, बाई!
थांबवी न घुसळण,
भान सुटोनिया जाई!

नभ जळदून गेलें,
काळा वारा सोसाटला,
बघ मयूर पक्ष्याचा
पंख ओघळून गेला.

मोरपंखाचा सांगावा
अशा आवर्ताच्या वेळीं;
गर्द काचोळीची आहे
गाठ तुटोनियां गेली.

# पांडुरंग, सांगता व ईशावास्योपनिषद

बा. भ. बोरकर

## पांडुरंग

*पांडुरंग दाता : पांडुरंग त्राता*
*अंतीचा नियंता पांडुरंग*

*दयेचा सागर : मायेचे आगर*
*आनंदाचे घर पांडुरंग*

*भक्तीचा ओलावा : दृष्टीचा दिष्टावा*
*श्रद्धेचा विसावा पांडुरंग*

*तप्तांचे चंदन : दीप्तांचे इंधन*
*प्रकाशवर्धन पांडुरंग*

*अंगसंगे त्याच्या झालो मी निःसंग*
*देहीच साष्टांग पांडुरंग*

पर्वरी आल्त, ८-९-८१

# सांगता

*विठ्ठल नाही पंढरीत, विठ्ठल आहे अंतर्हित*
*त्रिजगत आहे प्रेरित विठ्ठल माझा*

*विठ्ठल आहे दाही दिशा, उगवी मिटी उषा निशा*
*विठ्ठल बिलोरी आरशासारखा आहे*

*विठ्ठलासारिखे नोहावे, त्याच्याकडेच झेपावे*
*आपुले अरूप पहावे विठ्ठल बिंबीं*

*विठ्ठल अरूपी गाठिता अवघ्या जन्मांची सार्थता*
*विठ्ठल निष्ठेची सांगता विठ्ठलीं भोगी*

पर्वरी आल्त, ८-९-८१

# ईशावास्योपनिषद : मराठी अनुवाद

*ईशाने हे वसे सर्व जे काही जगतीं जगत् ।*
*भोग तू अर्पुनी त्याते कुणाचे न हरी धन ।। १ ।।*

*शतायुष्य अपेक्षावे येथे कर्मे करीतच ।*
*येणेच - न दुज्या मार्गे - न कर्म लिंपिते नरा ।। २ ।।*

*जाती असूर्यलोकात काळोख मिट्ट दाटल्या ।*
*ये लोकी पावता मृत्यु आत्मया वधितात जे ।। ३ ।।*

ठायीच राहून मनास लंघी ।
धावून देवासही ये न गाठू ।
ते धावत्यां तिष्ठत टाकि मागे ।
विभु स्त्रवी त्यातुनिया रसाते ॥ ४ ॥

चालते ते, न चालेही; दूर ते, जवळीहि ते ।
अंतरी तेच सर्वांच्या, सर्वांच्या बाह्यतःहि ते ॥ ५ ॥

पण जो सर्व भूतांत पाहतो आपुलेपण ।
आपुल्यात तसा त्याते विटेना तो तदा कुणा ॥ ६ ॥

आत्म्यातुनीच जाली ही भूते हे जाणिले जये ।
एकत्व-देखण्या त्याते मोह वा शोक कोठला? ॥ ७ ॥

अतीत तो दिव्य अदेह शुद्ध ।
स्नायु व्रणोन्मुक्त अपापविद्ध ।
कवी मनीषी परिभू स्वयंभू ।
सर्वां सदा चालवितो स्वभावे ॥ ८ ॥

सोकावले अविद्ये जे रिघती आंधळ्या तमी ।
त्याहुनी घोर काळोखी विद्येतच रत नित्य जे ॥ ९ ॥

विद्येने गवसे गा ते अविद्येनेहि आढळे ।
थोरांचे सांगणे ऐसे अंतरी बाणले अम्हां ॥ १० ॥

विद्ये आणि अविद्येने उभयी जो ओळखे तया ।
तरे मृत्यु अविद्येने विद्येने अमृता झटे ।। ११ ।।

सोकावले अजन्मा जे रिघती आंधळ्या तमी ।
त्याहुनी घोर काळोखी जन्मातच रत नित्य जे ।। १२ ।।

जन्माने गवसे गा ते अजन्मानेहि आढळे ।
थोरांचे सांगणे ऐसे अंतरी बाणले अम्हां ।। १३ ।।

जन्मा आणि अजन्माने उभयी जो ओळखे तया ।
तरे मृत्यु अजन्माने जन्माने अमृता झटे ।। १४ ।।

आहे सुवर्णपात्राने सत्याचे झाकिले मुख ।
समर्था वारुनी ते तू सत्यधर्मार्थ दाखवी ।। १५ ।।

आवरी व्यूह रश्मीचा यम, सूर्य प्रजापते ।
तेज तेच तुझे रूप कल्याणतम पाहतो ।
पुरुष तेथे जो तोच मी असे ।। १६ ।।

हे वैश्वदेवा सृजनज्ञ अग्ने ।
ने राणिवे न्याय्यपथेचि आम्हा ।।
वारी अघाचा विळखा मनाचा ।
काया वाचे नित्य तुला नमस्ते ।। १७ ।।

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।

# बाग, केशराची खूण, अज्ञात

अरुणा ढेरे

## बाग

*भाषा असते बागेसारखी, तो म्हणाला.*
*थोडे पाणी, थोडी हिरवळ, थोडी इवल्या फुलांची मखमल.*
*थोडी वाळूची वाट, थोडी निवडुंगबनं,*
*पण त्यातसुद्धा देखणे आकार,*
*चित्रविचित्र फुलं नि पानं.*
*कुठून कुठून आणलेली नाना देशांतली रोपं,*
*त्यांच्या असंख्य तऱ्हा, त्यांची स्वतंत्र वाढ,*
*भाषा असते अगदी बागेसारखीच, त्याचा विश्वास गाढ.*
*अर्ध्या वयातली पोर,*
*तिने त्याच्या शब्दांवर जीव ओवाळून टाकला*
*आणि स्वप्नात चालत जावे,*
*तसा त्या धूसर वाटेवर पाय ठेवला*
*थोडी थरथर, अधीर उत्सुकता,*
*बागेत गिरकी घेणाऱ्या पाखरासारखे तिचे डोळे.*
*तिने कुरवाळले गवत, हुंगून घेतली फुले,*
*पानांमधले हिरवे आभाळ झुलवत नेले.*

हळुहळू गळू लागला अंधार,
बागेचे रूप बदलत गेले.
ती उभी स्तब्ध, बागेच्या मध्यात,
एकाएकी तिला कळून आले
प्रत्येक बागेच्या मनात असतेच एक मोकळे भरदार, भयावह रान,
कुठे तरी दबा धरून टपून बसलेले,
बाहेर पडून जोमाने वाढण्याची वाट बघत असलेले.

## केशराची खूण

परतले सांजऊन धूळवाटेने जपून
मनापाशी राहिलेली एक केशराची खूण
दाट निळा निळा भास, त्याचे वाऱ्यावर सडे
काळोखाच्या घडीवर रंग जरासाच उडे
अंगणात कसनुशी उललेली जुई फुले
चुणी वासाची सारून कोण उंबऱ्याशी आले
माझ्या हातात टपोरी वेळ कातर कातर
कुणी पुढ्यात झुकून वर ठेवला अधर
जरा हालला उजेड, डोळे झिळमिळ झाले
दिवेलागणीला कोण जीव लावूनिया गेले
कसे आले, कसे गेले, काय लावियले भाळी
मनकेशराची खूण कशी झळाळून आली
पाचूकाकणे जवळ, कोणा माहीतही नाही
हाती घालू, नको घालू, काय करू सईबाई ?

# अज्ञात

तो निघाला तेव्हा पावलांना मिठी मारून रडली प्रिया,
आईने दाराआडच हुंदका दाबला.
पाळण्यातल्या तान्ह्याकडे नजर टाकून
वडिलांनी दिर्घ निःश्वास सोडला.
त्याने पाहिले आपल्या प्रवासाचे भविष्य प्रियजनांच्या डोळ्यांत
दऱ्यांमधे कोसळणारा अंधार, दुर्गम सुळक्यांचे पर्वत,
फुसांडत वाहणाऱ्या नद्या, काठावरचे सगळे पोटात घेत,
क्रूर अरण्यांमध्ये घोंघावणारा मृत्यू, कठोर, अपरिचित,
आणि एवढे पार करून गेले जरी सहीसलामत,
तरी नंतर तहानेएवढा अथांग समुद्र ओलांडायचा कसा एका झेपेत ?
त्याने पाहिले हे सारे, ऐकलेही पुन्हा त्यांच्या रडण्यातून
एकवार वाटले काही बोलावे, पण त्याने मग ओठ मिटले.
नव्हते का मागेच त्याचे समजावणे व्यर्थ ठरले ?
त्या अटळ चर्चा, वितंडवाद, विनवण्या, धमक्या -
सगळ्या कळवळ्याचे अखेर काय झाले ?
शब्दाचे निमंत्रण अनिवार मोहाचे, तेवढेच फक्त मागे उरले.
आणि आता तो निघाला त्या मोहामागे दृढपणे
त्याला वाटले, थांबावे का अंगणात निदान मेंदीच्या कुंपणापाशी,
म्हणावे का एखादे निरोपाचे हळवे गाणे?
पेरावे का एखाद्या फुलझाडाचे बी तरी आठवण म्हणून?
निदान पाखरांसाठी टाकून जावेत का चार दाणे ?
केले नाही त्याने तसे काहीच, फक्त तो खाली वाकला.
आणि चिमूटभर धूळ मस्तकी लावत पुटपुटला -
'मी जातो आहे त्या प्रदेशात असेलही इतके सारे भयंकर,

पण तू सांग आयुष्य इथे तरी कुठे आहे सहज, सोपे आणि सुंदर ?
तिथे असतील दऱ्या, पण असेलच ना दरीत उतरणारी
एखादी लहान पायवाट, तिच्यावर रानफुले हसणारी ?
असेल एखादे मुठीएवढे रंगीत पाखरू कुणी न पाहिलेले,
आणि रानाच्या गाभ्यात रेंगाळत असेल त्याचे गाणे ओले ओले.
मला हे काही भेटणारच नाही
असे समजणाऱ्या माझ्या प्रियजनांना
सोपवतो आहे मी तुझ्याकडे.
आणि जातो आहे तुझ्या ओळखीच्या परिघातून
एका उत्कट हाकेच्या अज्ञाताकडे.'
तो निघून गेला घरातल्या आकांताकडे वळूनही न बघता.
धूळ उडाली वाऱ्यावर उंच आणि बसली
त्याचे वेडेपण पदरात बांधताना फक्त उदास हसली.

●●●

# मैत्रिणी, शोध व बरसात

शांता शेळके

## मैत्रिणी

- कुठूनशी आलीस
अवचित समोर येऊन उभी राहिलीस
आणि माझ्या गळ्यात हात टाकलेस.
तुझे ओठ हसत होते
पण डोळे बारकाईने माझा वेध घेत होते.
मी माझ्या एकाकीपणात गुरफटून बसलेली,
खिन्न उदास, काहीशी भांबावलेली,
आणि माझ्याभोवती एक दुर्भेद्य कोष तयार झालेला...
तो भेदून तू कधी माझ्यापाशी पोचलीस
कळलेही नाही.
मग तुझ्या तुफान गप्पा, पोरकट विनोद,
माझे अंग घुसळीत स्वतःच खदखदून हसणे,
-जणू मधले काही घडूनच गेले नव्हते.
माझ्या मनाचे बंद कवाड तू हलकेच उघडलेस
माझ्या दुःखाला स्पर्श न करता भोवती भोवती फिरून
मूकपणे त्याला कुरवाळलेस, गोंजारलेस,

सारा दिवस तुझा स्पर्श, तुझा हर्ष,
तुझा परिहास, सुखद सहवास,
आणि भूमिगत प्रवाहासारखे त्याआडून झिरपणारे,
ओलावा देणारे तुझे सांत्वन...
निरोप देताना क्षणभर गळ्यात हुंदका दाटला :
तो हुंदका तुझा होता की माझा?
-अजूनही कळले नाही.

## शोध

बाहेरचे प्रदेश संकुचित होत आहेत
तसतसा आतल्या अज्ञात प्रदेशांचा
शोध लागत आहे मला
माझी मीच किती अनोळखी होते स्वतःला!
माहीत नव्हते मला माझे बळ, माझी दुर्बलता,
सतत मला वेढून बसलेली माझी भीरुता,
माझे माझ्याशी असलेले भांडण,
माझ्याच निकट सहवासातलेही माझे एकाकीपण,
काहीच उमगत नव्हते यांतले
होते केवळ असह्य घुसमटणे एका अथांगातले ...
आता आतल्या आत मी आहे उलगडत,
क्षणोक्षणी विस्तार पावत,
पोहोचते आहे जाऊन
माझ्याच अंतरंगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत,
मी चकित होत आहे, स्तिमित होत आहे,
दुखावत आहे आणि सुखावतही.

# बरसात

संबंधांचे अर्थ कधीच लावू नयेत
त्यांचा फक्त नम्र कृतज्ञतेने स्वीकार करावा,
जसा पाण्याचा झुळझुळनितळ जिव्हाळा
जुळलेल्या समंजस ओंजळीत धरावा.

संबंधाचे धागे कधीच उलगडू नयेत
तो फक्त प्राणांभोवती सहज घ्यावेत लपेटून,
जसे हिवाळ्यातल्या झोंबऱ्या पहारगारठ्यात
अंगांगी भिनवीत राहावे कोवळे धारोष्ण ऊन्ह.

संबंध तुटतानाही एक अर्थ आपल्यापुरता ...
एक धागा ... जपून ठेवावा खोल हृदयात
एखादे रखरखीत तप्त वाळवंट तुडवताना
माथ्यावर आपल्यापुरती आपली खासगी बरसात ...

●●●

REFBK-0026833

मराठी ग्रंथ संग्रहालय
निबंध
दा. क्र. 3492
२६८३३
2/9/03
संदर्भ शाखा

# ऋणनिर्देश

- 'स्थानबद्ध वुडहाऊस'; पु. ल. देशपांडे 'मैत्र';©१९९० मौज प्रकाशन, मुंबई
- 'ओझें', 'भाग्यवंता', 'निरोप' व 'नाही माझ्या चुलीपाशी'; 'इंदिरा संत', 'गर्भरेशीम'; © १९८९ सौ. वीणा रविंद्र संत, बेळगाव.
- 'प्राध्यापिका : कांही रोमांचकारी अनुभव' व 'प्राध्यापिका : आणखी रोमांचकारी अनुभव'; गंगाधर गाडगीळ; 'फिरक्या', ©१९८८ गंगाधर गाडगीळ, मुंबई
- 'शिवराया,' 'अनावरण' व 'ज्योतीराव' कुसुमाग्रज; 'मुक्तायन' © १९९०, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई
- 'तातू : एक पिशानवल्ली'; जी. ए. कुलकर्णी; 'माणसे अरभाट आणि चिल्लर'; © १९८९ परचुरे प्रकाशन मंदीर, मुंबई
- 'मायबाई बहिणाई', 'मदनाचे वाटेकरी' व 'सर्वांनाच'; इंद्रजीत भालेराव, 'पीकपाणी'; ©१९८९ इंद्रजीत भालेराव, रिघोरा (परभणी)
- 'आकाशातील ग्रहांच्या गमती जमती'; प्रभाकर जठार; 'दिना दिसे मज दिनरजनी'; © १९९०, प्रभाकर जठार, मुंबई.
- 'या सुरांच्या मैफली', 'रांगोळी' व 'सांगावा', वासंती मुझुमदार; 'सहेला रे'; © १९८३ वासंती मुझुमदार
- 'महाराष्ट्र मागे का पडला? गाडगीळ सिद्धांत'; बाळ गाडगीळ; 'एकच प्याला – पण कोण?'; © १९९० बाळ गाडगीळ, पुणे.
- 'पांडुरंग', 'सांगता', 'ईशावास्योपनिषद' : मराठी अनुवाद; बा. भ. बोरकर; 'कैवल्याचे झाड'; © १९८७ श्रीमती रुक्मिणीबाई बोरकर, गोवा.
- 'केशराची खूण', 'बाग' व 'अज्ञात'; अरुणा ढेरे; 'यंत्राक्षर'; ©१९९० डॉ. अरुणा ढेरे, पुणे.
- 'मैत्रिणी', 'शोध' व 'बरसात'; शांता ज. शेळके; 'जन्म जान्हवी'; © १९९० शांता ज. शेळके, पुणे.

# WHAT DOES 99.9% QUALITY MEAN ?

**Total Quality aims at 100% improvement.**
**See what you get when you have only 99.9% Quality.**

- Your heart fails to beat 32000 times each year.
- 500 incorrect surgical operations performed each week.
- Two unsafe landings at Indira Gandhi Airport every month.
- 19000 new born babies dropped at birth by doctors each year.
- 16000 lost pieces of mail per hour.
- 22000 cheques deducted from the wrong account every day.
- 20000 incorrect drug prescriptions each year.
- 8 hours of unsafe drinking water.

Courtesy : BEL Electronica

Inserted in public interest by a Well wisher.

*With Best Compliments From*

# SUNNY DIESEL SALES & SERVICE

27, DASMESH MARKET,
DR. DIWAN SINGH GURUDWARA COMPLEX,
OPP. ANDHRA ASSOCIATION, ABARDEEN,
PORT BLAIR, 744 101.

With Best Compliments From

# VIJAYPOWER GENERATORS LIMITED

60, Shradhanand marg,
New Delhi 110 006.

*With Best Compliments From*

**TATA ENGINEERING & LOCOMOTIVE COMPANY LIMITED**

JAMSHEDPUR * PUNE * LUCKNOW

*With Best Compliments From*

**MANGESHEE DIESEL SALES & SERVICE**

15-A, INDRAPURI, BHOPAL 462 022.

*With Best Compliments From*

**MANIK DIESEL SERVICES**

11/12, SIDDHASHILA APARTMENTS,
NEAR BHAMAGRA HOSPITAL, SAYAJI ROAD,
NAVSARI (GURJAT) 396 445

*With Best Compliments From*

**NAVBHARAT BUILDERS**

2608, SUBHASH ROAD,
KOLHAPUR 416 012.

*With Best Compliments From*

**THALY CONSTRUCTIONS**

GHARSE TOWER, M. G. ROAD,
PANJIM, GOA 403 001.

*With Best Compliments From*

**SUNITHA DIESEL SALES & SERVICE**

POST BAG NO. 5, BUILDING NO. XXIX/1288A,
VYTILLA JUNCTION, NATIONAL HIGHWAY,
COCHIN (KERALA) 682 019.

*With Best Compliments From*

**NAVEEN DIESELS**

POST BOX NO. 1, BHAGYANAGAR COLONY,
CUDDAPAH (ANDHRA PRADESH) 516 002.

*With Best Compliments From*

**RANI CONSTRUCTIONS PVT. LTD.**

PLOT NO. 49, KHADAPABANDH, PONDA - GOA,
GOA 403 401.

*With Best Compliments From*

**M/S SANGHVI BROTHERS**

5, DIGAMBER APARTMENTS,
MUKUND NAGAR,
PUNE 411 037.

*With Best Compliments From*

**PREMIER DIESELS PVT. LTD.**

TIVOLI COURT, BLOCK 'A', GROUND FLOOR,
I/C BALLYGUNGE CIRCULAR ROAD,
CALCUTTA (WEST BENGAL) 700 019.

*With Best Compliments From*

**TRINITY SALES & SERVICE**

C-220,MIDC INDUSTRIAL ESTATE,
VILLAGE : PANDHARPUR, TALUKA GANGAPUR,
DIST. : AURANGABAD, (MAHARASHTRA) 431 133.

*With Best Compliments From*

**ATLANTA CONSTRUCTION CO. (INDIA) LTD.**

"ATLANTA" B-22, VAIKUNTHLAL MEHTA ROAD,
VILLE PARLE (W),BOMBAY400 049.

*With Best Compliments From*

**CEE AAR ENGG. PVT. LTD.**

26/24, EAST PATEL NAGAR,
NEW DELHI 110 008.

*With Best Compliments From*

**DIESEL WORKS**

105 C METTUPALAYAM ROAD,
OPP. VISHWANATHPURAM, THUDIYALUR,
COIMBATORE (TAMIL NADU) 641 034.

*With Best Compliments From*

**FINOLEX CABLES LIMITED**

26/27, BOMBAY-PUNE ROAD, PIMPRI,
PUNE 411 018.

*With Best Compliments From*

**M/S. J. U. KANE**

**CIVIL CONTRACTORS**

GOA-VELHA, GOA 403 108.

*With Best Compliments From*

**LIGNITE DIESEL SALES & SERVICE**

15-C, RUE ROMAIN ROLLAND, PONDICHERRY 605 001.

*With Best Compliments From*

**JEEVAN DIESELS**

2867 SHAH GANJ, SHRADHANAND MARG,
DELHI 110 006.

*With Best Compliments From*

**J. K. DIESELS**

KATRAS ROAD, OPP. SUPER BAZAAR,
DHANBAD (BIHAR) 826 001.

*With Best Compliments From*

**SHRI MAHALAXMI CONSTRUCTION CORPORATION**

"AAJ KA ANAND" BUILDING,
NEAR MODERN CAFE,
SHIVAJINAGAR, PUNE 411 005.

*With Best Compliments from*

**GHATGE KARKERA POWER INDUSTRIES**

5, KANGRA BHAWAN NO. 1
OPP. PODAR HOSPITAL,
232, DR. A. B. ROAD, WORLI,
BOMBAY 400 025.

*With Best Compliments From*

**United Agency**

**Authorised Hero Honda & Lucas TVS dealer**

Pune-Satara Road, Pune 43.

*With Best Compliments From*

**CONTINENTAL GENERATORS PVT. LTD.**

3914, SHRADHANAND MARG,
BEHIND DENA BANK, G. B. ROAD,
NEW DELHI 110 006.

*With Best Compliments From*

# Thermax

**Growing with a mission............**

*With Best Compliments From*

## M. P. AGRICULTURAL CORPORATION

'VITHAL SMRUTI', OLD MOTOR STAND,
GREAT EASTERN ROAD,
RAIPUR (MADHYA PRADESH) 492 001.

मराठी विश्व
वेचक आणि वेधक

**"सांगा कसं जगायचं?"**

मंगेश पाडगांवकरांच्या एका आशयसंपन्न कवितेचे हे शीर्षक आहे. त्यांच्या या गर्भित प्रश्नाला 'मराठी विश्व'चे उत्तर आहे.

**"हसत खेळत गांणं म्हणत.**
**यशस्वी जीवन जगायचंय"**

पण कसं?